Made with Xodo PDF Reader and Editor

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. ०७ मे २०२५ | वर्ष - तिसरे | अंक ३५ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# चार आठवड्यांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर करा; सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

नवी दिल्ली दि.६ (वृत्तसंस्था)- गेल्या अडीच-तीन वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत चार आठवड्यात निर्णय घ्या, असे स्पष्ट आदेश सर्वोच्च न्यायालयाने आज महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाला दिले. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि एन. के. सिंग यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली. लाईव्ह लॉने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

आयोगाच्या २०२२ च्या अहवालापूर्वी महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार ओबीसी समाजाला आरक्षण देऊन या निवडणुका घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. "जे. के. बांठिया आयोगाच्या २०२२ च्या अहवालापूर्वी महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार ओबीसी समुदायांना आरक्षण दिले जाईल," असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

न्यायमूर्ती सूर्यकांत आणि एनके सिंह यांच्या खंडपीठाने राज्य निवडणूक आयोगाला चार आठवड्यांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अधिसूचित करण्याचे निर्देश दिले. चार महिन्यांच्या आत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश खंडपीठाने दिले. गरज पडल्यास निवडणूक आयोगाला मुदतवाढ मागण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालामुळे मुंबईसह राज्यसभरातील महापालिकांच्या निवडणुका लवकरच लागण्याची शक्यता आहे. गेल्या अडीच ते तीन वर्षांपासून या निवडणुका रखडल्या आहेत. महापालिकांसह अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांची सदस्य संख्या किती असावी,



प्रभाग रचना कशी असावी आणि प्रभाग रचना, सदस्यांची संख्या राज्य निवडणूक आयोगाने ठरवावी की राज्य सरकारने आणि ओबीसी आरक्षणासहित निवडणुका व्हाव्यात की नाही आदी विविध विषयांवर सर्वोच्च न्यायालयात याचिका प्रलंबित होती.

सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने असं निरिक्षण नोंदवलंय की स्थानिक संस्था अनिश्चित काळासाठी अडखळत ठेवता येणार नाहीत आणि वेळेवर निवडणुका हे तळागाळातील लोकशाहीचे सार आहे. त्यामुळे जिथं मुदत संपली आहे किंवा प्रशासन राज असलेल्या महानगरपालिका, परिषदा, नगर पंचायती आणि जिल्हा परिषदांसाठी निवडणुका घेण्यात याव्यात, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले.

सुनावणीदरम्यान खंडपीठाने महाराष्ट्र राज्याचे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांना विचारले की निवडणुका का घेतल्या जाऊ शकत नाहीत. "काही तर्क आहे का? आज नोकरशहा सर्व महानगरपालिका आणि पंचायतींवर कब्जा करत आहेत आणि मोठे धोरणात्मक निर्णय घेत आहेत. या सर्व खटल्यांमुळे, संपूर्ण लोकशाही प्रक्रिया ठप्प झाली आहे. अधिकाऱ्यांची कोणतीही जबाबदारी नाही. सध्याच्या आकडेवारीनुसार निवडणुका घेण्यास परवानगी का देऊ नये?" असं न्यायमूर्ती कांत यांनी विचारलं.

याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ वकील इंदिरा जयसिंग यांनी असा युक्तिवाद केला की बांठिया आयोगाच्या अहवालानुसार निवडणुका घेऊ नयेत, कारण ओबीसींसाठी असलेल्या ३४,००० जागा राखीव ठेवण्यात आल्या होत्या. त्यावर, जयसिंग यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे निवडणुका घेण्यात राज्याला कोणतीही अडचण नाही असं महाराष्ट्र राज्याचे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी स्पष्ट केलं.

## देशात आरक्षणाचा खेळ रेल्वेसारखा झालाय : सुप्रीम कोर्टाच्या न्यायमूर्तींची मोठी टिप्पणी

"देशातील आरक्षण व्यवस्था ही आता रेल्वेच्या डब्यासारखे झाली आहे. जे प्रवासी डब्यात चढले आहेत, ते इतरांना आत येवू देत नाहीत," अशी टिप्पणी आज (दि.६ मे) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ओबीसी आरक्षणासंदर्भातील खटल्याच्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी केली.

महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २०१६-१७ मध्ये पार पडल्या होत्या. २०२१ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारने ओबीसीसाठी लागू केलेला २७ टक्के आरक्षणाचा अध्यादेश रद्द केला होता. ओबीसी उमेदवारांसाठी कोट्याच्या मुद्द्यावर सुरु असलेल्या कायदेशीर लढाईमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना विलंब झाला आहे. आज या प्रकरणी दाखल याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. याचिकाकर्त्यांचे वरिष्ठ वकील गोपाल शंकरनारायणन यांनी युक्तिवाद केला की, राज्याच्या बंठिया आयोगाने स्थानिक निवडणुकांमध्ये ओबीसीना आरक्षण दिले आहे. मात्र ते खरोखरच राजकीयदृष्ट्या मागास आहेत की नाही, हे तपासले नाही. राजकीय मागासलेपणा हा सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपणापेक्षा वेगळा असतो. त्यामुळे प्रत्येक ओबीसी गटाला आपोआपच राजकीय मागास समजू नये.

वरिष्ठ वकील गोपाल शंकरनारायणन यांच्या युक्तीवादावर बोलताना न्यायमूर्ती सूर्यकांत म्हणाले की, "या देशात आरक्षणाचा खेळ रेल्वेसारखा झाला आहे. जे लोक आधी डब्यात शिरलेत, ते इतर कोणालाही चढू देत नाहीत. हाच खरा खेळ आहे. याचिकाकर्त्यांचाही हाच खेळ आहे." यावर शंकरनारायणन म्हणाले, "आता तर त्यामागेही नवीन डबे जोडले जात आहेत."

# शिवनानदी जवळ मांसयुक्त घाणीचे साम्राज्य नागरिकांचे आरोग्य धोक्यात !

कन्नड दि.६ (प्रतिनिधी)- शहरातील सरस्वती कॉलनी, हुकूमचंदनगर लगत असलेल्या शिवना नदी जवळ काही व्यापारी मांसयुक्त घाण टाकत आहे,

सरस्वती कॉलनीतील नागरिकांनी दि.०६ मे रोजी मुख्याधिकारी यांना निवेदन दिले या निवेदनात म्हटले आहे की सरस्वती कॉलनीत गेल्या काही महिन्यापासून शहरातील काही मांस विक्रेते, हे त्यांच्या दुकानातील मांसयुक्त घाण आणून टाकत आहेत. सदरील घाण हि शिवना नदीच्या पूर्वेकडील जुना प्रस्तावित बायपास रस्त्यावर फेकली जात आहे. या घाणीमुळे परीसरात दुर्गंधी पसरत असून





रोगराई पसरण्याची दाट शक्यता आहे. घरात येणाऱ्या दुर्गंधीत हवेमुळे नागरिकांना डोकेदुखी, मळमळ, उलटी अशा अनेक आजारांचा सामना करावा लागत आहे. संबधित परीसराचा लहान मुले खेळण्यासाठी, विद्यार्थी शाळेत ये जा करण्यासाठी तसेच नागरिक सकाळी फिरण्यासाठी वापर करतात. शहरातील भटके कुत्रे हे मांस खाण्याच्या उद्देशाने परिसरात येत आहे. उडणारे पक्षी मांस घेऊन घरांच्या छतावर आणत आहे व पाण्याच्या टाकीच्या पाईप मध्ये साठवण्याचा प्रयत्न केल्यामुळे हि घाण पाण्याच्या टाकीत आढळली असल्याचे अनेक प्रकार घडलेले आहे. या प्रकारावर नगर पालिका प्रशासनाच्या वतीने आळा घालावा अशी मागणी सरस्वती कॉलनी येथील नागरिक करत आहे या निवेदनावर गणेश बोडखे, अतुल जाधव, विलास भदाणे, वैभव धनगे, राहुल शहाणे, धनंजय भोसले, भूषण भोसले, संदीप भोसले, अंकुश मोहिते, अण्णासाहेब इंगळे, सूरज निबोने,रामकृष्ण मराठे, संजय जोशी, महेश महाले, साईनाथ करवंदे, दिलीप शेलार, वसंत जाधव, राजू मोकासे, अनिल घरटे, सूरज साळुंखे, वसंत पवार, सालेम चाऊस, सुभाष थेटे, सागर मोकसे, आदींच्या स्वाक्षऱ्या आहे.

# दहशतवादविरोधातील लढाईत आम्ही संसाधने पुरवू, अमेरिकेकडून भारताला मदतीचा हात

नवी दिल्ली दि.६ (वृत्तसंस्था)- भारताने दहशतवादाविरोधात जोरदार मोहीम हाती घेतली असून या लढाईला अमेरिकेनेही पाठिंबा दर्शवला आहे. या लढाईसाठी अमेरिकेने सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे. या प्रयत्नांना मदत करण्यासाठी आवश्यक ती संसाधने पुरवली जातील, असंही अमेरिकेने म्हटलंय. अमेरिकेचे प्रतिनिधी सभागृहाचे अध्यक्ष माइक जॉन्सन यांनी मंगळवारी भारताला असे आश्वासन दिले. "भारताला दहशतवादाविरुद्ध उभे राहावे लागेल. आम्ही त्या प्रयत्नांना पाठिंबा देण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करू. ट्रम्प प्रशासन दहशतवादाविरुद्ध लढण्यासाठी भारताला ऊर्जा आणि संसाधनांसह मदत करेल", असं जॉन्सन यांनी ठामपणे सांगितले. भारतासोबतचे संबंध अमेरिकेसाठी महत्त्वाचे आहेत यावर भर देऊन ते म्हणाले, "आम्ही अमेरिकेत त्या प्रयत्नांना पाठिंबा देण्यासाठी शक्य तितके सर्व काही करू आणि मला वाटते की हे सर्व या संबंधाचा एक भाग आहे कारण ते विकसित होत आहे. ट्रम्प प्रशासनाला त्या संबंधाचे महत्त्व स्पष्टपणे समजते आणि दहशतवादाच्या धोक्याचे महत्त्व स्पष्टपणे समजते". २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या हल्ल्याचा निषेध केला आणि म्हटले की, "दहशतवादाविरुद्ध अमेरिका भारतासोबत खंबीरपणे उभी आहे. पंतप्रधान मोदी आणि भारतातील लोकांना आमचा पूर्ण पाठिंबा आणि सहानुभूती आहे." हल्ल्यानंतर अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांच्याशी संवाद साधला होता. परराष्ट्र विभागाने म्हटले होते की वॉशिंग्टन भारत आणि पाकिस्तान दोघांच्याही संपर्कात आहे आणि त्यांनी देशांना उपायात्मक गोष्टींचा पाठपुरावा करण्याचे आवाहन केले होते.

# महाराष्ट्रात आज १६ ठिकाणी युद्धाची मॉकड्रील

मुंबई दि.६ (प्रतिनिधी)- जम्मू-काश्मीरमधील पहलगाम हल्ल्यानंतर भारत पाकिस्तान यांच्यातला तणाव कमालीचा वाढलाय. युद्धाचे ढग निर्माण झालेत. दहशतवाद्यांविरोधात भारत मोठी कारवाई करण्याची शक्यता आहे. त्याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानही कारवाई करण्याची शक्यता नाकारता येत नाही. हे लक्षात घेता नागरी क्षेत्रात हल्ले झाल्यास कसं वागावं, काय उपाययोजना कराव्या यासाठी नागरी संरक्षणाचे धडे दिले जाणार आहेत. केंद्रीय गृहखात्याने सर्व राज्यांना उद्या (७ मे) मॉक ड्रील घेण्याचे आदेश दिलेत. हवाई हल्ल्याची सूचना देणारे सायरन वाजवले जातील, तसंच अशावेळी ब्लॅक आऊट कसा करावा, सुरक्षित ठिकाणी कसं जावं, इमारतींखाली कसं जमा व्हावं याचं प्रशिक्षण दिलं जाणार आहे.

केंद्र सरकारच्या मॉक ड्रिलच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकार हायअलर्ट मोडवर आहे. प्रशासनाकडून सर्व यंत्रणांना अलर्ट राहण्याच्या सक्त सूचना देण्यात आल्या आहेत. राज्य सरकारकडून अंतर्गत पातळीवर हालचालींना वेग आला आहे. पालकमंत्र्यांसह सर्व मंत्र्यांना प्रशासनासोबत संपर्कात राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यावेळी राज्यातील कोणकोणत्या ठिकाणी उद्या मॉकड्रील आणि ब्लॅकआऊट होणार आहे, याची यादी जाहीर करण्यात आली आहे.

आज होणाऱ्या मॉकड्रीलमध्ये मुंबई, उरण-जेएनपीटी, तारापूर, पुणे, ठाणे, नाशिक, थळ-वायशेत, रोहा-धाटाव-नागोठाणे, मनमाड, सिन्नर, पिंपरी-चिंचवड, छत्रपती संभाजीनगर, भुसावळ, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या शहरांचा समावेश आहे.

दरम्यान १९७१ मध्येही पाकिस्तानशी युद्धाचे ढग जमा झाल्यावर राज्याराज्यात मॉक ड्रील घेण्यात आलं होतं. तेव्हा शहरात सायरन वाजायचे, ब्लॅक आऊटचा सरावही केला जायचा असा अनुभव आजही ज्येष्ठ नागरिक सांगतात. एबीपी माझाच्या हाती १९७१ च्या वेळचे काही फोटो हाती लागलेत. १९७१ मध्ये जगातील सात आश्चर्यांपैकी एक असलेला ताजमहाल काळ्या कपड्याने झाकून ठेवला होता. मॉक ड्रीलबाबत आणि युद्धा दरम्यान घ्यायच्या काळजीबाबत तेव्हा विविध वृत्तपत्रांनी बातम्या करत जनजागृती केली होती. लष्कराने आणि जिल्हा प्रशासनाने गावोगावी मॉक ड्रील घेत सराव केला होता.

# अहिल्यादेवी स्मृतीस्थळासाठी ६८१ कोटींचा आराखडा, मुलींसाठी स्वतंत्र आयटीआय, तुळजापूर मंदिरासाठी १८६५ कोटींचा निधी

## चौंडीच्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय

अहिल्यानगर दि.६ (प्रतिनिधी)- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मगावी, चौंडीमध्ये पार पडलेल्या मंत्रिमंडळाच्या विशेष बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी अनेक मोठ्या घोषणा केल्या. चौंडीला अहिल्यादेवी होळकर स्मृतीस्थळासाठी ६८१ कोटींचा आराखडा मान्य करण्यात आला आहे. तसेच अहिल्यानगरात नवं वैद्यकीय महाविद्यालय तर मुलींसाठी विशेष आयटीआय सुरू करण्यात येणार आहे. अहिल्यादेवी होळकरांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त चौंडीमध्ये मंत्रिमंडळाची विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. राज्याच्या इतिहासात पहिल्यांदाच ग्रामीण भागात मंत्रिमंडळाची बैठक पार पडली.

अहिल्यादेवी होळकर यांचं जन्मगाव चौंडीचा तीर्थस्थळ म्हणून विकास करणार असल्याचा निर्णय मंत्रिमडळ बैठकीत झाला. यासोबतच तुळजाभवानी मंदिरासाठी १८६५ कोटी, ज्योतिबा मंदिरासाठी २५९ कोटी, महालक्ष्मी मंदिरासाठी १४४५ कोटी रुपयांच्या खर्चाला मंजुरी देण्यात आली आहे.

अष्टविनायक मंदिरासाठी १४७ कोटी रुपये, तुळजापूर मंदिरासाठी १८६५ कोटी रुपये, नाशिकच्या त्र्यंबकेश्वर मंदिर विकास आराखड्यासाठी २७५ कोटी रुपये, सोबतच विदर्भातील माहूरगड विकास आराखड्यासाठी ८२९ कोटी रुपये, असे एकूण ५ हजार ५२० कोटी रुपयांच्या कामांना मान्यता देण्यात आली आहे. तर दुसरीकडे अहिल्यानगर जिल्ह्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभारणार असल्याची घोषणा ही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलीय. सोबतच मुलींचे स्वतंत्र आयटीआय देखील असणार असल्याचे ते म्हणाले.

राज्यात महिला सक्षमीकरणासाठी सरकार आदिशक्ती अभियान राबवणार आहे. समाजात संवेदनशीलता निर्माण करणे आणि जागृती करण्याचा आमचा प्रयत्न असेल. जे काम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी केले तेच काम आमचं सरकार करणार आहे. अहिल्यादेवींचे जीवन आणि कार्याचा सन्मान झाला पाहिजे, यासाठी चित्रपटाची निर्मिती केली जाणार आहे. तो चित्रपट बहुभाषिक असेल. शिवाय हा केवळ जीवनपट नसेल तर प्रभावी मांडणी करण्याचा प्रयत्न आम्ही करणार आहोत. असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

परक्रियांच्या आक्रमणामुळे आमची श्रद्धास्थानं नष्ट करण्यात आली. मात्र त्याचे पुनरुज्जीवन करण्याचे काम अहिल्यादेवींनी केलं. आज बैठकीच्या निमित्ताने चौंडीला स्मृतीस्थळाचे जतन करण्यासाठी ६८१ कोटी रुपयांचा आराखडा मान्य केलाय. अखिल भारतीय स्थरावर प्रेरणा आणि तीर्थस्थळ तयार झाले पाहिजे, असं काम आपण केलंय. समाजात संवेदनशीलता निर्माण करणे आणि जागृती करण्याचा आमचा प्रयत्न आहे. महिला केंद्रीत एनजीओ उभा करण्याचे काम हाती घेतले आहे. धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना नामांकित शाळांमध्ये प्रवेश द्यायचा यासाठी यशवंत योजना सुरु केली आहे. आता १० हजार विद्यार्थी आपण यातून शिकवणार आहोत. सोबतच गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह योजना सुरु करत आहोत.अशी महत्वपूर्ण घोषणा ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलीय. अहिल्यादेवी होळकर यांनी उभारलेल्या विहिरींसाठी जलसंधारण विभागाने हाती काम घेतलंय ज्यात त्यांचे पुनरुज्जीवन आपण करणार आहोत. ज्यामध्ये १९ विहिरी ६ कुंड ३४ जलाशयाच्या संवर्धनाचे काम करणार आहोत. सोबतच राहुरी दिवाणी न्यायालयाला ही मान्यता दिली आहे. नाशिक आणि त्र्यंबकेश्वरला मेळावा होतो त्यात कुंभमेळा प्राधिकरणाच्या कायद्याला मंजुरी दिली आहे. अहिल्यादेवींच्या त्रिशताब्दीनिमित्ताने डाक तिकीटसह प्रेरणा गीत देखील जारी केलंय.

# अवैध गांजा लागवडीविरुध्द कार्यवाही, सहा गांज्याचे झाडासह ८७,००० रु चे मुददेमालासह एकास घेतले ताब्यात

हिंगोली दि.६ (प्रतिनिधी)- स्थानिक गुन्हे शाखा, हिंगोली व पो.स्टे. हटटा ची संयुक्त कार्यवाही पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि.०१/०५/२०२५ ते दि.३०/०५/२०२५ रोजी पावेतो अंमली पदार्थ विरोधी कारवाईसाठी मोहिम राबवीणेचे आदेश दिले आहे. त्याअनुषंगाने पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे व अपर पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील यांनी हिंगोली जिल्हयात अवैध गांजा लागवड व साठवणुक विरोधात कठोर मोहिम राबवुन कार्यवाही करण्याबाबत पो.नि. श्री. विकास पाटील, स्था. गु.शा. हिंगोली व जिल्हयातील सर्व



ठाणेदार यांना सुचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि.विकास पाटील यांना गोपनिय बातमी मिळाली की पो.स्टे. हटटा हददीत मौजे रांजोना शिवारात एका भुईमुंगीच्या शेतामध्ये अवैधपणे लागवड केलेले सहा गांज्याचे झाडे आहेत. त्याअनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत सपोनि. शिवसांब घेवारे व पथक यांना सुचना दिल्याच्या अनुषंगाने स्था.गु.शा. व पो.स्टे.चे सपोनि. संग्राम जाधव असे संयुक्तरीत्या मौजे रांजोना शिवारात शेत गट क्रमांक ७२ मधील वहितीदार रामदास विठठल साळवे, रा. रांजोना, ता. वसमत याच्या शेतात छापा मारला असता सदर ठिकाणी अंदाजे सोडतीन ते चार फुट उंचीची ओली ०६ झाडे ४.३७० किलोग्रॅम वजनाचे अंदाजीत किंमती ८७ हजार रूपयाचे मिळून आल्याने कायदेशीररीत्या जप्त करून शेती वहितीदार रामदास विठठल साळवे, वय ३५ वर्ष, रा.रांजोना, ता. वसमत, जि. हिंगोली याच्याविरूध्द एन.डी.पी.एस. कायदा १९८५ कलम ८ (अ), ८ (ब), २० (ब) () (ब) अन्वये गुन्हा दाखल करून आरोपीस अटक करण्यात आली आहे.

हिंगोली पोलीसांव्दारे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की गांजा व तत्सम गुंगीकारक पदार्थ बेकायदेशीरपणे कुणीही लागवड करू नये किंवा बाळगु नये अन्यथा कठोर कार्यवाही करण्यात येईल.

सदरची कार्यवाही प्रभारी पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी राजकुमार केंदे, पो. नि. विकास पाटील, स्था.गु.शा. यांच्या मार्गदर्शनाखाली स्था. गु.शा. चे सपोनि. शिवसांब घेवारे, सपोनि. संग्राम जाधव, पो.स्टे. हटटा, पोलीस अंमलदार कृष्णा चव्हाण, नितीन गोरे, गजानन पोकळे, आकाश टापरे, नरेंद्र साळवे, आझम प्यारेवाले, साईनाथ कंठे, हरिभाऊ गुंजकर, प्रितम चव्हाण, दिंडे, आसीफ, सुरूसे यांनी केली आहे.

# भारत-पाकिस्तान सीमेवर घुसखोरीचा प्रयत्न उधळला, पाकिस्तानी व्यक्तीला अटक

श्रीनगर दि.६ (वृत्तसंस्था)- जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव निर्माण झाल्याची परिस्थिती पाहायला मिळत आहे. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारत पाकिस्तानच्या विरोधात कठोर भूमिका घेत आहे. भारताने पाकिस्तानच्या विरोधात अनेक मोठे निर्णय घेत पाकिस्तानची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. तसेच पाकिस्तानमधून होणाऱ्या आयातीवरही भारताने बंदी घातली आहे.

भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढल्यामुळे भारतीय लष्कर कधीही कारवाई करू शकतं, या भितीने पाकिस्तानची चलबिचल वाढल्याचं पाहायला मिळत आहे. असं असतानाच भारत-पाकिस्तान सीमेवर घुसखोरीचा प्रयत्न करण्यात येत असल्याची तिसरी घटना समोर आली आहे. भारतात प्रवेश करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आणखी एका पाकिस्तानी व्यक्तीला पकडण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.

जम्मू आणि काश्मीरच्या पूंछ सेक्टरमधील नियंत्रण रेषेवर (एलओसी) एका पाकिस्तानी नागरिकाला मंगळवारी अटक करण्यात आली आहे. गेल्या काही दिवसातील ही तिसरी घटना आहे. काही दिवसांपूर्वी एका पाकिस्तानी रेंजरला अटक करण्यात आली होती.

Made with Xodo PDF Reader and Editor

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## तुळजापूरात वधू-वर परिचय मेळाव्याच्या आयोजनाची जय्यत तयारी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.६ मे -**

मराठा समाजातील तरुण-तरुणींसाठी सकल मराठा समाज यांच्या विद्यमाने आयोजित वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन केले आहे. येत्या रविवार २५ मे रोजी मोफत व भोजन व्यवस्थेसह सकाळी ९ ते सायंकाळी ४ या वेळेत हा मेळावा तुळजापूर येथील नळदुर्ग रोडवरील श्रीनाथ मंगल कार्यालयात होणार आहे. यामध्ये वधूं-वरांना कुठलीही नावनोंदणी फी द्यावी लागणार नाही.



मराठा समाजातील वधू वर व पालकांनी या मेळाव्यास उपस्थित राहताना प्रत्यक्ष वधूवरांनी उपस्थित राहावे लागणार आहे. या मेळाव्यात, वधू आणि वर यांच्या कुटुंबीयांनी एकमेकांना ओळख करून द्यायची आहे. यामध्ये प्रामुख्याने नाव, वय, शिक्षण, व्यवसाय आणि कौटुंबिक पार्श्वभूमी यासारखी माहिती द्यायची आहे.

तसेच मेळाव्यास येताना त्यांनी येताना दोन प्रतीमध्ये बायोडाटा व आयकार्ड साईज दोन सोबत घेऊन उपस्थित राहावे असे आवाहन, असे आवाहन संयोजकांनी आहे.

बुधवार, ७ मे २०२५

https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त...

### स्वाधार योजनेसाठी त्रुटीपुर्ततेची अंतिम मुदत १५ मे पर्यंत वाढ

**धाराशिव, दि.६ मे -**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेअंतर्गत शासकीय वसतिगृहात प्रवेश न घेतलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील इयत्ता ११ वी, १२ वी तसेच व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास व निर्वाह भत्ता तसेच इतर शैक्षणिक सुविधा प्रदान केल्या जातात. या योजनेसाठी अर्ज प्रक्रियेसंबंधी सर्व कामकाज https://hmas.mahait.org या पोर्टलवर ऑनलाइन पद्धतीने पार पडत आहे. २०२४-२५ या वर्षासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांपैकी १२० विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटीपूर्ण असल्याचे निदर्शनास आले आहे. यासंदर्भात संबंधित विद्यार्थ्यांना फोन व पत्राद्वारे संपर्क साधूनही अद्याप त्रुटीपुर्तता झालेली नाही. तरी अशा विद्यार्थ्यांनी दि.१५ मेपर्यंत अर्जाची हार्डकॉपी व आवश्यक कागदपत्रांचा संच समाज कल्याण कार्यालय,धाराशिव येथे जमा करावा. अन्यथा त्यांचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल, याची नोंद घ्यावी. अर्ज सादर करताना कोणतीही अडचण असल्यास सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, धाराशिव यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहनबाबासाहेब अरवत, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, धाराशिव यांनी केले आहे.

### परदेश शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याची मुदत आता २० मे पर्यंत

**धाराशिव, दि.६ मे -**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत दरवर्षी अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परदेशातील पदव्युत्तर पदवी,पदविका आणि पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता अर्ज करण्याची अंतिम तारीख पूर्वी ३० एप्रिल होती. तथापि समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या निर्देशानुसार अर्जाची अंतिम मुदत वाढवून २० मे पर्यंत करण्यात आली आहे. यासंदर्भात सविस्तर माहिती महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी आपले अर्ज दिनांक २० मे २०२५ रोजी संध्याकाळी ६१५ वाजेपर्यंत ,समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च रोड, पुणे या पत्त्यावर सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त बाबासाहेब अरवत यांनी केले आहे.

# तुळजापूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास शिखर समितीची मान्यता

**विकास आराखड्याचे काम पुढील तीन वर्षात टप्प्याटप्प्याने केले जाणार...**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.६ मे -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेच्या तुळजापूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नांच्या पाठपुराव्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीने मान्यता दिली. मागील सहा महिन्यापूर्वी पासून तुळजाभवानी मंदिर जीर्णोद्धाराचे काम सुरू करण्यात आले असून प्राचीन रूप तसेच ठेवून मंदिराचा जीर्णोद्धार केला जात आहे. शिखर समितीच्या मान्यतेमुळे तीर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या कामांना आता गती मिळणार आहे



तुळजापूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी १८६० कोटी रुपये मंजूर करण्यात आले असून यामुळे तुळजाभवानी मंदिरासह संपूर्ण देखील शहराचा कायापालट होणार आहे. मागील महिन्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तुळजापूर दौऱ्यावर आले असता, त्यांच्यासमोर विकास आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले होते. यावेळीच मुख्यमंत्र्यांनी नियोजित विकासाचे कौतुक करून त्यामध्ये काही सूचना आणि सुधारणा सुचवल्या होत्या.

त्याचवेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी या विकास आराखड्यास तत्वतः मान्यता दिली होती. त्यानंतर दि.६ मे रोजी झालेल्या बैठकीत शिखर समितीने या आराखड्यास अंतिम मान्यता दिली आहे. मंदिराचे हे विकास आराखड्याचे काम पुढील तीन वर्षात टप्प्याटप्प्याने केले जाणार आहे. मंदिराच्या आसपास राहणाऱ्या नागरिकांच्या जमिनीचे भूसंपादन करण्यात येणार आहे. यामध्ये सर्व नागरिकांना विश्वासात घेऊन आणि योग्य मावेजा देऊन हा विकास आराखडा राबविण्यात येणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे. तुळजापूर तीर्थक्षेत्र विकासासाठी एवढ्या मोठ्या प्रमाणावर निधी मिळण्याची ही पहिलीच वेळ आहे.



श्रीक्षेत्र तुळजापूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास मान्यता दिल्याबद्दल आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांचे आभार मानले.

विकास आराखड्यास मान्यता दिल्याबद्दल आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांचे आभार मानले आहेत.

# पुजारी नगरला पाणी पुरवठा करणारी मुख्य पाईपलाईन जळाली

**नगरपालिका प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन पाणी पुरवठा सुरळीत करावा...**





**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.६ मे -**

नळदुर्ग रोड लगत असणारी पाणी फिल्टर टाकी शेजारील पुजारी नगर भागाला पाणी पुरवठा करणारी ६ इंची मुख्य पाईप लाईन ५ मे रोजी सायंकाळी ७ सुमारास सुटलेला वारे वादळात विद्युत तारेची स्पार्किंग होऊन ठिणग्या पडल्या टाकी परिसरात असणाऱ्या गवताला पेट घेत उघड्यावर असणारी पाईप लाईन जळून खाक झाली.

फिल्टर टाकी कंपाऊंडच्या आतमध्ये असणारी पाईप लाईन जवळपास ७० ते ८० फूट जळून गेली आहे.

त्यामुळे पुजारी नगर भागाला होणारा पाणी पुरवठा खंडित झाला आहे. पुजारी नगर सोसायटी अंतर्गत जवळपास १५० कुटुंब निवासी वास्तव्यास आहेत. झालेल्या घटनेची दखल घेऊन नगरपालिका प्रशासनाने पाणी पुरवठा सुरळीत करावा अशी मागणी रहिवासी करत आहेत.

पुजारी नगर असो किंवा नळदुर्ग रोड लगतच्या भागात मुख्य रोड लाईट खांबावरील विद्युत तारा या सैल झाल्या असून त्यामुळे कायम स्वरूपी वारे सुटल्यास एकमेकांना स्पार्क होऊन ठिणग्या पडत असमुळे नागरिकांत भीतीचे वातावरण आहे. एमएसईबी विभागाने याबाबत सर्व्हे करून विद्युत वाहिनीची देखभाल दुरुस्ती करावी.

> पुजारी नगर सोसायटीला पाणी पुरवठा करणारी पाईप लाईन कालच्या वादळात स्पार्किंग होऊन जळाली आहे. त्यामुळे पाणी पुरवठा खंडित झाला आहे, नगरपालिका पाणी पुरवठा विभागाने व लोकप्रतिनिधी यांनी तात्काळ दखल घेऊन पाणी पुरवठा सुरळीत करावा.
>
> **- गणेश पुजारी,**
> अध्यक्ष पुजारी नगर फाऊंडेशन

## सर्व रेशनकार्डधारकांसाठी ई-केवायसीची अंतिम मुदत ३० जूनपर्यंत

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ मे -**

सार्वजनिक वितरण प्रणालीतील सर्व रेशनकार्डधारकांची ई-केवायसी प्रक्रिया राज्य शासनाच्या निर्देशानुसार सध्या सुरू असून, केंद्र शासनाच्या २ मे २०२५ रोजीच्या पत्रानुसार ही प्रक्रिया ३० जून २०२५ पर्यंत पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

या तारखेनंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही. तसेच, ज्या कार्डधारकांची ई-केवायसी पूर्ण झालेली नसेल, अशा कार्डधारकांना जुलै २०२५ पासून अन्नधान्याचे वितरण करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी. ई-केवायसी करण्यासाठी दोन पर्याय उपलब्ध आहेत. जवळच्या रेशन दुकानात जाऊन मोबाईल ॲपच्या माध्यमातून स्वतः ऑनलाईन प्रक्रिया करता येईल.

या प्रक्रियेसाठी केंद्र शासनाने Mera e-KYC Mobile pp AmUadhar Face RD Service pp सुरू केली आहेत. या ॲप्सचा वापर करण्याची पद्धत पुढीलप्रमाणे आहे. गुगल प्ले स्टोअरवरून दोन्ही ॲप्स डाऊनलोड करून इन्स्टॉल करा. Mera e-KYC ॲप उघडा, राज्य व ठिकाण निवडा. आधार क्रमांक टाका व आलेला OTP भरून सबमिट करा. माहिती पडताळा करून "Submit' H$am.Z§Va "Face E-KYC' वर क्लिक करून डोळे हलवत सेल्फी द्या. प्रक्रिया यशस्वी झाली की, "E-KYC पूर्ण' असा संदेश दिसेल.

तरी सर्व रेशनकार्डधारकांनी ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी, असे आवाहन स्वाती शेंडे यांनी केले आहे.

# गंधोरा येथे माजी विद्यार्थ्याचा स्नेह मेळावा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग दि.६ मे -**

गंधोरा (ता. तुळजपुर) येथील इंदिरा गांधी विद्यालय या शाळेतील माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा रविवार दि.४ मे रोजी विद्यालयात संपन्न झाला. सन २००५-६ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थी तब्बल २० वर्षांनी एकत्र जमले. यावेळी सर्वांनी शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा देत सध्याची सुरू असलेली वाटचाल याबाबत सविस्तर चर्चा केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त मुख्याध्यापिका रावाबाई पवार या होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणुन शाळेचे मुख्याध्यापक धनराज बरबडे, शिक्षक श्रीनिवास भोसले, शिवाजी वऱ्हाडे, महादेव तुप्पे, नंदिनी आलुरे, यशवंतप्पा कोरे, उत्तम बणजगोळे, यादव भोसले, गुलाब राठोड यांच्यासह माजी विद्यार्थी सुशीलकुमार कुलकर्णी, मुनाईम शेख, संदीप कुंभार, दशरथ तुळजापुरे, शिवाजी एकंडे, विनोद एकंडे, विश्वनाथ एकंडे, सदानंद भोसले, विनोद भोसले, राहुल काटे, पांडुरंग कुलकर्णी, रीयाज शेख, जलील शेख, अमीर शेख, समीर मकानदार, गणेश सोनटक्के, सर्जेराव सोनटक्के, बाळु वाडे, सुनील जाधव, केशव देडे, नसरुद्दीन शेख, रेशमा जाधव, राधिका गिरी, सारिका तिघाडे, अंजना नन्नवरे, चंद्रभागा माने, मनीषा पवार, नागरबाई कांबळे, रूपाली इंगोले, सुलोचना टकले उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांच्या वतीने शाळेस स्पीकर सेट भेट देण्यात आला.

प्रास्ताविक व सुत्रसंचलन सुशीलकुमार कुलकर्णी, आभार दशरथ तुळजापुरे यांनी मानले.

## वाशीत अवैध मद्य विरोधी कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.६ मे -**

वाशी पोलीस ठाण्याच्या पथकाने अवैध मद्यविक्रीविरोधात कारवाई करत युवकाकडून अंदाजे १,६०० रूपये किमतीच्या देशी व विदेशी दारूच्या २० सिलबंद बाटल्या जप्त केल्या आहेत.

श्रीकांत चंद्रकांत लगाडे (वय १९ वर्षे, रा. आदर्शनगर, वाशी) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, दि.५ मे रोजी दुपारी सुमारे २.२० वा. वाशी येथील पारा चौकाजवळ त्याच्याकडून अवैध विक्रीसाठी सदर दारू बाळगण्यात आली होती.

## नळदुर्गच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचा १२ वीचा निकाल ९५.९४ टक्के

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.६ मे -**

नळदुर्ग येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचा बारावी परीक्षेचा निकाल ९५.९४ टक्के लागला आहे.

महाविद्यालयातील कला शाखेचा निकाल ९२.९० टक्के लागला आहे. या शाखेच्या १५५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. यापैकी १४४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये ज्योती गरड ८१.३३, अवंत लोहार ७५.१७ तर अत्तरी अबुजयी या विद्यार्थीनीने ७३ टक्के गुण मिळवत अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला आहे.



विज्ञान शाखेचा निकाल ९९.१५ टक्के लागला आहे. या शाखेच्या २३५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती यापैकी २३३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये निर्भय देशमुख ८८ टक्के, कादंबरी घंटे ८५.६७ टक्के व शिवानी घोडके ८५.३३ टक्के गुण मिळवत अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला आहे. वाणिज्य शाखेचा निकाल ९३.२० टक्के लागला आहे. या शाखेच्या १०३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. यापैकी ९६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये सानिया शेख ७५.८० टक्के, निशा पवार ७४ टक्के, व विठ्ठल चव्हाण ७१ गुण मिळवत अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे बालाघाट शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व राज्याचे माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, सचिव उल्हास बोरगावकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष राठोड, अधीक्षक धनंजय पाटील यांनी कौतुक केले आहे.

# पवनचक्कीच्या वाहनांमुळे धूळ उडून रेशीम उद्योग करणाऱ्या शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान


**शेतकऱ्याने जिल्हाधिकाऱ्याकडे धाव घेत नुकसान भरपाई केली मागणी... आता जिल्हाधिकारी काय निर्णय घेणार?...**

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.६ मे -**

वाशी तालुक्यात सध्या अनेक पवनचक्की कंपन्यांनी धुमाकूळ घालून सोडला आहे. मोठ्या प्रमाणात पवनचक्की उभारण्याची कामे सुरू आहेत. विना परवानगी रस्त्यालगत असलेल्या शासनाच्या झाडांची कत्तल पवनचक्क्या कडून केली जात आहे. रस्त्यावर अवजड वाहनांची वाहतूक करत रस्त्याची प्रचंड दुरवस्था केली जात असताना याकडे संबंधीत प्रशासनाकडून कुठलीही कारवाई केली जात नसल्याने अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केला जात आहे.

याप्रकारात तरुण भारत पेपरने वेळोवेळी वास्तव समोर आणले. तरी देखील अधिकाऱ्यांनी पवनचक्क्या कंपन्यांकडे पाठ फिरवली असल्यामुळे कंपन्यांची मग्रुरी आता वाढली आहे. तालुक्यातील खामकरवाडी या ठिकाणी पवनचक्की उभारणी सुरू आहे. कंपनीकडून उभारण्यासाठी लागणाऱ्या साहित्याची शेतातून अवजड वाहतूक केली जात आहे.

त्यामुळे धूळ उडून रस्त्यालगत असलेल्या शेतकऱ्याच्या पिकाचं नुकसान होत आहे. खामकरवाडी हे गाव सध्या रेशीम उद्योगांमध्ये महाराष्ट्रात आघाडीवर आहे. येथील रेशीमला परराज्यातून मोठी मागणी केली जाते. चांगला भाव आणि अधिक उत्पादन मिळत असल्याने गावातील ९० टक्के शेतकरी रेशीम शेती करत आहेत. रेशीम उद्योग पाहण्यासाठी विभागीय आयुक्त यांच्यासह जिल्हाधिकारी, कृषी अधिकाऱ्यांनी अनेकदा गावाला भेटी देऊन खामकरवाडी रेशीम उद्योग जिल्ह्याभरासह महाराष्ट्रात राबवण्याचा पॅटर्न सुरू केला आहे. मात्र आता खामकरवाडी येथील रेशीम उद्योग सध्या पवनचक्कीच्या कारणामुळे अडचणीत सापडला आहे. गावात सेरेंटिका कंपनीची पवनचक्की उभारण्याचं काम



सुरू आहे. पवनचक्की उभारण्यासाठी लागणाऱ्या साहित्याची वाहतून शेतातून जणू काय एक्स्प्रेस हायवे असल्यासारखं सुसाट वेगाने गाड्या पळवल्या जातात.

त्यामुळे वाहनांची शेतातील धूळ उडून शेतकऱ्यांनी रेशीम तयार करण्यासाठी केलेल्या पिकावर व पत्र्याच्या शेडमध्ये जाऊन रेशीम तयार करणाऱ्या अळीला मर लागली आहे. यामुळे शेतकऱ्याचे लाखो रुपये नुकसान झाले आहे. यासंदर्भात पवनचक्की कंपनीच्या अधिकाऱ्यांशी धुळीचा बंदोबस्त करण्यासाठी शेतकऱ्यांनी संपर्क साधला असता पवनचक्की चे अधिकारी शेतकऱ्यांना दमदाटी करत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

झालेली नुकसान भरपाई देण्यात यावी यासाठी शेतकऱ्यांनी आता जिल्हाधिकारी यांच्याकडे धाव घेतली आहे.

खामकरवाडी येथील शेतकरी संभाजी सावंत यांनी सेरिंटिक पवनचक्की कंपनीकडून रेशीम उद्योगाची नुकसान





झालेल्या भरपाईची तक्रार देऊन मागणी केली आहे.

तक्रारीत सावंत यांनी माझे शेत माणिकदंडच्या रस्त्यालगत असून माझी चार एकर रेशीम बाग आहे. सदरील कच्चाच्या रस्त्यावरून सेरंटिका पवनचक्की च्या मोठ्या व अवजड वाहनांची सतत जा-ये होत असून चालू वर्षात पवनचक्कीच्या वाहनांची धूळ येऊन पाच ते सहा लाख रुपये नुकसान झाले आहे. माझ्या रेशीम उद्योगाला धुळीचा मोठा फटका बसला आहे.

तरी पवनचक्कीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्यात यावी, अशी मागणी शेतकरी संभाजी सावंत यांनी केली आहे.

तसेच पवनचक्की कंपनीने नुकसान भरपाई नाही दिल्यास आत्मदहन करणार आहे, असे प्रसार माध्यमांशी सांगितले. आता जिल्हाधिकारी काय कारवाई करतात पाहणे गरजेचे आहे.

Made with Xodo PDF Reader and Editor






## सर्जिकल एक्सेलेन्स मध्ये नवीन युगाची सुरुवात

छत्रपती संभाजीनगर दि.६ (प्रतिनिधी)– मल्टिस्पेशॅलिटी सर्जरीज मध्ये दि एसएसआय मंत्रा सर्जिकल रोबोटिक सिस्टम या अत्याधुनिक अशा पध्दतींची सुरुवात प्रथमच बाणेर येथील मणिपाल हॉस्पिटल मध्ये करण्यात आली असून यामुळे रुग्ण सेवा विभागात आणखी एक आधुनिक पध्दतीची सुरुवात झाली आहे. या नवीन पध्दती मुळे हॉस्पिटल कडून आता अगदी अचूक आणि मिनिमली इन्व्हेझिव्ह शस्त्रक्रिया करता येणार आहेत. यामुळे कार्डिअॅक थोरॅसिस, ऑन्कोलॉजी, युरोलॉजी, गायनॅकोलॉजी आणि जनरल सर्जरी क्षेत्रात नवीन क्रांती झाली आहे. मणिपाल हॉस्पिटल बाणेर ने आता हा आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा पार केला असून यामुळे रोबोटिक असिस्टेड सर्जरी मधील नवीन मार्ग खुला झाला आहे. यामुळे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची त्यांची वचनबध्दता अधोरेखित होऊन रुग्णांच्या सेवेकरता असलेली रुग्णकेंद्रित सेवा देण्याची वचनबध्दता सुध्दा अधोरेखित झाली आहे.

## एचडीएफसी फ्लेक्सी कॅप फंडने बाजाराच्या सर्व चक्रांत उत्कृष्ट कामगिरी केली

मुंबई दि.६ (प्रतिनिधी)– एचडीएफसी फ्लेक्सी कॅप फंड (हा फंड) जो लार्ज–कॅप, मिड–कॅप आणि स्मॉल–कॅप समभागांमध्ये गुंतवणूक करणारी एक ओपन–एंडेड डायनॅमिक इक्विटी योजना आहे या योजनेने विविध बाजारचक्रांमधून गुंतवणूकदारांसाठी दीर्घकालीन संपत्ती निर्माण केली आहे. १ जानेवारी १९९५ रोजी स्थापनेपासून, या फंडाने ३१ मार्च २०२५ पर्यंत १८.८२% वार्षिक सरासरी संमिश्र वाढ दर (सीएजीआर) नोंदवली आहे. स्थापनेपासून १,००,००० ची गुंतवणूक सुमारे १.८४ कोटींवर पोहोचली असती, जी बेंचमार्क निफ्टी ५०० टीआरआय पेक्षा १.५१ कोटींनी अधिक आहे. तसेच, जर स्थापनेपासून प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व्यवसायदिवशी १०,००० ची एसआयपी (सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन) केली गेली असती (एकूण गुंतवणूक ३६.२० लाख), तर ती गुंतवणूक ३१ मार्च २०२५ पर्यंत सुमारे २०.२४ कोटी झाली असती.

## वाढदिवस अनेक सरप्राइजेजनी भरलेला होता!

मुंबई दि.६ (प्रतिनिधी)– एण्ड टीव्हीवरील मालिका 'भाबीजी घर पर हैमध्ये अनिता भाबीची भूमिका साकारण्यासाठी लोकप्रिय असलेल्या विदिशा श्रीवास्तव यांनी नुकतेच स्वत:चा वाढदिवस साजरा केला, जेथे प्रेम, आनंदाचे वातावरण होते आणि त्यांना हृदयस्पर्शी सरप्राइजेज देखील मिळाले. त्यांनी शांतपणे वाढदिवस साजरा करण्याचे नियोजन केले होते, पण हा दिवस संस्मरणीय ठरला, जो त्यांच्या कायमस्वरूपी स्मरणात राहिल.

## खऱ्या मातांकडून प्रेरणा

मुंबई दि.६ (प्रतिनिधी)– या मदर्स डे च्या निमित्ताने सोनी सबचे कलाकार एकमुखाने आपल्या जीवनातील दोन मातृ मूर्तींना आदरांजली वाहत आहेत– त्यांची जन्मदात्री माता आणि पडद्यावरची माता, जी दीर्घ काळ एकत्र काम केल्यानंतर कुटुंबाचा भाग होऊन जाते! देशना दुगड, दर्शन गुर्जर, चिन्मयी साळवी आणि कृष्ण भारद्वाज हे कलाकार सांगत आहेत या दोन्ही अद्भुत महिलांकडून त्यांना मिळणाऱ्या प्रेमाबद्दल, समर्थनाबद्दल आणि प्रेरणेबद्दल. पडद्यामागच्या आठवणींपासून ते सेटवर जोपासल्या गेलेल्या नात्यापर्यंत या दोन्ही मातांनी त्यांच्या व्यक्तिगत आणि व्यावसायिक जीवनाला कसा आकार दिला आहे, याबाबत ऐकू या प्रत्यक्ष कलाकारांकडून – पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत चिरागची भूमिका करणारा दर्शन गुर्जर म्हणतो, ''माता ह्या खरोखर आपल्या जीवनातील स्पंदन असतात.

## 'वसुधा'मध्ये नवीन नाट्य उलगडणार

मुंबई दि.६ (प्रतिनिधी)– झी टीव्हीवरील 'वसुधा' ही मालिका आपली रोचक कथा आणि बळकट व्यक्तिरेखा यांसह प्रेक्षकांचे मन जिंकत आहे. ह्या मालिकेत हल्लीच नाट्य अधिक रंगतदार झाले जेव्हा चंद्रिका (नौशिन अली सरदार) वर पत्रकार परिषदेमध्ये जवळजवळ बंदूक ताणण्यात आली. आणि आता आणखी मोठे वळण पाहायला मिळणार आहे.

## १० पैकी ७ गंभीर दम्याचे प्रकरण अद्याप निदान झालेले नाहीत– डॉ. नितीन चित्ते

छत्रपती संभाजीनगर दि.६ (प्रतिनिधी)– इनहेलेशन थेरपीचे महत्त्व आणि सुलभ उपचारांच्या गरजेवर जोर देऊन दम्याच्या व्यवस्थापनाची प्राथमिक उद्दिष्टे म्हणजे लक्षणे नियंत्रित करणे, बचाव औषधांवरील अवलंबित्व कमी करणे, रुग्णालयात दाखल होण्यापासून रोखणे आणि फुफ्फुसांचे कार्य राखणे – शेवटी जीवनाची गुणवत्ता सुधारणे हे उद्दिष्ट आहे. हे परिणाम साध्य करण्यासाठी वेळेवर निदान करणे, योग्य इनहेलरचा वापर आणि सातत्यपूर्ण अनुपालन आवश्यक आहे. दुर्दैवाने, या क्षेत्रांना अनेकदा खराब उपकरण तंत्रज्ञान, काळजीची मर्यादित उपलब्धता आणि दीर्घकालीन मदतीचा अभाव यामुळे अडथळा येतो. ५, १ब्रीदफ्री सारख्या उपक्रमांनी ऑन–ग्राउंड स्क्रीनिंग कॅम्प, डिजिटल एज्युकेटर प्लॅटफॉर्म सारखी ऑनलाइन साधने आणि सोप्या कसे करावे डिव्हाइस प्रशिक्षण व्हिडिओंद्वारे ही अंतरे भरून काढण्यास मदत केली आहे. ही संसाधने रुग्णांना आणि काळजीवाहूंना दम्याच्या चांगल्या नियंत्रणासाठी मार्गदर्शन करण्यात वास्तविक फरक असल्याचे कन्सल्टंट चेस्ट फिजिशियन आणि इंटरव्हेंशनल पल्मोनोलॉजिस्ट डॉ. नितीन चित्ते म्हणाले , काळजीतील अंतर भरून काढण्यासाठी जागरूकतेच्या भूमिकेवर प्रकाश टाकताना, डॉ. यांनी टिप्पणी केली: ''भारतात दम्याबद्दल मोठ्या प्रमाणात गैरसमज आहेत. इनहेलरच्या वापराविषयीच्या गैरसमजांमुळे आणि त्या आजाराचे नाव न सांगण्याची अनिच्छा यामुळे अनेकदा निदान आणि उपचारांमध्ये विलंब होतो. या आव्हानांवर उपाय केवळ वैद्यकीय हस्तक्षेपांच्या पलीकडे जातात – त्यांना सतत जागरूकता, लवकर शिक्षण आणि सार्वजनिक आणि खाजगी दोन्ही क्षेत्रांकडून सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता असते जेणेकरून दमा ओळखला जाईल, स्वीकारला जाईल आणि प्रभावीपणे उपचार केला जाईल असे वातावरण निर्माण होईल.

ते पुढे म्हणाले: ''बेरोक जिंदगी सारख्या जागरूकता कँपेन आणि टफीज की स्कूल यात्रा यासारखे तळागाळातील प्रयत्न अचूक माहिती पसरवून आणि जलद हस्तक्षेपाला प्रोत्साहन देऊन अर्थपूर्ण प्रगती करत आहेत – विशेषत: मुले, काळजीवाहू आणि कुटुंबांमध्ये''

# सोयगाव येथे तालुकास्तरीय खरीप हंगामपूर्व कार्यशाळेचे आयोजन संपन्न

सोयगाव दि.६ (प्रतिनिधी)– शहरातील कोविड सेंटर सोयगाव येथे तालुकास्तरीय खरीप हंगामपूर्व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते यात प्रामुख्याने खरीप हंगामातील विविध पिकांमधील लागवडीचे तंत्रज्ञान ते काढणी तंत्रज्ञान व काढणी पश्यात तंत्रज्ञान याविषयी माहिती देण्यात आली.आजच्या कार्यशाळेसाठी हिमायत बाग फळ संशोधन केंद्र छत्रपती संभाजीनगर येथील प्रमुख शास्त्रज्ञ डॉ.संजय पाटील सोयगावकर यांनी कापूस पिकावरील बोंडआळीचा जीवनक्रम व व्यवस्थापन,दुष्काळ परिस्थितीत फळबागांचे संगोपन,बदलत्या हवामानानुसार पिक पद्धती व पिक नियोजनातील बदल, बी.टी.वाणाबाबत माहिती याविषयी मार्गदर्शन केले.कृषी विज्ञान केंद्र,बदनापूर,जालना येथील विषय विशेषज्ञ डॉ.दिपक कच्छवे यांनी कापूस,मका, सोयाबीन व तूर पिकाचे लागवड तंत्रज्ञान,दादा लाड कापूस लागवड तंत्रज्ञान,कापूस




पिकातील गळ फांदी काढण्याचे महत्व,माती परीक्षण व बिजप्रक्रीया,खत व पाणी व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले.तालुका कृषी अधिकारी रमेश गुंडीले यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांगितले तसेच महाडीबीटी योजना,पी.एम. किसान योजना, अॅग्रीस्टॅक योजना याविषयी माहिती दिली. हेमंत देशमुख यांनी प्रधानमंत्री पिक विमा योजना,गोपीनाथ मुंडे अपघात विमा सानुग्रह अनुदान योजना,पिक कापणी प्रयोग याविषयी माहिती दिली.आजच्या कार्यक्रमाचे सूत्र संचालन कृषी पर्यवेक्षक समाधान चौधरी यांनी केले.तर कार्यक्रमास सोयगाव तालुका कृषी अधिकारी कार्यालायातील कृषी पर्यवेक्षक प्रदीप पाटील,अतुल पाटील,किशोर महाजन तसेच कृषी सहाय्य्यक विजय निकुंभ,कैलास कुमावत, प्रशांत जाधव,अर्जुन सुरळकर,हितेश झाडे,राधिका साळुखे, सरला चव्हाण,आरती बावस्कर,कविता अहिरराव,ललिता सावळे,पूनम सोळके,वैष्णवी नन्नावरे,वैष्णवी भगत,अक्षय सावसक्के,योगेश पवार कार्यक्रमाचे आयोजन मयूर बारी कृषी सहाय्यक मोलखेडा व विश्वजित तायडे कृषी सहाय्यक आमखेडा यांनी केले.शेतकरांच्या वतीने सोयगाव शहरातील समाजसेवक तथा कृषीभुषण आरूण सोहणी यांनी आभार प्रर्दशन केले.कार्यक्रमासाठी तालुक्यातील विविध गावतील प्रगतीशील शेतकरी,गावाचे सरपंच,ग्रामपंचायत सदस्य व इतर शेतकरी उपस्थित होते.



महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता आठवी परीक्षेत आरंभ कोचिंग क्लासेस चे विद्यार्थी साई योगेश बोखारे सोयगाव व वेदिका गणेश पवार जरंडी उत्तीर्ण झाले.या विद्यार्थ्यांचा सत्कार आरंभ कोचिंग क्लासेस संचालक प्रणय कुलकर्णी, योगेश काळे सह बबलू सोहणी यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## भागवताचार्य ह.भ.प.सुदाम महाराज सुर्यवंशी यांचे निधन

सोयगाव दि.६ (प्रतिनिधी)– सोयगाव तालुक्यातील वरठाण येथील युवा किर्तनकार भागवताचार्य ह.भ.प.सुदाम (महाराज) चिंधा सुर्यवंशी (वय. २४) यांचे रविवारी मध्यरात्री १२ वाजुन १५ मिनिटांनी अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांच्यावर अंत्यसंस्कार सोमवारी सकाळी दहा वाजता करण्यात आला.



ह.भ.प.सुदाम महाराज यांचे १२ वी पर्यंत शिक्षण झाल्यानंतर त्यांना भजनाची गोडी लागली त्यानंतर गावातील मंदीरावर हरीपाठ घेण्यात सुरवात केली

सहकारी सोबत किर्तन जात किर्तनाची गोडी निर्माण झाली काही दिवसानंतर युवा किर्तनकार म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली मराठवाडासह खान्देश,विदर्भात आदी ठिकाणच्या खेड्यापाड्यात वरठाण गावाचे नाव युवा किर्तनकार सुदाम महाराज यांनी आपल्या वेगळ्याच शेलीत किर्तन करीत नाव गाजविले होते युवा किर्तनकार व उत्कृष्ट कीर्तनकार म्हणून त्याना विविध ठिकाणी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.कीर्तनापाठोपाठ समाजप्रबोधन,स्त्रीभ्रूणहत्या,ग्राम स्वच्छता अभियान,झाडे लावा झाडे जगवा असा उपदेश नेहमी आपल्या कीर्तनातून तसेच रील बनवुन देत असत तसेच भागवत कथा देखील वाचन करीत होते अचानक गेल्या एक वर्षापूर्वी त्यांना कर्करोग आजाराने ग्रस्त झाले त्या दिवसापासुन त्यांच्यावर उपचार सुरू होते पण रविवारी मध्यरात्री १२ वाजुन १५ मिनिटांनी त्यांची प्राणज्योत मालवली गेल्या सहा वर्षांपासून सुदाम महाराज किर्तन करीत होते त्याच्या अत्यंत शांत व मनमिळावू स्वभाव तसेच सर्वाना चांगलाच उपदेश देणे व नेहमी भगवंतांचे स्मरण करणे अशी युवा किर्तनकार महाराज यांचे ह्या अत्यंत दुःखद निधनाने वरठाण सह परीसरात शोककळा पसरली. वरठाण येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर सोमवार (दि.५) सकाळी दहा वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या अंत्ययात्रेला मोठा जनसमुदाय उपस्थित होता. त्यांच्या पश्चात आई,वडील,एक भाऊ,एक बहीण,असा परिवार आहे.

## छत्रपती संभाजीनगर परिमंडलात पीएम–सूर्यघर योजनेचे १५ हजार लाभार्थी

छत्रपती संभाजीनगर दि.६ (प्रतिनिधी)– दरमाह तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्नही मिळावे यासाठी केंद्र सरकारने सुरू केलेल्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेस वीजग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. वर्षभरात या योजनेचा महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील जवळपास १५ हजार ग्राहकांनी लाभ घेतला आहे. त्यांच्या छतावर ५३.४ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा संच बसवून वीज निर्मिती केली जात आहे.

घराच्या छतावर १ ते ३ किलोवॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाद्वारे घरगुती ग्राहकांना दरमहा सुमारे १२० ते ३६० युनिट वीज मोफत मिळविण्याची संधी प्रधानमंत्री सूर्यघर योजनेत मिळत आहे. घरगुती वीज ग्राहकांना छतावर सौर ऊर्जानिर्मिती संच बसवता यावा यासाठी विविध बँकांकडून सवलतीच्या व्याजदराने कर्जाची सोय उपलब्ध आहे तसेच कर्जाची प्रक्रियाही सुलभ करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यास ग्रामीण ग्राहकांना प्रोत्साहन देणाऱ्या ग्रामपंचायतींना प्रोत्साहन निधीही देण्यात येणार आहे. याबरोबरच महावितरणकडून १० किलोवॅटपर्यंतच्या अर्जांना स्वयंचलित मंजुरी देण्यात येत आहे तसेच सौर नेटमीटरदेखील उपलब्ध करून देण्यात येत आहे. योजनेत कार्यान्वित झालेल्या सौर प्रकल्पांतून निर्माण झालेली वीज ग्राहकांना वापरता येते. शिवाय ग्राहकाची गरज भागवून वीज शिल्लक राहिल्यास महावितरणकडून ती विकत घेण्यात येत आहे. त्याची रक्कम संबंधित ग्राहकांच्या वीजबिलात समायोजित केली जात आहे. छतावरील सौर ऊर्जा प्रकल्पासाठी केंद्र सरकारकडून घरगुती वीजग्राहकांना एक किलोवॅटसाठी ३० हजार रुपये, दोन किलोवॅटसाठी ६० हजार रुपये आणि तीन किलोवॅट आणि त्यापेक्षा जास्त क्षमतेसाठी कमाल ७८ हजार रुपये अनुदान थेट मिळत आहे.



## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून सारथी संस्थेच्या नव्या इमारतीची पाहणी

छत्रपती संभाजीनगर दि.४ (प्रतिनिधी)– राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री अजित पवार यांनी आज शहरातील दत्ताजी भाले रक्तपेढी जवळ नव्याने बांधण्यात येत असलेल्या छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेच्या अर्थात सारथीच्या इमारतीची पाहणी केली. यावेळी उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी नवीन इमारतीच्या कामाबाबत माहिती जाणून घेतली. तसेच या कामाच्या प्रगतीचा आढावा घेतला. यावेळी श्री. पवार म्हणाले, छत्रपती संभाजीनगर येथे सारथी संस्थेचे सुरू असलेले काम दर्जेदार झाले पाहिजे. रेन वॉटर हार्वेस्टिंग, सौर ऊर्जा यंत्रणा व संस्थेच्या परिसरात वृक्षारोपण करा, असे सांगतानाच त्यांनी कामाची पाहणी करून आवश्यक त्या सूचना दिल्या.

यावेळी कार्यकारी अभियंता श्रीमती पुजारी यांनी यांनी सारथी संस्थेच्या सुरू असलेल्या कामाबाबत सविस्तर माहिती दिली.

यावेळी आमदार विक्रम काळे, आमदार सतीश चव्हाण यांच्यासह विभागीय आयुक्त दिलीप गावडे, पुणे विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण, सारथी संस्थेचे प्रभारी उपव्यवस्थापकीय संचालक रामदास दौंड, छत्रपती संभाजीनगर विभागाचे मुख्य अभियंता श्रीनिवास कातकडे, अधीक्षक अभियंता सुंदरलाल भगत, कार्यकारी अभियंता प्रिया पुजारी, जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता योगिता जोशी यांच्या सह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची शशिकांत धोत्रे यांच्या चित्रप्रदर्शनास भेट

छत्रपती संभाजीनगर दि.६ (प्रतिनिधी)– चित्रकलेपासून चित्रपटापर्यंत ! मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांची चित्रकार शशिकांत धोत्रे यांच्या चित्रप्रदर्शनाला भेट, सजना चित्रपटाच्या टिझरला दिली भरभरून दाद !!



महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांनी सुप्रसिद्ध चित्रकार श्री. शशिकांत धोत्रे यांच्या नवनिर्मित चित्रकृतींच्या प्रदर्शनास भेट दिली. या प्रदर्शनात त्यांनी धोत्रे यांच्या विविध कलाकृतींचे मनापासून कौतुक केले आणि त्यांच्या अप्रतिम चित्रशैलीला दाद दिली.

चित्रकार शशिकांत धोत्रे यांच्या कलाप्रदर्शनास भेट देतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तेथेच उपस्थित असलेल्या सजना या आगामी मराठी चित्रपटाच्या टीमकडून चित्रपटाचा टिझरही पाहिला. टिझर पाहिल्यानंतर त्यांनी सिनेमाच्या संकल्पनेचे कौतुक करत संपूर्ण टीमला शुभेच्छा दिल्या आणि उत्सुकता व्यक्त केली.'सजना' चित्रपटासाठी मा. फडणवीस यांनी मराठी सिनेसृष्टीला नवसंजीवनी देणाऱ्या अशा कलाकृती अधिकाधिक यशस्वी होवोत, असे मत व्यक्त केले.

शशिकांत धोत्रे यांचे चित्रकलेतील योगदान हे महाराष्ट्राच्या कलासंस्कृतीसाठी अत्यंत मौल्यवान आहेतच पण त्याचबरोबर सध्या त्यांच्या आगामी चित्रपटाची म्हणजेच 'सजना' ची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहे. प्रेमाच्या विविध पैलूंना उजागर करणाऱ्या आणि प्रेक्षकांना एक नवीन सिनेमॅटिक अनुभव देणाऱ्या या चित्रपटाची निर्मिती स्वतः शशिकांत धोत्रे ह्यांनी केली आहे तर कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन सुद्धा शशिकांत धोत्रे ह्यांनी केलं आहे. सजना सिनेमा २३ मे २०२५ पासून प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी सज्ज आहे.

## देवगड येथे पंधरा दिवसीय नि:शुल्क वारकरी बालसंस्कार शिबीराची जय्यत तयारी

गंगापूर दि.६ (प्रतिनिधी)– गुरूदेव दत्तपीठ श्री क्षेत्र देवगड येथे मुलांवर चांगले संस्कार होण्याच्या उद्देशाने श्रीदत्त मंदिर संस्थान च्या पुढाकाराने पंधरा दिवसीय निःशुल्क वारकरी बालसंस्कार शिबीराचे आयोजन शुक्रवार दि.२३ मे २०२५ ते शुक्रवार दि. ६ जून २०२५ पर्यंत या कालावधीत करण्यात आले असून या शिबिराची जय्यत तयारी सुरू झाली आहे.

श्री समर्थ सद्गुरु किसनगिरीबाबा यांच्या कृपाशिर्वादाने व गुरूवर्य भास्करगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने देवगड संस्थानचे उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली सदरचे निःशुल्क वारकरी बालसंस्कार शिबीर देवगड येथे संपन्न होत आहे.श्री दत्त मंदिर संस्थान यांनी या शिबीराचे आयोजन केले आहे.

शिबिरात सहभागी होण्यासाठी वय १० ते १६ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी प्रवेश राहील,बाहेरगावच्या मुलांची राहण्याची सोय संस्थानच्या वतीने करण्यात आली असून मुलांनी अंथरूण–पांघरून तसेच ताट तांब्या बरोबर आणावे,सर्व मुलांना पांढरा गणवेश परिधान करणे बंधनकारक असून शिबीर काळात भजन, संस्कृत श्लोक, संस्कार प्रवचन शिकविण्यासाठी मान्यवर महाराज शिक्षकांची उपस्थिती या शिबिरात रहाणार आहे. शिबीरामध्ये येतांना आपल्याला जे वाद्य शिकायचे आहे (उदा.पखवाज, हार्मोनियम) हे ज्याचे त्याने बरोबर घेऊन यावे अशा सूचना करण्यात आल्या आहेत.

या शिबिरामध्ये गायनाचार्य कीर्तनकार ह.भ.प. लक्ष्मण महाराज नांगरे,मृदंगाचार्य ह.भ.प.गिरीजानाथ महाराज जाधव, लमृदंगाचार्य ह.भ.प.दादा महाराज साबळे,ह.भ.प.गणेश महाराज तनपुरे,ह.भ.प.शशिकांत महाराज कोरेकर,ह.भ.प.रोहीत महाराज पटारे,ह.भ.प. उमेश महाराज जाधव, ह.भ.प. अमोल महाराज बोडखे हे शिबीरातील विद्यार्थ्यांना शिक्षक म्हणून मार्गदर्शन करणार आहे.



शुक्रवार दि.६ जून २०२५ रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांच्या उपस्थितीत उत्तराधिकारी स्वामी श्री प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या किर्तनाने पंधरा दिवसीय वारकरी बाल संस्कार शिबिराची सांगता होणार आहे. शिबीरामध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी ह.भ.प. लक्ष्मण महाराज नांगरे ९४०४६०५१०९ या भ्रमणध्वनीवर पालकांनी संपर्क साधून आपले नावनोंदणी करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

Made with Xodo PDF Reader and Editor



## अग्रलेख...

# फसवा फतवा आणि बेलगाम जिभा!

कोणत्याही निवडणुकीत सातत्याने होणारा पराभव ही राजकीय पक्षांनी चिंतित होऊन चिंतन करावी अशी बाब असताना, शतकाहूनही अधिक काळाचा इतिहास असलेल्या आणि सहा दशकांहूनही अधिक काळ देशावर सत्ता गाजविणाऱ्या काँग्रेसच्या सध्याच्या नेतृत्वास अशी कोणती चिंता भेडसावत असेल अशी कोणतीही चिन्हे दिसत नसल्याने, या पक्षाच्या भविष्यावरील प्रश्नचिन्ह अधिकाधिक गडद होत जाणार आहे. यामुळेच, इतिहासातील शीखविरोधी दंगलीसह काँग्रेसकडून झालेल्या सर्व चुकांची जबाबदारी स्वीकारून त्याचे प्रायश्चित्त घेण्याची तयारी आज जवळपास चार दशकांनंतर दाखविण्याची राहुल गांधी यांची नवी चाल देशातील जनतेस किती विश्वासार्ह वाटेल हा प्रश्नच आहे. केवळ जनमानसात फोफावत असलेला काँग्रेसविरोधी भावनेचा उद्रेक शमविण्यासाठी आणि सातत्याने ढासळत चाललेली पक्षाची प्रतिमा कसेही करून पुन्हा उजळण्यासाठी आता राहुल गांधी यांनी आपल्या पक्षाच्या चुकांचे प्रायश्चित्त घेण्याचा कांगावा करून कबुलीसत्र सुरू केले असले, तरी पक्षाच्या जनविरोधी भावनांचा पीळ मात्र अजूनही कायमच आहे. जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे गेल्या २२ एप्रिल रोजी झालेल्या भयानक दहशतवादी हल्ल्यानंतर देशात सर्वत्र पाकविरोधी संतापाच्या लाटा उसळत असताना, राहुल गांधींच्या काँग्रेसचे नेते मात्र, निव्वळ राजकारणापायी सत्ताधारी भाजपवर दुगाण्या झाडत पाकिस्तानच्या भूमिकेस प्रोत्साहन मिळेल अशी बेताल वक्तव्ये करत सुटले होते. जनतेच्या भावना संवेदनशील झालेल्या असताना, दहशतवादासारख्या भीषण समस्येविरोधात संपूर्ण देश एकवटलेला असताना आणि केंद्रातील सरकारने कठोर पावले उचलण्याची तयारी सुरू केलेली असताना काँग्रेसमध्ये नेतृत्वाच्या प्रत्येक फळीवर बसलेले वेगवेगळे नेते आपापले सरकारविरोधी सूर आळवण्याच्या स्पर्धेत उतरून पाकिस्तानला पोषक ठरणारी वक्तव्ये करीत राजकारणातील संकुचितपणाचे दर्शन घडविण्यात मग्न होते. उभा देश एका संकटाशी सामना करण्यासाठी सज्ज होत असताना आणि या सामन्याच्या आघाडीवर उतरून देशाची सैन्यदले संपूर्ण तयारीनिशी पाकिस्तानसमोर सज्जड आव्हान उभे करत असताना, काँग्रेसचे नेते मात्र, जनतेच्या आणि लष्कराच्या नीतिधैर्याची खिल्ली उडविण्याचे राजकारण करू लागले होते. त्यांच्या अशा राजकारणातून खुद्द पाकिस्तानलाही या हल्ल्यापासून स्वतःस अलग राखण्याच्या केविलवाण्या प्रयत्नांस बळ मिळत असल्याच्या बातम्या पसरू लागल्या, देशात काँग्रेसी राजकारणाविरोधात नव्या संतापाचा उद्रेक दिसू लागला, तेव्हा या पक्षाच्या नेत्यांनी जाग आल्याचे सोंग घेऊन जारी केलेला फतवादेखील किती फसवा आणि देशातील जनतेच्या डोळ्यात धूळफेक करणारा आहे, हेही आता स्पष्ट होऊ लागले आहे. पहलगाम हल्ल्यानंतर जावई रॉबर्ट वाड्रा, कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या, बी. के हरिप्रसाद, महाराष्ट्रातील काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार, वादग्रस्त वक्तव्ये करून स्वपक्षाला सातत्याने अडचणीत आणणारे नेते म्हणूनच प्रसिद्ध असलेले मणिशंकर अय्यर आदी नेत्यांनी जी काही मुक्ताफळे उधळली, त्यामुळे पुन्हा एकदा पक्षाची जनमानसातील उरलीसुरली प्रतिमादेखील पुसली जाण्याची जाणीव झाल्याचे भासवून काँग्रेसने जारी केलेला हा फतवा म्हणजे निव्वळ राजकीय धूळफेक होती, हेच आता मुक्ताफळांच्या नव्या मालिकेतून दिसून येत आहे. पहलगाममधील दहशतवादी हल्ला ही हिंदुत्वाच्या आक्रमक भूमिकेची स्वाभाविक प्रतिक्रिया असल्याच्या रॉबर्ट वाड्रा यांनी लावलेल्या 'जावईशोधा'मुळे अडचणीत आल्याची जाणीव झालेल्या काँग्रेसने सारवासारवीची तयारी सुरू केलेली असतानाच कर्नाटकच्या सिद्धरामय्या यांनी पक्षाच्या प्रयत्नांवर पाणी फिरवून पाकिस्तानशी युद्ध करण्याची गरज नसल्याचा सल्ला दिला. विजय वडेट्टीवार यांनी तर या नेत्यांच्या वक्तव्यांवर कुरघोडी करून, धर्म विचारून गोळ्या घातल्याच्या पर्यटकांच्या प्रत्यक्ष अनुभवालाच आव्हान दिले. सातत्याने दहशतवादी कारवाया घडवून भारतात असुरक्षितता आणि अस्थिरता माजविण्याच्या प्रयत्नांत पाकिस्तानचा हात असल्याचे पुरावे भारत अथकपणे जगासमोर मांडत असताना, बी. के. हरिप्रसाद नावाच्या एका नेत्यास मात्र पाकिस्तान हा भारताचा शत्रू नाहीच, असा साक्षात्कार झाला होता, तर पहलगाम हल्ला हा फाळणीनंतरच्या असंख्य अनुत्तरित प्रश्नांचा परिणाम आहे, असा थेट निर्वाळा देऊन मणिशंकर अय्यर यांनी हल्ल्यांच्या मानसिकतेचे मनोवैज्ञानिक विश्लेषण करत पाकिस्तानच्या भावना कुरवाळण्याचा प्रयत्न करून पाहिला.

पक्षाला अडचणीत आणण्याची अशी तीव्र स्पर्धा शिगेला पोहोचलेली असताना गेल्या २९ एप्रिलला पक्षाचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी एक फतवा जारी करून मुखंडांच्या मुक्ताफळांस लगाम घालण्याचा प्रयत्न केला होता. पहलगाम हल्ल्यानंतर काँग्रेस पक्ष देशाच्या ऐक्यभावनेसोबतच असून पक्षाच्या नेत्यांनी बेजबाबदार वक्तव्ये टाळावीत, असा स्पष्ट आदेशही त्यांनी दिला होता. एका बाजूला बेजबाबदार आणि शत्रुपक्षास बळ मिळेल अशी वक्तव्ये करून देशाच्या भवनांची खिल्ली उडविण्याच्या प्रयत्नांस लगाम घालणारी भूमिका दाखविणारे कागदी घोडे नाचवायचे आणि दुसरीकडे नेत्यांच्या जिभांचे लगाम मात्र बरळण्यासाठी सैल सोडावयाचे असे काहीसे धोरण असल्याच्या शंकेस पुष्टी मिळेल असे ताजे दाखले काँग्रेसमध्ये दिसू लागले आहेत. काँग्रेसचे उत्तर प्रदेशातील अध्यक्ष अजय राय यांनी रविवारी पक्षाच्या या आदेशालाच पाने पुसली. भारतीय सैन्यदलाचे बळ असलेल्या राफेल विमानाची खेळण्यातील प्रतिकृती घेऊन त्यांनी या विमानाचा वापर करण्याच्या क्षमतेवरच प्रश्न उभे केले. पहलगामचा दहशतवादी हल्ला ही सुरक्षा यंत्रणांच्या आणि भारतीयांच्या भावनांची वेदना आहे. याचा पुरेपूर बदला घेतला जाईल, अशी ग्वाही देणाऱ्या केंद्र सरकारने सातत्याने पाकिस्तानाची सर्व आघाड्यांवर कोंडी करून वेगळ्या युद्धनीतीचे दर्शन घडविले आहे. समोरासमोरच्या प्रत्यक्ष युद्धाआधीच शत्रुपक्षाचे खच्चीकरण करण्याची ही नीती काँग्रेसला ठावूकच नसल्याने, युद्धज्वराचा उद्रेक होऊन युद्धासाठी उतावीळ झालेल्या अनेकांप्रमाणे वर्तन करणाऱ्या या काँग्रेस नेत्याने देशाच्या, लष्कराच्या आणि सरकारच्या क्षमतेलाच आव्हान देणारे राजकारण करून एक प्रकारे उडविलेली ही खिल्ली म्हणजे, पक्षाच्या फतव्याचा कागदी घोडा खुंटीवर टांगून जिभेचा लगाम सैल सोडण्याचे धाडस दाखविण्यासारखेच आहे. म्हणूनच, पक्षाचा तो फतवा ही दिशाभूल आणि धूळफेक असावी की काय ही शंका बळावते आहे. या फतव्यानंतरही अशी बेताल वक्तव्ये करणाऱ्या कोणत्याही नेत्यावर काय कारवाई करणार ते अजूनही पक्षातर्फे स्पष्ट केले गेलेले नाही. अर्थात, अशा वाचाळांना पदरी बाळगणे ही नीतीच असल्यामुळे त्यांचे काय करावे हा त्या पक्षाचा अंतर्गत मामला असल्याने, अशा प्रसंगी विरोधी पक्षांची वर्तणूक कशी असावी याची इतिहासातील आदर्श उदाहरणे पक्षाने नेत्यांसमोर ठेवावयास हवीत. याआधी जेव्हा जेव्हा देशावर युद्धस्थितीचे सावट दाटले, तेव्हा तेव्हा विरोधी पक्ष या नात्याने तत्कालीन जनसंघ व भाजपच्या नेत्यांनी दाखविलेला संयम, समंजसपणा आणि पक्षभेदाचे राजकारण विसरून घडविलेले ऐक्याचे दर्शन ही नीती काँग्रेसच्या विस्मरणात गेली असावी. स्वातंत्र्यानंतरच्या अशा प्रत्येक आव्हानात, संकटात तत्कालीन विरोधी नेते म्हणून अटलबिहारी वाजपेयी वा अन्य नेत्यांनी दाखविलेला समंजसपणा आणि अय्यर, वाड्रा किंवा वडेट्टीवार यांच्यासारख्या नेत्यांचा वाचाळपणा यांची तुलना होणे आता अपरिहार्य आहे. १९६२ च्या चीन युद्धात विरोधी पक्ष या नात्याने सत्ताधारी काँग्रेसला संपूर्ण सहकार्य करण्याची जाहीर ग्वाही तत्कालीन विरोधी पक्षनेते अटलबिहारी वाजपेयी यांनी दिली होती. १९७१ च्या बांगला युद्धातही अटलबिहारी वाजपेयी यांनी संपूर्ण पक्ष सरकारच्या पाठीशी उभा केला होता. सरकार किंवा तत्कालीन नेतृत्वाच्या क्षमतांवर पूर्ण विश्वास दाखविण्याचे राजकीय औदार्य दाखविण्याची वेळ आता विरोधी पक्ष या नात्याने काँग्रेसवर आली आहे. तशी कृती आणि उक्ती करून राजकारणापलीकडच्या देशहिताची भूमिका घ्यावी, हे जेव्हा काँग्रेसला उमगेल, तेव्हा प्रतिमानिर्मितीच्या राहुल गांधींच्या प्रयत्नांवर जनतेचा विश्वास बसेल.

## आंतरराष्ट्रीय

# जगावर वर्चस्वाची पुतिन यांची महत्त्वाकांक्षा

**प्रा. जयसिंग यादव**

रशिया-युक्रेन युद्धाला तीन वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. रशियाने युक्रेनवर केलेल्या हल्ल्यांवर सतत टीका होत आहे. युक्रेन आणि त्याचे अध्यक्ष झेलेन्स्की यांना पाठिंबा देण्यासाठी अनेक देश एकत्र आलेत. अमेरिकेत दुसऱ्यांदा निवडणूक लढवत असलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांनी वचन दिले होते की ते अध्यक्ष होताच एका दिवसात ही समस्या सोडवतील. मात्र अध्यक्ष झाल्यानंतर शंभर दिवस उलटूनही युद्ध संपलेले नाही. अर्थात या दिशेने काही पावले निश्चितच उचलली गेली आहेत. ट्रम्प यांनी रशिया आणि युक्रेनला युद्धबंदीसाठी वाटाघाटी करण्यास राजी केले होते. त्यांनी रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्याशी दोनदा फोनवरून चर्चा केली. अमेरिकेच्या पुतिन यांच्याबद्दलच्या दृष्टिकोनात बदल दिसून आला आहे. याआधी पुतिन आंतरराष्ट्रीय स्तरावर एकाकी पडले होते; पण ट्रम्प हे पुतिन यांच्याशी चर्चेच्या बाजूने आहेत. ट्रम्प सत्तेत आल्यापासून जागतिक व्यवस्था बदलत असून पुतिन यांना त्यांच्या सत्तेत येण्याचा खूप फायदा झाला आहे. ट्रम्प यांचा विजय पुतिन यांच्यासाठी वरदान ठरला आहे. कारण जागतिक व्यवस्थेबद्दल त्यांचे विचार पुतिन यांच्यासारखेच आहेत. त्यांनी रशियाला हे युद्ध जिंकण्याची संधी दिली आहे. हे आधी शक्य नव्हते, कारण रशिया युद्धभूमीवर जिंकला असता, तरी जगात एकटा पडला असता. युक्रेनला पाठिंबा देण्याच्या बदल्यात ट्रम्प यांनी दोन अटी घातल्या आहेत. एक म्हणजे युक्रेनचे अणुऊर्जा प्रकल्प अमेरिकेच्या नियंत्रणाखाली आणणे आणि दुसरे म्हणजे अमेरिकेला युक्रेनच्या खनिज संपत्तीचा गैरफायदा घेण्याची संधी देणे. ट्रम्प यांना जागतिक व्यवस्थेचे स्वरूप बदलायचे असेल, तर युक्रेन युद्धात रशियासाठी राजकीय विजयाचा मार्ग मोकळा होऊ शकतो.

ट्रम्प ज्या पद्धतीने कॅनडा, ग्रीनलॅण्ड आणि पनामा ताब्यात घेण्याबद्दल बोलतात, त्यावरून दिसते की पुतिन आणि त्यांचे विचार समान आहेत; परंतु ट्रम्प प्रशासनातील अराजकता पाहता, ट्रम्प आणि पुतिन जागतिक व्यवस्थेवर चर्चा करतील असे वाटत नाही. या गोंधळात राजनैतिक संतुलन राखणे सोपे नाही. व्हाईट हाऊसमध्ये ट्रम्प आणि झेलेन्स्की यांच्यातील कटू भेटीत वारा किती लवकर बदलू शकतो, हे आपण पाहिले. शांततापूर्ण आणि सौहार्दपूर्ण चर्चा अचानक संघर्षात रूपांतरित झाली आणि त्यानंतर अध्यक्ष झेलेन्स्की आणि त्यांची टीम व्हाईट हाऊसमधून निघून गेली. यानंतर युक्रेनला अमेरिकेकडून गुप्तचर लष्करी माहिती आणि अनेक शस्त्रे मिळणे बंद झाले. त्यामुळे युक्रेनच्या युद्धक्षमतेवर परिणाम झाला; पण पुतिन या संघर्षपूर्ण भेटीमुळे खूप आनंदी होते. कारण ट्रम्प हे पुतिन नेहमीच सांगत असलेल्या अनेक गोष्टी सांगतात.



प्रथम, त्यांनी सांगितले, की युक्रेनमध्ये निवडणुका झाल्या पाहिजेत अन्यथा, झेलेन्स्कीचे नेतृत्व कायदेशीर असू शकत नाही. अमेरिका आणि रशिया जवळ येत आहेत, असे वाटत असताना पुन्हा कटुता अनुभवायला मिळाली. पुतिन यांना युक्रेन रशियाच्या नियंत्रणाखाली आणायचा आहे आणि ट्रम्प यांना युक्रेनमधून अमेरिकन सैन्य मागे घ्यायचे आहे. हे पुतिन यांच्या पथ्यावर पडणार आहे. सत्तेत आल्यापासूनच पुतिन यांनी १९९० च्या दशकात रशियाच्या आधुनिकीकरणाच्या प्रयत्नांमधील अपयशाचा मुद्दा उपस्थित करून आपली प्रतिमा उंचावली. सत्ताधारी नेत्याची सिंहासनावर मजबूत पकड आहे हे स्पष्ट आहे. पुतिन यांना नेहमीच देशातल्या साठ टक्क्यांहून अधिक लोकांचा पाठिंबा राहिला आहे. सध्या तो ७५ टक्क्यांपर्यंत आहे. पुतिन हा पाठिंबा टिकवून ठेवण्यासाठी युद्धाद्वारे देशाला एकत्र करतात. सरकारी माध्यमांवर नियंत्रण ठेवून ते जनमतावर प्रभाव पाडतात. २००० मध्ये सत्तेवर येताच त्यांनी प्रथम सरकारी टीव्ही चॅनेल्सवर नियंत्रण मिळवले. त्या वेळी ९० टक्के रशियन लोकांसाठी ते माहितीचा मुख्य स्रोत होते; परंतु गेल्या काही वर्षांमध्ये इंटरनेटमुळे लोकांना इतर स्रोतांकडूनही माहिती मिळू लागली आहे. तथापि, इंटरनेटद्वारे माहिती मिळवणारे बरेच लोक सरकार समर्थक 'सोशल मीडिया चॅनेल्स'चा अधिक वापर करतात. रशियाच्या शक्तिप्रदर्शनामुळे त्यांच्या नेत्याला जनतेचा पाठिंबा वाढला आहे, असे सर्वेक्षणातून दिसून आले आहे; परंतु युद्धाची वास्तविकता वेगळी गोष्ट सांगते. सरकारी प्रचार असूनही रशियन लोकांना युद्धाचे खरे परिणाम हळूहळू दिसू लागले आहेत. लोक मारले जात आहेत. कुटुंबे त्रास सहन करत आहेत. देश गेल्या तीन वर्षांपासून सर्वांत भयंकर युद्धांपैकी एकात अडकला असून शेवट दिसत नाही. त्याकडे दुर्लक्ष करणे कठीण आहे; परंतु रशियन समाजामध्ये अनेक पूर्वग्रह आहेत. त्यामुळे लोक युद्धाच्या परिणामांकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष करतात. पुतिन यांचा प्रभाव आणि प्रतिमा केवळ रशियातील लोक त्यांच्याकडे कसे पाहतात, यापुरती मर्यादित नाही. गेल्या दहा वर्षांमध्ये रशियन सरकारने जगात एकाकी पडलेल्या किंवा विश्वासार्ह न मानलेल्या सरकारांशी युती करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. याचे एक उदाहरण रशियाच्या उत्तर कोरियाशी असलेल्या संबंधांमध्ये दिसून येते. याशिवाय, रशियाने आफ्रिकेतील एकाकी पडलेल्या सरकारांशीही संबंध निर्माण केले आहेत. त्यात इरिट्रिया, इक्वेटोरियल गिनी यांचा समावेश आहे. या धोरणाची काही उदाहरणे युरोपमध्येही दिसू शकतात. रशियाने मोल्दोव्हा, जॉर्जियामध्ये राजकीय मार्गाने आणि युक्रेनमध्ये लष्करी बळाच्या माध्यमातून आपला प्रभाव वाढवण्याचा प्रयत्न केला आहे; पण दुसरीकडे अनेक आफ्रिकन देशांमध्येही प्रभाव वाढवण्यासाठी जमीन तयार केली. १९९० मध्ये रशियाने युरोपवरून आपले लक्ष दुसरीकडे वळवून आफ्रिकन देशांमध्ये आपला प्रभाव वाढवण्याचे धोरण स्वीकारले. म्हणजेच, त्याला सोव्हिएत काळातील परराष्ट्र धोरणाऐवजी एक नवीन आधुनिक परराष्ट्र धोरण स्वीकारायचे होते. त्या वेळी त्याला त्याचा फारसा फायदा झाला नाही. २०१७ नंतर रशियन सरकारच्या पाठिंब्याने खाजगी लष्करी कंपनी असलेल्या 'वॅग्नर ग्रुप'ने मध्य आफ्रिकन रिपब्लिकमध्ये लष्करी कारवाई केली, तेव्हा त्याला यश मिळाले. या गटाचे नेतृत्व येवगेनी प्रिगोझिन यांनी केले होते. ते सरकारच्या जवळचे मानले जात होते. त्यानंतर, या गटाने लिबियामध्येही लष्करी कारवाई केली. त्यामुळे रशियन सरकारला वाटले की, आफ्रिकन देशांमध्ये वाढता प्रभाव फायदेशीर ठरू शकतो. सध्या रशिया आफ्रिकन देशांना शस्त्रे आणि इतर मदत देऊन आकर्षित करू इच्छितो. हे देश पूर्वी पश्चिमेच्या जवळचे होते. आज रशिया जगात नवी व्यवस्था आणून लोकशाही हा शासनाचा एकमेव कायदेशीर मार्ग नाही हे दाखवू इच्छितो. एक खंड म्हणून संयुक्त राष्ट्रांमध्ये आफ्रिकेला सर्वाधिक मते आहेत. आफ्रिका हा एक मोठा मतदार गट आहे आणि कोणताही देश आंतरराष्ट्रीय बाबींमधील निर्णयांवर प्रभाव टाकण्यासाठी या मोठ्या मतदारगटाचा पाठिंबा मिळवू इच्छितो. रशियाला संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत आफ्रिकेची ५४ मते आपल्या बाजूने हवी असून आफ्रिकेच्या नैसर्गिक संसाधनांचा फायदाही घ्यायचा आहे. दुसरीकडे, आफ्रिका भौगोलिकदृष्ट्या युरोपच्या जवळ आहे, म्हणूनही रशिया आफ्रिकन देशांना आपले मित्र बनवून युरोपमधील प्रतिस्पर्ध्यांना वेढू इच्छितो. पुतिन यांना रशियाला जगातील एक प्रमुख शक्ती बनवायचे आहे; परंतु त्यांची धारणा १९ व्या शतकातील वसाहतवादी विचारसरणीसारखी आहे. हे ध्येय साध्य करण्यासाठी ते जगाला कमकुवत करू इच्छितात; जेणेकरून त्यांचे हात अधिक मजबूत होतील. ट्रम्प हे पुतिन यांची भाषा बोलत आहेत; पण हेदेखील खरे आहे की आपल्या राष्ट्रीय उद्दिष्टासाठी दोघेही एकमेकांची मदत घेऊ शकतात. हे दोन्ही नेते राजनैतिक संबंधांकडे एक करार म्हणून पाहतात. पुतिन यांना जगात रशियाचा प्रभाव वाढवायचा आहे. त्यासाठी ते प्रयत्न करत राहतील; पण जग यावर कसा प्रतिसाद देईल हे स्पष्ट नाही.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

## वेध

**नितीन शिरसाट**

# भाकितांची परंपरा आणि शेतकऱ्यांचे वास्तव

आज संपूर्ण देश एका विचित्र वळणावर उभा आहे. एका बाजूला आधुनिक विज्ञान, अंतराळ प्रवास आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यासारख्या प्रगत तंत्रज्ञानाने मानवाला भविष्यातील दिशा दाखवली आहे, तर दुसऱ्या बाजूला मानवनिर्मित युद्ध, पर्यावरणीय संकट, भूकंप, महापूर, दुष्काळ यासारख्या नैसर्गिक आपत्ती मानवाच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण करत आहेत. यात भर म्हणजे देशभरात काही भागांत होणाऱ्या भविष्यवाणी, भाकिते ज्या महायुद्ध, जगबुडीची शक्यता वर्तवतात. बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद तालुक्यातील भेंडवळ या गावात ३०० वर्षांपूर्वीच्या अक्षय्य तृतीयेच्या मूहूर्तावर शेतीविषयक पीक पाणी, राजकीय परिस्थिती, नैसर्गिक आपत्ती, देशाची सुरक्षा व्यवस्था अशा महत्त्वाच्या जनमानसांत उत्कंठा निर्माण करणाऱ्या या घट मांडणीची प्रतीक्षा संपूर्ण राज्याला असते. भेंडवळ मांडणीची भविष्यवाणी गेल्या काही वेळा वास्तवात उतरताना दिसल्या आहेत. परिणामी, आजही हजारो लोक त्या भविष्यवाणीकडे गांभीर्याने पाहतात.२०२० नंतरच्या काळात जगभरात तणावाची स्थिती वाढलेली दिसते. युक्रेन-रशिया युद्ध, इस्रायल-पॅलेस्टाईन संघर्ष, चीन-तैवान तणाव आणि अमेरिकेचे इतर राष्ट्रांशी असलेले राजनैतिक व लष्करी मतभेद या सर्वांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर तिसऱ्या महायुद्धाची भीती निर्माण केली आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आजच्या महायुद्धात फक्त सैनिक किंवा रणभूमीच नाही, तर संपूर्ण देश नष्ट होऊ शकतात. अण्वस्त्र, सूक्ष्म क्षेपणास्त्रे आणि जैविक युद्धसामग्रीमुळे एकाच वेळी लाखो-कोट्यवधी लोक मृत्युमुखी पडू शकतात. ही भीती अनेकांनी व्यक्ती केली आहे. भेंडवळ मांडणी ही एक पारंपरिक धार्मिक सामाजिक प्रक्रिया आहे. २०२० मध्ये मांडणीत रोगराई व जगभर संकट येईल असे म्हटले गेले होते. त्यानंतर काही महिन्यांत कोविड-१९ महामारीचा उद्रेक झाला. या वर्षीच्या भेंडवळ मांडणीत कापूस, गहू, तांदूळ व इतर पिके साधारण तर काही पिकांचे अतिवृष्टीमुळे नुकसान होण्याची शक्यता वर्तवली आहे. देशात आर्थिक स्थिती अडचणीची राहणार असून काही भागात राष्ट्रपती राजवट लागू शकते, गुरे ढोरे यांच्यावर रोगराईचा प्रादुर्भाव असेल असे हजारो शेतकऱ्यांसमोर जाहीर केले हे ऐकून अनेक लोक चिंतेत आहेत. या भविष्यवाण्यांपेक्षा अधिक भयावह वास्तव म्हणजे शेतकऱ्यांचे सध्याचे जीवन. महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात शेतकरी पावसासह चांगल्या हवामानावर अवलंबून आहेत. मात्र गेल्या काही वर्षांत हवामानाचे स्वरूपच बदलले आहे. यामुळे पुढील गंभीर संकटे निर्माण झाली आहेत. एका बाजूला काही भागांत जून-जुलै महिन्यांमध्ये अपेक्षित पाऊस होत नाही. त्यामुळे खरीप पिकांची पेरणी होऊ शकत नाही किंवा केलेली पेरणी वाया जाते. जमिनीत दमटपणा नसल्यामुळे पिके निघत नाहीत. दुसऱ्या बाजूला, ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यांत एकाच आठवड्यात मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी पाऊस पडतो. परिणामी, शेतात पाणी साचते, पिके सडतात, शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते. ज्या ठिकाणी पाऊस कमी आहे तिथे पाण्याची तीव्र टंचाई आहे. जलसाठ्यांमध्ये पाणी कमी असून, सध्या राज्यातील अनेक गावांत विहिरी आटल्यात. काही भागात महिलांना पिण्याच्या पाण्यासाठी अनेक किलोमीटर पायपीट करावी लागते. शेतकरी पीक विमा घेतात, पण नुकसान झाल्यावर तेव्हा त्यांना वेळेवर किंवा योग्य भरपाई मिळत नाही. अनेक वेळा विमा कंपन्यांची टाळाटाळ, प्रशासनाची उदासीनता आणि दस्तावेजातील त्रुटी यामुळे शेतकऱ्यांना कायदेशीर लढाया कराव्या लागतात. बहुतेक शेतकऱ्यांचे उत्पन्न शेतीपुरते मर्यादित आहे. दुसऱ्या कोणत्याही उत्पन्न स्रोताचा अभाव असल्यामुळे दुष्काळ किंवा पूर यामुळे ते पूर्णपणे आर्थिक संकटात सापडतात. यामुळे आत्महत्यांचे प्रमाणही वाढते.

जगबुडीच्या भविष्यवाण्या आणि भेंडवळ परंपरेवर विश्वास ठेवणारे लोक विज्ञानाच्या नजरेत अंधश्रद्धाळू ठरतात. मात्र हे वास्तव नाकारून चालणार नाही की सामाजिक मानसशास्त्रात अशा परंपरांचा खोल परिणाम होतो. संकटाच्या काळात लोक मार्गदर्शन व आधारासाठी अशा परंपरांकडे वळतात. दुसरीकडे, विज्ञान स्पष्टपणे सांगतं की पर्यावरणीय असमतोल, अति लोकसंख्या, प्रदूषण हे पृथ्वीवरच्या नैसर्गिक आपत्तींसाठी जबाबदार घटक आहेत. शाश्वत शेतीची दिशा, नैसर्गिक शेती, सेंद्रिय शेती, मिश्र शेती अशा पद्धतींना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. जगबुडी, महायुद्ध किंवा पर्यावरणीय संकट ही फक्त भविष्यवाणी नाही, तर मानवाच्या वर्तनाचा वाईट परिणाम आहे. विज्ञान, शाश्वतता, आणि परंपरेतील शहाणपण यांचा समन्वय साधूनच आपण सुरक्षित संतुलित भविष्याकडे जाऊ शकतो.

९८८१७१७८२८

## इतस्ततः

**दत्तात्रेय आंबुलकर**

# प्रभावी औद्योगिक विकासासाठी...

गेल्या काही कालावधीत भारताची औद्योगिक विकासाची वेगवान घोडदौड सुरू आहे. देशांतर्गतच नव्हे, तर जागतिक पातळीवर भारताच्या विकास आणि विकासयात्रेची सकारात्मक नोंद घेतली जात आहे. जागतिक पातळीवर तंत्रज्ञानासह उद्योग-विकासाचे सहा मोठे करार होणे, याचीच पुष्टी करतात. असे असले तरी भारताच्या औद्योगिक विकासाला व या विकासयात्रेला गती देण्यासाठी मूलभूत स्वरूपातील बदल आणि बदलांची साथ तातडीने व वेळेत देणे ही काळाची गरज ठरते.

याआधी भारताने गेल्या दशकात पूर्व व दक्षिण आशियाई देश, ब्रिटन, न्यूझीलंड, युरोपीय देशांसह रशिया, मध्य आशियाई देशांसह अमेरिकेशी विविध प्रकारचे व्यापार-करार केले आहेत. याचा फायदा करारांशी संबंधित उभयपक्षी देशांना झाला आहे. यातूनच जागतिक स्तरावर भारतासाठी उद्योग-व्यवसाय व व्यापार अनुकूल वातावरण तयार होत गेले, ही वस्तुस्थिती आहे. मात्र, सद्यःस्थितीत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या लहरी स्वरूपातील बदलत्या व बदलणाऱ्या आयातशुल्कासह विविध प्रकारच्या व्यापारी धोरणांच्या पृष्ठभूमीवर भारताने आपल्या औद्योगिक धोरण आणि त्याच्या अंमलबजावणीचा मुळातून विचार करणे गरजेचे ठरते.

जागतिक स्तरावर आर्थिक अस्थिरतेसह वाढती स्पर्धा व राजकीय धोरणांसह घेण्यात येणाऱ्या निर्णयांचा परिणाम इतर देशांप्रमाणेच भारतावरही अपरिहार्यपणे होतो. 'जागतिक व्यापार संघटना', 'जागतिक बँक' आणि जगातील विभिन्न क्षेत्रीय व्यापारी संघटना यांच्या धोरणांच्या परिणामांना आज सर्व देशांना सामोरे जावे लागत आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नव्या आर्थिक धोरणांचा अमेरिका व देशाबाहेर होणाऱ्या परिणामांचा मागोवा घेणे, हे यानिमित्ताने महत्त्वाचे ठरते. नव्याने अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आल्यानंतर ट्रम्प यांनी अमेरिका आणि अमेरिकी उद्योग-व्यवसाय यांना सहकार्यासह प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला. ट्रम्प यांच्या नव्या राजवटीच्या या नव्या निर्णयाकडे एक स्वाभाविक प्राधान्यपर निर्णय म्हणून पाहण्यात आले. मात्र, सुरुवातीला आर्थिक-प्रशासनिक निर्णय भासणाऱ्या ट्रम्प प्रशासनाच्या या निर्णयाचा तपशील व परिणाम जगात सर्वांपुढे आला व त्याची आर्थिक-व्यावसायिक दाहकता समोर येत गेली.

वाढत्या आयातशुल्काशी संबंधित या निर्णयामुळे भल्याभल्या देशांचे धाबे दणाणले. आपल्या 'धक्कातंत्रा'साठी प्रसिद्ध असणाऱ्या ट्रम्प प्रशासनाच्या या निर्णयाने अमेरिकेशी आयात व व्यापारव्यवहार करणाऱ्या देशांसमोर मोठे अर्थसंकट व व्यावसायिक आव्हान निर्माण झाले आहे. त्यानंतर टप्पा सुरू झाला, तो अमेरिकेच्या आयातशुल्कावर वाटाघाटींचा. अर्थात, या वाटाघाटींचे मुख्य सूत्र अमेरिकन प्रशासनाच्याच हाती राहिले. जगातील विविध देशांच्या नेते आणि नेतृत्वाचा यानिमित्ताने नेमका कस लागला, हे विशेष. ट्रम्प यांच्या आयातशुल्क धोरणावर अवास्तव प्रतिक्रिया देण्याचे टाळून, प्राप्त परिस्थितीत अमेरिकेच्या वाढीव व अवास्तव आयातशुल्काबाबत व्यावहारिक भूमिका घेऊन या अकल्पित आर्थिक संकटाची तीव्रता कमी करण्याला धोरणात्मक प्राधान्य देऊन त्यानुसार तातडीने प्रयत्न सुरू केले. मोदी सरकारच्या या प्रयत्नामध्ये अमेरिकेशी व्यापारसंबंध व या संबंधांना मोदी-ट्रम्प यांच्या वैयक्तिक मैत्रीपूर्ण संबंधांची जोड देत तातडीने प्रयत्न केले. या प्रयत्नांसाठी भारताने अमेरिकेशी केलेले व्यापारी करार व प्रयत्न यांची जोड दिली गेली. यादृष्टीने नजीकच्या भूतकाळात केलेल्या करारांचे संदर्भ देण्यात आले. या प्रयत्नांचे एकत्रित व सकारात्मक परिणाम दिसून येऊ लागले. याचाच परिणाम म्हणून अमेरिकेने भारताच्या निर्यातशुल्काचा सहानुभूतिपूर्ण फेरविचार केला. त्यामुळे भारतीय उद्योग आणि कंपन्यांना दिलासा तर मिळालाच, त्याशिवाय भारतीय शेअर बाजाराला वेळेत पाठबळ मिळाले. अशा प्रकारे उद्योजकांपासून गुंतवणूकदारांपर्यंत सर्व संबंधित व महत्त्वाच्या घटकांना या नव्या भूमिकेचा फायदा झाला.



उद्योग-व्यवसायांच्या दृष्टीने या महत्त्वाच्या व सकारात्मक परिणामांचा विश्लेषक कानोसा घेता स्पष्ट होते की, समोर एका वर्षापूर्वी भारताने अमेरिकेशी उभयपक्षी व्यापार-उद्योगाला चालना देण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे करार केले. या करार करण्यामागे भारत-अमेरिका यांच्या परस्पर गरजांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने व त्यासंदर्भात उभय देशांचे व्यापारी-व्यावसायिक हित साधण्यासाठी उभयपक्षी प्रयत्न करण्यावर एकमत झाले होते. नेमक्या या कराराचा फायदा ट्रम्प यांच्या आयातशुल्कवाढ धोरणानंतर भारताला झाला. अर्थात यामध्ये नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली मुत्सद्देगिरीसह केलेल्या प्रयत्नांचा व वाटाघाटींचा मोठा वाटा राहिला. या प्रयत्नांच्या परिणामी भारताला मुख्यतः झालेला फायदा म्हणजे, भारत-अमेरिका व्यापारी करारानुसार अमेरिकन कंपन्यांनी भारतात विविध उत्पादनांच्या उत्पादन-प्रकिया उद्योगांना प्रोत्साहन दिले गेले. यामागे पंतप्रधान मोदींच्या 'मेक इन इंडिया' हे धोरणसूत्र होते. याचाच परिणाम म्हणून अमेरिकन कंपन्यांनी भारतात उत्पादन-उद्योग सुरू करण्यास सुरुवात केली. त्यामुळे भारतात या उद्योगांशी संबंधित नोकरी-रोजगार व त्याशिवाय विविध क्षेत्रातील गुंतवणूक तर वाढलीच, त्याशिवाय भारत व अमेरिकेच्या दरम्यानच्या या संयुक्त व परस्परांच्या हितसंबंधांवर आधारित या करारांमुळे ट्रम्प प्रशासनाला आयातशुल्क वाढीच्या आपल्या निर्णयाच्या संदर्भात भारताच्या बाबत सामंजस्यपूर्ण भूमिका घ्यावी लागली, हे या संदर्भात उल्लेखनीय आहे. भारताच्या आंतरराष्ट्रीय स्तरावर 'मेक इन इंडिया'च्या प्रयत्नांना पूरक धोरणांची साथ मिळत आहे. यासंदर्भात नोव्हेंबर २०२४ साली सिंगापूर येथे झालेल्या औद्योगिक संमेलनात चीनच्या विरोधाला न जुमानता छोटी साधने आणि उपकरणांच्या मोठ्या प्रमाणावरील उत्पादनासाठी भारताला प्राधान्य देण्याचा घेण्यात आलेला निर्णय यासंदर्भातील एक महत्त्वाचा निर्णय टप्पा ठरला आहे. भारताने पण याच भूमिकेतून विचार करून केंद्र पातळीवर वाणिज्य मंत्रालयाला उत्पादन प्रक्रिया विभागाची भक्कम साथ दिल्यास भारतीय उत्पादन उद्योग आंतरराष्ट्रीय पातळीवर पण नावलौकिक कमावतील, हे निश्चित.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)
९८२२८४७८८६

### काँग्रेसने 'आंतरराष्ट्रीय' व्हावे

भारतात काँग्रेस पक्ष सर्वांत जुना आहे. साठ वर्षे देशावर राज्य केले आणि स्वातंत्र्य लढ्यात काँग्रेसच्याच नेत्यांचे योगदान होते असे ते सांगत असतात. अशा विशाल पक्षाने आता खरे तर राष्ट्रीय न राहता आंतरराष्ट्रीय व्हायला हवे. काँग्रेसजवळ मजबूत नेतृत्व करणारे नेते आहेत, वरचेवर माध्यमांसमोर जाऊन जबरदस्त विधान करणारे आक्रमक नेते आहेत शिवाय राहुलबाबासारखे उच्चशिक्षित व सर्व कामात तरबेज म्हणजे गाडी रिपेअरिंग, फळे विकणे, ट्रक चालविणे वगैरे असा नेता आहे. शिवाय राहुल गांधी यांना आज जग बऱ्यापैकी ओळखू लागले आहे आणि जगाला त्यांच्यासारख्या नेत्यांची गरजपण आहे. आता उदाहरण द्यायचे झाल्यास तिकडे पाकिस्तानात बलुचिस्तान, खैबर पख्तुनवा येथे आजादीची लढाई सुरू आहे. काँग्रेस पक्षाला आजादी कशी मिळवायची याचा चांगलाच अनुभव आहे त्यामुळे त्यांनी पाकिस्तानात निवडणूक लढवली तर त्यांना हमखास यश मिळणार यात शंका नाही. शिवाय मणिशंकर अयर, दिग्विजयसिहग, कपिल सिब्बलसारखे हिंदुस्थानातील हालचावींवर गरळ ओकणारे प्रखर नेते प्रचारासाठी आहेच. भारतात कोणीही केव्हाही यावे अशी भावना ठेवणारे चन्नी साहेब आहेतच. त्यामुळे पाकिस्तानात विजय तर पक्का आहे. तसेच तिकडे कॅनडा, इंग्लड येथे खलिस्तान चळवळ चालविणारे नेते आहेत. त्यांनाही आजादी हवी आहे. तेव्हा त्यांना तेथेच आजादी मिळवून देण्याचे महान कार्य काँग्रेसच्या नशिबी असेल तर काय सांगता येते. अशा राष्ट्रीय पक्षाने आता आंतरराष्ट्रीय झेप घेण्याची वेळ आली आहे.

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

### लढाऊवृत्ती कायम ठेवणे आवश्यक

पहलगाममध्ये पाकिस्तानी अतिरेक्यांनी २६ हिंदूंची धार्मिक क्रूरतेतून हत्या केली. या घटनेचे विश्लेषण अनेक अंगांनी केले जाते. हिंदू समाज क्षात्रतेज विसरत चालला असल्याचे अनेकदा जाणवते. क्षात्रतेजाची प्रेरणा प्राप्त व्हावी अशी अनेक उदाहरणे आपल्याला माहीत असूनही प्रत्यक्ष जीवनात त्याचा अंगीकार अभावानेच होताना दिसतो. लवकुश या दोन बालकांनी लक्ष्मणासारख्या योद्ध्याला मूर्च्छित केले. अभिमन्यूसारखा बालक त्याचे काका युधिष्ठिर यांना चक्रव्यूह भेदण्यासाठी रणांगणात जाण्याची परवानगी मागतो. आदिलशाही, मोगल यांची जुलमी राजवट असतानाही छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्याची शपथ घेतात. अहल्यादेवी होळकर यांचे यजमान युद्धात कामी आले असतानाही शोक करीत न बसता शत्रूला परास्त करण्यासाठी कंबर कसतात. झाशीची राणी लक्ष्मीबाई कोवळ्या वयाच्या पुत्राला पाठीशी बांधून झाशी किल्ल्याच्या तटावरून घोड्यासह उडी घेते. हुतात्मा भगतसिंह, राजगुरू, चंद्रशेखर आझाद, चाफेकर बंधू या सशस्त्र क्रांतिकारकांना त्याच्या कृतीचे परिणाम माहीत असतात. राष्ट्र सर्वोपरी मानणे आणि स्वतःचा जीव दुय्यम मानणे ही भूमिका क्षात्रतेज निर्माण करणारी ठरते.

अतिशय प्रेरणादायी इतिहास, देशाप्रति तन, मन, धन आणि प्राण अर्पण करणारे महात्मे माहीत असूनही अनेक भारतीयांना रणांगण तर सोडाच खेळाच्या मैदानाचाही परिचय नाही अशी स्थिती आहे. भारतीय लष्करातील जवान, अधिकारी स्वतःच्या मरणाला भीत नाहीत म्हणून त्यांचे क्षात्रतेज टिकून आहे. परमवीरचक्र, महावीरचक्र सन्मानित योद्ध्यांचे चरित्र अभ्यासले तर त्यांनी जीवाची पर्वा केली नाही हे समानसूत्र सापडते. अनेक भारतीयांना परीक्षेतील गुणांची टक्केवारी महत्त्वाची वाटते, अनेकांना खूप पैसे संग्रही असावे असे वाटते तर अनेकांना आरोग्यविमा सारख्या बाबी महत्त्वाच्या वाटतात.

काळ बदलत आहे. अतिरेक्यांची विध्वसंकवृत्ती नवे स्वरूप धारण करीत आहे. एकेकाळी अफगाणिस्तान, पाकिस्तान, बांगलादेश हे अखंड हिंदुस्थानचा भाग होते आणि भविष्यात तिथे हिंदू नामशेष होतील असे सध्याचे चित्र आहे. आपण या सर्व घटनांचा अभ्यास करून मैदानी खेळ खेळणे, शरीर बलदंड करणे, चपळता वाढविणे यावर भर दिला तरच आपले भविष्य उज्ज्वल राहू शकेल. क्षात्रतेजाचा विसर हा आपल्या अस्तित्वाशी निगडित आहे.

**हेमंत पुरुषोत्तम कद्रे**/९४२२२१५३४३

## वाचक पत्रे

### सुखी राहण्याचे काही उपाय

आपल्या उत्पन्नावर पहिला आपला हक्क. मस्त मजा करावी, आरोग्याकडे लक्ष असावे, नियमित व्यायाम करावा. मनातील सुख-दुःख हितचिंतकांनाच सांगावे. अन्यथा चांगल्या दुधात मिठाचा खडा पडल्यासारखे होईल. जवळील पैसे कुणालाही कधीही देऊ नये. जोवर जवळ पैसे आहेत, तोवरच सर्व विचारतील. उंच इमारती पाहून विनाकारण दुःखी होऊ नका. सुख आणि दुःख हे सोबतच येते आणि जातेदेखील. नेहमी मनमोकळ्या गप्पा मारा, झोपेतून उठल्यावर आणि झोपताना ईश्वराचे स्मरण करा. विचारल्याशिवाय कुणालाच सल्ला देऊ नका. कारण कुणालाच त्याची गरज नसते. शेवटी सांगायचे म्हणजे मनातील काही गुपिते कुणालाच सांगू नका.

**लक्ष्मण कुऱ्हेकर**/९५४५११२६४६

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Made with Xodo PDF Reader and Editor



## अग्रलेख...

# फसवा फतवा आणि बेलगाम जिभा!

कोणत्याही निवडणुकीत सातत्याने होणारा पराभव ही राजकीय पक्षांनी चिंतित होऊन चिंतन करावी अशी बाब असताना, शतकाहूनही अधिक काळाचा इतिहास असलेल्या आणि सहा दशकांहूनही अधिक काळ देशावर सत्ता गाजविणाऱ्या काँग्रेसच्या सध्याच्या नेतृत्वास अशी कोणती चिंता भेडसावत असेल अशी कोणतीही चिन्हे दिसत नसल्याने, या पक्षाच्या भविष्यावरील प्रश्नचिन्ह अधिकाधिक गडद होत जाणार आहे. यामुळेच, इतिहासातील शीखविरोधी दंगलीसह काँग्रेसकडून झालेल्या सर्व चुकांची जबाबदारी स्वीकारून त्याचे प्रायश्चित्त घेण्याची तयारी आज जवळपास चार दशकांनंतर दाखविण्याची राहुल गांधी यांची नवी चाल देशातील जनतेस किती विश्वासार्ह वाटेल हा प्रश्नच आहे. केवळ जनमानसात फोफावत असलेला काँग्रेसविरोधी भावनेचा उद्रेक शमविण्यासाठी आणि सातत्याने ढासळत चाललेली पक्षाची प्रतिमा कसेही करून पुन्हा उजळण्यासाठी आता राहुल गांधी यांनी आपल्या पक्षाच्या चुकांचे प्रायश्चित्त घेण्याचा कांगावा करून कबुलीसत्र सुरू केले असले, तरी पक्षाच्या जनविरोधी भावनांचा पीळ मात्र अजूनही कायमच आहे. जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे गेल्या २२ एप्रिल रोजी झालेल्या भयानक दहशतवादी हल्ल्यानंतर देशात सर्वत्र पाकविरोधी संतापाच्या लाटा उसळत असताना, राहुल गांधींच्या काँग्रेसचे नेते मात्र, निव्वळ राजकारणापायी सत्ताधारी भाजपवर दुगाण्या झाडत पाकिस्तानच्या भूमिकेस प्रोत्साहन मिळेल अशी बेताल वक्तव्ये करत सुटले होते. जनतेच्या भावना संवेदनशील झालेल्या असताना, दहशतवादासारख्या भीषण समस्येविरोधात संपूर्ण देश एकवटलेला असताना आणि केंद्रातील सरकारने कठोर पावले उचलण्याची तयारी सुरू केलेली असताना काँग्रेसमध्ये नेतृत्वाच्या प्रत्येक फळीवर बसलेले वेगवेगळे नेते आपापले सरकारविरोधी सूर आळवण्याच्या स्पर्धेत उतरून पाकिस्तानला पोषक ठरणारी वक्तव्ये करीत राजकारणातील संकुचितपणाचे दर्शन घडविण्यात मग्न होते. उभा देश एका संकटाशी सामना करण्यासाठी सज्ज होत असताना आणि या सामन्याच्या आघाडीवर उतरून देशाची सैन्यदले संपूर्ण तयारीनिशी पाकिस्तानसमोर सज्जड आव्हान उभे करत असताना, काँग्रेसचे नेते मात्र, जनतेच्या आणि लष्कराच्या नीतिधैर्याची खिल्ली उडविण्याचे राजकारण करू लागले होते. त्यांच्या अशा राजकारणातून खुद्द पाकिस्तानलाही या हल्ल्यापासून स्वत:स अलग राखण्याच्या केविलवाण्या प्रयत्नांस बळ मिळत असल्याच्या बातम्या पसरू लागल्या, देशात काँग्रेसी राजकारणाविरोधात नव्या संतापाचा उद्रेक दिसू लागला, तेव्हा या पक्षाच्या नेत्यांनी जाग आल्याचे सोंग घेऊन जारी केलेला फतवादेखील किती फसवा आणि देशातील जनतेच्या डोळ्यात धूळफेक करणारा आहे, हेही आता स्पष्ट होऊ लागले आहे. पहलगाम हल्ल्यानंतर जावई रॉबर्ट वाड्रा, कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या, बी. के हरिप्रसाद, महाराष्ट्रातील काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार, वादग्रस्त वक्तव्ये करून स्वपक्षाला सातत्याने अडचणीत आणणारे नेते म्हणूनच प्रसिद्ध असलेले मणिशंकर अय्यर आदी नेत्यांनी जी काही मुक्ताफळे उधळली, त्यामुळे पुन्हा एकदा पक्षाची जनमानसातील उरलीसुरली प्रतिमादेखील पुसली जाण्याची जाणीव झाल्याचे भासवून काँग्रेसने जारी केलेला हा फतवा म्हणजे निव्वळ राजकीय धूळफेक होती, हेच आता मुक्ताफळांच्या नव्या मालिकेतून दिसून येत आहे. पहलगाममधील दहशतवादी हल्ला ही हिंदुत्वाच्या आक्रमक भूमिकेची स्वाभाविक प्रतिक्रिया असल्याच्या रॉबर्ट वाड्रा यांनी लावलेल्या ‘जावईशोधा’मुळे अडचणीत आल्याची जाणीव झालेल्या काँग्रेसने सारवासारवीची तयारी सुरू केलेली असतानाच कर्नाटकच्या सिद्धरामय्या यांनी पक्षाच्या प्रयत्नांवर पाणी फिरवून पाकिस्तानशी युद्ध करण्याची गरज नसल्याचा सल्ला दिला. विजय वडेट्टीवार यांनी तर या नेत्यांच्या वक्तव्यांवर कुरघोडी करून, धर्म विचारून गोळ्या घातल्याच्या पर्यटकांच्या प्रत्यक्ष अनुभवालाच आव्हान दिले. सातत्याने दहशतवादी कारवाया घडवून भारतात असुरक्षितता आणि अस्थिरता माजविण्याच्या प्रयत्नांत पाकिस्तानचा हात असल्याचे पुरावे भारत अथकपणे जगासमोर मांडत असताना, बी. के. हरिप्रसाद नावाच्या एका नेत्यास मात्र पाकिस्तान हा भारताचा शत्रू नाहीच, असा साक्षात्कार झाला होता, तर पहलगाम हल्ला हा फाळणीनंतरच्या असंख्य अनुत्तरित प्रश्नांचा परिणाम आहे, असा थेट निर्वाळा देऊन मणिशंकर अय्यर यांनी हल्ल्यांच्या मानसिकतेचे मनोवैज्ञानिक विश्लेषण करत पाकिस्तानच्या भावना कुरवाळण्याचा प्रयत्न करून पाहिला.

पक्षाला अडचणीत आणण्याची अशी तीव्र स्पर्धा शिगेला पोहोचलेली असताना गेल्या २९ एप्रिलला पक्षाचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी एक फतवा जारी करून मुखंडांच्या मुक्ताफळांस लगाम घालण्याचा प्रयत्न केला होता. पहलगाम हल्ल्यानंतर काँग्रेस पक्ष देशाच्या ऐक्यभावनेसोबतच असून पक्षाच्या नेत्यांनी बेजबाबदार वक्तव्ये टाळावीत, असा स्पष्ट आदेशही त्यांनी दिला होता. एका बाजूला बेजबाबदार आणि शत्रुपक्षास बळ मिळेल अशी वक्तव्ये करून देशाच्या भवनांची खिल्ली उडविण्याच्या प्रयत्नांस लगाम घालणारी भूमिका दाखविणारे कागदी घोडे नाचवायचे आणि दुसरीकडे नेत्यांच्या जिभांचे लगाम मात्र बरळण्यासाठी सैल सोडावयाचे असे काहीसे धोरण असल्याच्या शंकेस पुष्टी मिळेल असे ताजे दाखले काँग्रेसमध्ये दिसू लागले आहेत. काँग्रेसचे उत्तर प्रदेशातील अध्यक्ष अजय राय यांनी रविवारी पक्षाच्या या आदेशालाच पाने पुसली. भारतीय सैन्यदलाचे बळ असलेल्या राफेल विमानाची खेळण्यातील प्रतिकृती घेऊन त्यांनी या विमानाचा वापर करण्याच्या क्षमतेवरच प्रश्न उभे केले. पहलगामचा दहशतवादी हल्ला ही सुरक्षा यंत्रणांच्या आणि भारतीयांच्या भावनांची वेदना आहे. याचा पुरेपूर बदला घेतला जाईल, अशी ग्वाही देणाऱ्या केंद्र सरकारने सातत्याने पाकिस्तानाची सर्व आघाड्यांवर कोंडी करून वेगळ्या युद्धनीतीचे दर्शन घडविले आहे. समोरासमोरच्या प्रत्यक्ष युद्धाआधीच शत्रुपक्षाचे खच्चीकरण करण्याची ही नीती काँग्रेसला ठावूकच नसल्याने, युद्धज्वराचा उद्रेक होऊन युद्धासाठी उतावीळ झालेल्या अनेकांप्रमाणे वर्तन करणाऱ्या या काँग्रेस नेत्याने देशाच्या, लष्कराच्या आणि सरकारच्या क्षमतेलाच आव्हान देणारे राजकारण करून एक प्रकारे उडविलेली ही खिल्ली म्हणजे, पक्षाच्या फतव्याचा कागदी घोडा खुंटीवर टांगून जिभेचा लगाम सैल सोडण्याचे धाडस दाखविण्यासारखेच आहे. म्हणूनच, पक्षाचा तो फतवा ही दिशाभूल आणि धूळफेक असावी की काय ही शंका बळावते आहे. या फतव्यानंतरही अशी बेताल वक्तव्ये करणाऱ्या कोणत्याही नेत्यावर काय कारवाई करणार ते अजूनही पक्षातर्फे स्पष्ट केले गेलेले नाही. अर्थात, अशा वाचाळांना पदरी बाळगणे ही नीतीच असल्यामुळे त्यांचे काय करावे हा त्या पक्षाचा अंतर्गत मामला असल्याने, अशा प्रसंगी विरोधी पक्षांची वर्तणूक कशी असावी याची इतिहासातील आदर्श उदाहरणे पक्षाने नेत्यांसमोर ठेवावयास हवीत. याआधी जेव्हा जेव्हा देशावर युद्धस्थितीचे सावट दाटले, तेव्हा तेव्हा विरोधी पक्ष या नात्याने तत्कालीन जनसंघ व भाजपच्या नेत्यांनी दाखविलेला संयम, समंजसपणा आणि पक्षभेदाचे राजकारण विसरून घडविलेले ऐक्याचे दर्शन ही नीती काँग्रेसच्या विस्मरणात गेली असावी. स्वातंत्र्यानंतरच्या अशा प्रत्येक आव्हानात, संकटात तत्कालीन विरोधी नेते म्हणून अटलबिहारी वाजपेयी वा अन्य नेत्यांनी दाखविलेला समंजसपणा आणि अय्यर, वाड्रा किंवा वडेट्टीवार यांच्यासारख्या नेत्यांचा वाचाळपणा यांची तुलना होणे आता अपरिहार्य आहे. १९६२ च्या चीन युद्धात विरोधी पक्ष या नात्याने सत्ताधारी काँग्रेसला संपूर्ण सहकार्य करण्याची जाहीर ग्वाही तत्कालीन विरोधी पक्षनेते अटलबिहारी वाजपेयी यांनी दिली होती. १९७१ च्या बांगला युद्धातही अटलबिहारी वाजपेयी यांनी संपूर्ण पक्ष सरकारच्या पाठीशी उभा केला होता. सरकार किंवा तत्कालीन नेतृत्वाच्या क्षमतांवर पूर्ण विश्वास दाखविण्याचे राजकीय औदार्य दाखविण्याची वेळ आता विरोधी पक्ष या नात्याने काँग्रेसवर आली आहे. तशी कृती आणि उक्ती करून राजकारणापलीकडच्या देशहिताची भूमिका घ्यावी, हे जेव्हा काँग्रेसला उमगेल, तेव्हा प्रतिमानिर्मितीच्या राहुल गांधींच्या प्रयत्नांवर जनतेचा विश्वास बसेल.

## आंतरराष्ट्रीय

प्रा. जयसिंग यादव

# जगावर वर्चस्वाची पुतिन यांची महत्त्वाकांक्षा

रशिया-युक्रेन युद्धाला तीन वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. रशियाने युक्रेनवर केलेल्या हल्ल्यांवर सतत टीका होत आहे. युक्रेन आणि त्याचे अध्यक्ष झेलेन्स्की यांना पाठिंबा देण्यासाठी अनेक देश एकत्र आलेत. अमेरिकेत दुसऱ्यांदा निवडणूक लढवत असलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांनी वचन दिले होते की ते अध्यक्ष होताच एका दिवसात ही समस्या सोडवतील. मात्र अध्यक्ष झाल्यानंतर शंभर दिवस उलटूनही युद्ध संपलेले नाही. अर्थात या दिशेने काही पावले निश्चितच उचलली गेली आहेत. ट्रम्प यांनी रशिया आणि युक्रेनला युद्धबंदीसाठी वाटाघाटी करण्यास राजी केले होते. त्यांनी रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्याशी दोनदा फोनवरून चर्चा केली. अमेरिकेच्या पुतिन यांच्याबद्दलच्या दृष्टिकोनात बदल दिसून आला आहे. याआधी पुतिन आंतरराष्ट्रीय स्तरावर एकाकी पडले होते; पण ट्रम्प हे पुतिन यांच्याशी चर्चेच्या बाजूने आहेत. ट्रम्प सत्तेत आल्यापासून जागतिक व्यवस्था बदलत असून पुतिन यांना त्यांच्या सत्तेत येण्याचा खूप फायदा झाला आहे. ट्रम्प यांचा विजय पुतिन यांच्यासाठी वरदान ठरला आहे. कारण जागतिक व्यवस्थेबद्दल त्यांचे विचार पुतिन यांच्यासारखेच आहेत. त्यांनी रशियाला हे युद्ध जिंकण्याची संधी दिली आहे. हे आधी शक्य नव्हते, कारण रशिया युद्धभूमीवर जिंकला असता, तरी जगात एकटा पडला असता. युक्रेनला पाठिंबा देण्याच्या बदल्यात ट्रम्प यांनी दोन अटी घातल्या आहेत. एक म्हणजे युक्रेनचे अणुऊर्जा प्रकल्प अमेरिकेच्या नियंत्रणाखाली आणणे आणि दुसरे म्हणजे अमेरिकेला युक्रेनच्या खनिज संपत्तीचा गैरफायदा घेण्याची संधी देणे. ट्रम्प यांना जागतिक व्यवस्थेचे स्वरूप बदलायचे असेल, तर युक्रेन युद्धात रशियासाठी राजकीय विजयाचा मार्ग मोकळा होऊ शकतो.

ट्रम्प ज्या पद्धतीने कॅनडा, ग्रीनलॅण्ड आणि पनामा ताब्यात घेण्याबद्दल बोलतात, त्यावरून दिसते की पुतिन आणि त्यांचे विचार समान आहेत; परंतु ट्रम्प प्रशासनातील अराजकता पाहता, ट्रम्प आणि पुतिन जागतिक व्यवस्थेवर चर्चा करतील असे वाटत नाही. या गोंधळात राजनैतिक संतुलन राखणे सोपे नाही. व्हाईट हाऊसमध्ये ट्रम्प आणि झेलेन्स्की यांच्यातील कटू भेटीत वारा किती लवकर बदलू शकतो, हे आपण पाहिले. शांततापूर्ण आणि सौहार्दपूर्ण चर्चा अचानक संघर्षात रूपांतरित झाली आणि त्यानंतर अध्यक्ष झेलेन्स्की आणि त्यांची टीम व्हाईट हाऊसमधून निघून गेली. यानंतर युक्रेनला अमेरिकेकडून गुप्तचर लष्करी माहिती आणि अनेक शस्त्रे मिळणे बंद झाले. त्यामुळे युक्रेनच्या युद्धक्षमतेवर परिणाम झाला; पण पुतिन या संघर्षपूर्ण भेटीमुळे खूप आनंदी होते. कारण ट्रम्प हे पुतिन नेहमीच सांगत असलेल्या अनेक गोष्टी सांगतात. प्रथम, त्यांनी सांगितले, की युक्रेनमध्ये निवडणुका झाल्या पाहिजेत अन्यथा, झेलेन्स्कीचे नेतृत्व कायदेशीर असू शकत नाही. अमेरिका आणि रशिया जवळ येत आहेत, असे वाटत असताना पुन्हा कटुता अनुभवायला मिळाली.



पुतिन यांना युक्रेन रशियाच्या नियंत्रणाखाली आणायचा आहे आणि ट्रम्प यांना युक्रेनमधून अमेरिकन सैन्य मागे घ्यायचे आहे. हे पुतिन यांच्या पथ्यावर पडणार आहे. सत्तेत आल्यापासूनच पुतिन यांनी १९९० च्या दशकात रशियाच्या आधुनिकीकरणाच्या प्रयत्नांमधील अपयशाचा मुद्दा उपस्थित करून आपली प्रतिमा उंचावली. सत्ताधारी नेत्याची सिंहासनावर मजबूत पकड आहे हे स्पष्ट आहे. पुतिन यांना नेहमीच देशातल्या साठ टक्क्यांहून अधिक लोकांचा पाठिंबा राहिला आहे. सध्या तो ७५ टक्क्यांपर्यंत आहे. पुतिन हा पाठिंबा टिकवून ठेवण्यासाठी युद्धाद्वारे देशाला एकत्र करतात. सरकारी माध्यमांवर नियंत्रण ठेवून ते जनमतावर प्रभाव पाडतात. २००० मध्ये सत्तेवर येताच त्यांनी प्रथम सरकारी टीव्ही चॅनेल्सवर नियंत्रण मिळवले. त्या वेळी ९० टक्के रशियन लोकांसाठी ते माहितीचा मुख्य स्रोत होते; परंतु गेल्या काही वर्षांमध्ये इंटरनेटमुळे लोकांना इतर स्रोतांकडूनही माहिती मिळू लागली आहे. तथापि, इंटरनेटद्वारे माहिती मिळवणारे बरेच लोक सरकार समर्थक ‘सोशल मीडिया चॅनेल्स’चा अधिक वापर करतात. रशियाच्या शक्तिप्रदर्शनामुळे त्यांच्या नेत्याला जनतेचा पाठिंबा वाढला आहे, असे सर्वेक्षणातून दिसून आले आहे; परंतु युद्धाची वास्तविकता वेगळी गोष्ट सांगते. सरकारी प्रचार असूनही रशियन लोकांना युद्धाचे खरे परिणाम हळूहळू दिसू लागले आहेत. लोक मारले जात आहेत. कुटुंबे त्रास सहन करत आहेत. देश गेल्या तीन वर्षांपासून सर्वांत भयंकर युद्धांपैकी एकात अडकला असून शेवट दिसत नाही. त्याकडे दुर्लक्ष करणे कठीण आहे; परंतु रशियन समाजामध्ये अनेक पूर्वग्रह आहेत. त्यामुळे लोक युद्धाच्या परिणामांकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष करतात. पुतिन यांचा प्रभाव आणि प्रतिमा केवळ रशियातील लोक त्यांच्याकडे कसे पाहतात, यापुरती मर्यादित नाही. गेल्या दहा वर्षांमध्ये रशियन सरकारने जगात एकाकी पडलेल्या किंवा विश्वासार्ह न मानलेल्या सरकारांशी युती करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. याचे एक उदाहरण रशियाच्या उत्तर कोरियाशी असलेल्या संबंधांमध्ये दिसून येते. याशिवाय, रशियाने आफ्रिकेतील एकाकी पडलेल्या सरकारांशीही संबंध निर्माण केले आहेत. त्यात इरिट्रिया, इक्वेटोरियल गिनी यांचा समावेश आहे. या धोरणाची काही उदाहरणे युरोपमध्येही दिसू शकतात. रशियाने मोल्दोव्हा, जॉर्जियामध्ये राजकीय मार्गाने आणि युक्रेनमध्ये लष्करी बळाच्या माध्यमातून आपला प्रभाव वाढवण्याचा प्रयत्न केला आहे; पण दुसरीकडे अनेक आफ्रिकन देशांमध्येही प्रभाव वाढवण्यासाठी जमीन तयार केली. १९९० मध्ये रशियाने युरोपवरून आपले लक्ष दुसरीकडे वळवून आफ्रिकन देशांमध्ये आपला प्रभाव वाढवण्याचे धोरण स्वीकारले. म्हणजेच, त्याला सोव्हिएत काळातील परराष्ट्र धोरणाऐवजी एक नवीन आधुनिक परराष्ट्र धोरण स्वीकारायचे होते. त्या वेळी त्याला त्याचा फारसा फायदा झाला नाही. २०१७ नंतर रशियन सरकारच्या पाठिंब्याने खाजगी लष्करी कंपनी असलेल्या ‘वॅग्नर ग्रुप’ने मध्य आफ्रिकन रिपब्लिकमध्ये लष्करी कारवाई केली, तेव्हा त्याला यश मिळाले. या गटाचे नेतृत्व येवगेनी प्रिगोझिन यांनी केले होते. ते सरकारच्या जवळचे मानले जात होते. त्यानंतर, या गटाने लिबियामध्येही लष्करी कारवाई केली. त्यामुळे रशियन सरकारला वाटले की, आफ्रिकन देशांमध्ये वाढता प्रभाव फायदेशीर ठरू शकतो. सध्या रशिया आफ्रिकन देशांना शस्त्रे आणि इतर मदत देऊन आकर्षित करू इच्छितो. हे देश पूर्वी पश्चिमेच्या जवळचे होते. आज रशिया जगात नवी व्यवस्था आणून लोकशाही हा शासनाचा एकमेव कायदेशीर मार्ग नाही हे दाखवू इच्छितो. एक खंड म्हणून संयुक्त राष्ट्रांमध्ये आफ्रिकेला सर्वाधिक मते आहेत. आफ्रिका हा एक मोठा मतदार गट आहे आणि कोणताही देश आंतरराष्ट्रीय बाबींमधील निर्णयांवर प्रभाव टाकण्यासाठी या मोठ्या मतदारगटाचा पाठिंबा मिळवू इच्छितो. रशियाला संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत आफ्रिकेची ५४ मते आपल्या बाजूने हवी असून आफ्रिकेच्या नैसर्गिक संसाधनांचा फायदाही घ्यायचा आहे. दुसरीकडे, आफ्रिका भौगोलिकदृष्ट्या युरोपच्या जवळ आहे, म्हणूनही रशिया आफ्रिकन देशांना आपले मित्र बनवून युरोपमधील प्रतिस्पर्ध्यांना वेढू इच्छितो. पुतिन यांना रशियाला जगातील एक प्रमुख शक्ती बनवायचे आहे; परंतु त्यांची धारणा १९ व्या शतकातील वसाहतवादी विचारसरणीसारखी आहे. हे ध्येय साध्य करण्यासाठी ते जगाला कमकुवत करू इच्छितात; जेणेकरून त्यांचे हात अधिक मजबूत होतील. ट्रम्प हे पुतिन यांची भाषा बोलत आहेत; पण हेदेखील खरे आहे की आपल्या राष्ट्रीय उद्दिष्टासाठी दोघेही एकमेकांची मदत घेऊ शकतात. हे दोन्ही नेते राजनैतिक संबंधांकडे एक करार म्हणून पाहतात. पुतिन यांना जगात रशियाचा प्रभाव वाढवायचा आहे. त्यासाठी ते प्रयत्न करत राहतील; पण जग यावर कसा प्रतिसाद देईल हे स्पष्ट नाही.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

## वेध

नितीन शिरसाट

# भाकितांची परंपरा आणि शेतकऱ्यांचे वास्तव

आज संपूर्ण देश एका विचित्र वळणावर उभा आहे. एका बाजूला आधुनिक विज्ञान, अंतराळ प्रवास आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यासारख्या प्रगत तंत्रज्ञानाने मानवाला भविष्यातील दिशा दाखवली आहे, तर दुसऱ्या बाजूला मानवनिर्मित युद्ध, पर्यावरणीय संकट, भूकंप, महापूर, दुष्काळ यासारख्या नैसर्गिक आपत्ती मानवाच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण करत आहेत. यात भर म्हणजे देशभरात काही भागांत होणाऱ्या भविष्यवाणी, भाकिते ज्या महायुद्ध, जगबुडीची शक्यता वर्तवतात. बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद तालुक्यातील भेंडवळ या गावात ३०० वर्षांपूर्वीच्या अक्षय्य तृतीयेच्या मूहूर्तावर शेतीविषयक पीक पाणी, राजकीय परिस्थिती, नैसर्गिक आपत्ती, देशाची सुरक्षा व्यवस्था अशा महत्त्वाच्या जनमानसांत उत्कंठा निर्माण करणाऱ्या या घट मांडणीची प्रतीक्षा संपूर्ण राज्याला असते. भेंडवळ मांडणीची भविष्यवाणी गेल्या काही वेळा वास्तवात उतरताना दिसल्या आहेत. परिणामी, आजही हजारो लोक त्या भविष्यवाणीकडे गांभीर्याने पाहतात.२०२० नंतरच्या काळात जगभरात तणावाची स्थिती वाढलेली दिसते. युक्रेन-रशिया युद्ध, इस्रायल-पॅलेस्टाईन संघर्ष, चीन-तैवान तणाव आणि अमेरिकेचे इतर राष्ट्रांशी असलेले राजनैतिक व लष्करी मतभेद या सर्वांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर तिसऱ्या महायुद्धाची भीती निर्माण केली आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आजच्या महायुद्धात फक्त सैनिक किंवा रणभूमीच नाही, तर संपूर्ण देश नष्ट होऊ शकतात. अण्वस्त्र, सूक्ष्म क्षेपणास्त्रे आणि जैविक युद्धसामग्रीमुळे एकाच वेळी लाखो-कोट्यवधी लोक मृत्युमुखी पडू शकतात. ही भीती अनेकांनी व्यक्ती केली आहे. भेंडवळ मांडणी ही एक पारंपरिक धार्मिक सामाजिक प्रक्रिया आहे. २०२० मध्ये मांडणीत रोगराई व जगभर संकट येईल असे म्हटले गेले होते. त्यानंतर काही महिन्यांत कोविड-१९ महामारीचा उद्रेक झाला. या वर्षीच्या भेंडवळ मांडणीत कापूस, गहू, तांदूळ व इतर पिके साधारण तर काही पिकांचे अतिवृष्टीमुळे नुकसान होण्याची शक्यता वर्तवली आहे. देशात आर्थिक स्थिती अडचणीची राहणार असून काही भागात राष्ट्रपती राजवट लागू शकते, गुरे ढोरे यांच्यावर रोगराईचा प्रादुर्भाव असेल असे हजारो शेतकऱ्यांसमोर जाहीर केले हे ऐकून अनेक लोक चिंतेत आहेत. या भविष्यवाण्यांपेक्षा अधिक भयावह वास्तव म्हणजे शेतकऱ्यांचे सध्याचे जीवन. महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात शेतकरी पावसासह चांगल्या हवामानावर अवलंबून आहेत. मात्र गेल्या काही वर्षांत हवामानाचे स्वरूपच बदलले आहे. यामुळे पुढील गंभीर संकटे निर्माण झाली आहेत. एका बाजूला काही भागांत जून-जुलै महिन्यांमध्ये अपेक्षित पाऊस होत नाही. त्यामुळे खरीप पिकांची पेरणी होऊ शकत नाही किंवा केलेली पेरणी वाया जाते. जमिनीत दमटपणा नसल्यामुळे पिके निघत नाहीत. दुसऱ्या बाजूला, ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यांत एकाच आठवड्यात मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी पाऊस पडतो. परिणामी, शेतात पाणी साचते, पिके सडतात, शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते. ज्या ठिकाणी पाऊस कमी आहे तिथे पाण्याची तीव्र टंचाई आहे. जलसाठ्यांमध्ये पाणी कमी असून, सध्या राज्यातील अनेक गावांत विहिरी आटल्यात. काही भागात महिलांना पिण्याच्या पाण्यासाठी अनेक किलोमीटर पायपीट करावी लागते. शेतकरी पीक विमा घेतात, पण नुकसान झाल्यावर तेव्हा त्यांना वेळेवर किंवा योग्य भरपाई मिळत नाही. अनेक वेळा विमा कंपन्यांची टाळाटाळ, प्रशासनाची उदासीनता आणि दस्तावेजातील त्रुटी यामुळे शेतकऱ्यांना कायदेशीर लढाया कराव्या लागतात. बहुतेक शेतकऱ्यांचे उत्पन्न शेतीपुरते मर्यादित आहे. दुसऱ्या कोणत्याही उत्पन्न स्रोताचा अभाव असल्यामुळे दुष्काळ किंवा पूर यामुळे ते पूर्णपणे आर्थिक संकटात सापडतात. यामुळे आत्महत्यांचे प्रमाणही वाढते.

जगबुडीच्या भविष्यवाण्या आणि भेंडवळ परंपरेवर विश्वास ठेवणारे लोक विज्ञानाच्या नजरेत अंधश्रद्धाळू ठरतात. मात्र हे वास्तव नाकारून चालणार नाही की सामाजिक मानसशास्त्रात अशा परंपरांचा खोल परिणाम होतो. संकटाच्या काळात लोक मार्गदर्शन व आधारासाठी अशा परंपरांकडे वळतात. दुसरीकडे, विज्ञान स्पष्टपणे सांगतं की पर्यावरणीय असमतोल, अति लोकसंख्या, प्रदूषण हे पृथ्वीवरच्या नैसर्गिक आपत्तींसाठी जबाबदार घटक आहेत. शाश्वत शेतीची दिशा, नैसर्गिक शेती, सेंद्रिय शेती, मिश्र शेती अशा पद्धतींना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. जगबुडी, महायुद्ध किंवा पर्यावरणीय संकट ही फक्त भविष्यवाणी नाही, तर मानवाच्या वर्तनाचा वाईट परिणाम आहे. विज्ञान, शाश्वतता, आणि परंपरेतील शहाणपण यांचा समन्वय साधूनच आपण सुरक्षित संतुलित भविष्याकडे जाऊ शकतो.

९८८१७१७८२८

## इतस्ततः

दत्तात्रेय आंबुलकर

# प्रभावी औद्योगिक विकासासाठी...

गेल्या काही कालावधीत भारताची औद्योगिक विकासाची वेगवान घोडदौड सुरू आहे. देशांतर्गतच नव्हे, तर जागतिक पातळीवर भारताच्या विकास आणि विकासयात्रेची सकारात्मक नोंद घेतली जात आहे. जागतिक पातळीवर तंत्रज्ञानासह उद्योग-विकासाचे सहा मोठे करार होणे, याचीच पुष्टी करतात. असे असले तरी भारताच्या औद्योगिक विकासाला व या विकासयात्रेला गती देण्यासाठी मूलभूत स्वरूपातील बदल आणि बदलांची साथ तातडीने व वेळेत देणे ही काळाची गरज ठरते.

याआधी भारताने गेल्या दशकात पूर्व व दक्षिण आशियाई देश, ब्रिटन, न्यूझीलंड, युरोपीय देशांसह रशिया, मध्य आशियाई देशांसह अमेरिकेशी विविध प्रकारचे व्यापार-करार केले आहेत. याचा फायदा करारांशी संबंधित उभयपक्षी देशांना झाला आहे. यातूनच जागतिक स्तरावर भारतासाठी उद्योग-व्यवसाय व व्यापार अनुकूल वातावरण तयार होत गेले, ही वस्तुस्थिती आहे. मात्र, सद्य:स्थितीत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या लहरी स्वरूपातील बदलत्या व बदलणाऱ्या आयातशुल्कासह विविध प्रकारच्या व्यापारी धोरणांच्या पृष्ठभूमीवर भारताने आपल्या औद्योगिक धोरण आणि त्याच्या अंमलबजावणीचा मुळातून विचार करणे गरजेचे ठरते.

जागतिक स्तरावर आर्थिक अस्थिरतेसह वाढती स्पर्धा व राजकीय धोरणांसह घेण्यात येणाऱ्या निर्णयांचा परिणाम इतर देशांप्रमाणेच भारतावरही अपरिहार्यपणे होतो. ‘जागतिक व्यापार संघटना’, ‘जागतिक बँक’ आणि जगातील विभिन्न क्षेत्रीय व्यापारी संघटना यांच्या धोरणांच्या परिणामांना आज सर्व देशांना सामोरे जावे लागत आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नव्या आर्थिक धोरणांचा अमेरिका व देशाबाहेर होणाऱ्या परिणामांचा मागोवा घेणे, हे यानिमित्ताने महत्त्वाचे ठरते. नव्याने अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आल्यानंतर ट्रम्प यांनी अमेरिका आणि अमेरिकी उद्योग-व्यवसाय यांना सहकार्यासह प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला. ट्रम्प यांच्या नव्या राजवटीच्या या नव्या निर्णयाकडे एक स्वाभाविक प्राधान्यपर निर्णय म्हणून पाहण्यात आले. मात्र, सुरुवातीला आर्थिक-प्रशासनिक निर्णय भासणाऱ्या ट्रम्प प्रशासनाच्या या निर्णयाचा तपशील व परिणाम जगात सर्वांपुढे आला व त्याची आर्थिक-व्यावसायिक दाहकता समोर येत गेली.

वाढत्या आयातशुल्काशी संबंधित या निर्णयामुळे भल्याभल्या देशांचे धाबे दणाणले. आपल्या ‘धक्कातंत्रा’साठी प्रसिद्ध असणाऱ्या ट्रम्प प्रशासनाच्या या निर्णयाने अमेरिकेशी आयात व व्यापारव्यवहार करणाऱ्या देशांसमोर मोठे अर्थसंकट व व्यावसायिक आव्हान निर्माण झाले आहे. त्यानंतर टप्पा सुरू झाला, तो अमेरिकेच्या आयातशुल्कावर वाटाघाटींचा. अर्थात, या वाटाघाटींचे मुख्य सूत्र अमेरिकन प्रशासनाच्याच हाती राहिले.



जगातील विविध देशांच्या नेते आणि नेतृत्वाचा यानिमित्ताने नेमका कस लागला, हे विशेष. ट्रम्प यांच्या आयातशुल्क धोरणावर अवास्तव प्रतिक्रिया देण्याचे टाळून, प्राप्त परिस्थितीत अमेरिकेच्या वाढीव व अवास्तव आयातशुल्काबाबत व्यावहारिक भूमिका घेऊन या अकल्पित आर्थिक संकटाची तीव्रता कमी करण्याला धोरणात्मक प्राधान्य देऊन त्यानुसार तातडीने प्रयत्न सुरू केले. मोदी सरकारच्या या प्रयत्नामध्ये अमेरिकेशी व्यापारसंबंध व या संबंधांना मोदी-ट्रम्प यांच्या वैयक्तिक मैत्रीपूर्ण संबंधांची जोड देत तातडीने प्रयत्न केले. या प्रयत्नांसाठी भारताने अमेरिकेशी केलेले व्यापारी करार व प्रयत्न यांची जोड दिली गेली. यादृष्टीने नजीकच्या भूतकाळात केलेल्या करारांचे संदर्भ देण्यात आले. या प्रयत्नांचे एकत्रित व सकारात्मक परिणाम दिसून येऊ लागले. याचाच परिणाम म्हणून अमेरिकेने भारताच्या निर्यातशुल्काचा सहानुभूतिपूर्ण फेरविचार केला. त्यामुळे भारतीय उद्योग आणि कंपन्यांना दिलासा तर मिळालाच, त्याशिवाय भारतीय शेअर बाजाराला वेळेत पाठबळ मिळाले. अशा प्रकारे उद्योजकांपासून गुंतवणूकदारांपर्यंत सर्व संबंधित व महत्त्वाच्या घटकांना या नव्या भूमिकेचा फायदा झाला.

उद्योग-व्यवसायांच्या दृष्टीने या महत्त्वाच्या व सकारात्मक परिणामांचा विश्लेषक कानोसा घेता स्पष्ट होते की, समोर एका वर्षापूर्वी भारताने अमेरिकेशी उभयपक्षी व्यापार-उद्योगाला चालना देण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे करार केले. या करार करण्यामागे भारत-अमेरिका यांच्या परस्पर गरजांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने व त्यासंदर्भात उभय देशांचे व्यापारी-व्यावसायिक हित साधण्यासाठी उभयपक्षी प्रयत्न करण्यावर एकमत झाले होते. नेमक्या या कराराचा फायदा ट्रम्प यांच्या आयातशुल्कवाढ धोरणानंतर भारताला झाला. अर्थात यामध्ये नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली मुत्सद्देगिरीसह केलेल्या प्रयत्नांचा व वाटाघाटींचा मोठा वाटा राहिला. या प्रयत्नांच्या परिणामी भारताला मुख्यतः झालेला फायदा म्हणजे, भारत-अमेरिका व्यापारी करारानुसार अमेरिकन कंपन्यांनी भारतात विविध उत्पादनांच्या उत्पादन-प्रकिया उद्योगांना प्रोत्साहन दिले गेले. यामागे पंतप्रधान मोदींच्या ‘मेक इन इंडिया’ हे धोरणसूत्र होते. याचाच परिणाम म्हणून अमेरिकन कंपन्यांनी भारतात उत्पादन-उद्योग सुरू करण्यास सुरुवात केली. त्यामुळे भारतात या उद्योगांशी संबंधित नोकरी-रोजगार व त्याशिवाय विविध क्षेत्रातील गुंतवणूक तर वाढलीच, त्याशिवाय भारत व अमेरिकेच्या दरम्यानच्या या संयुक्त व परस्परांच्या हितसंबंधांवर आधारित या करारांमुळे ट्रम्प प्रशासनाला आयातशुल्क वाढीच्या आपल्या निर्णयाच्या संदर्भात भारताच्या बाबत सामंजस्यपूर्ण भूमिका घ्यावी लागली, हे या संदर्भात उल्लेखनीय आहे. भारताच्या आंतरराष्ट्रीय स्तरावर ‘मेक इन इंडिया’च्या प्रयत्नांना पूरक धोरणांची साथ मिळत आहे. यासंदर्भात नोव्हेंबर २०२४ साली सिंगापूर येथे झालेल्या औद्योगिक संमेलनात चीनच्या विरोधाला न जुमानता छोटी साधने आणि उपकरणांच्या मोठ्या प्रमाणावरील उत्पादनासाठी भारताला प्राधान्य देण्याचा घेण्यात आलेला निर्णय यासंदर्भातील एक महत्त्वाचा निर्णय टप्पा ठरला आहे. भारताने पण याच भूमिकेतून विचार करून केंद्र पातळीवर वाणिज्य मंत्रालयाला उत्पादन प्रक्रिया विभागाची भक्कम साथ दिल्यास भारतीय उत्पादन उद्योग आंतरराष्ट्रीय पातळीवर पण नावलौकिक कमावतील, हे निश्चित.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### काँग्रेसने ‘आंतरराष्ट्रीय’ व्हावे

भारतात काँग्रेस पक्ष सर्वांत जुना आहे. साठ वर्षे देशावर राज्य केले आणि स्वातंत्र्य लढ्यात काँग्रेसच्याच नेत्यांचे योगदान होते असे ते सांगत असतात. अशा विशाल पक्षाने आता खरे तर राष्ट्रीय न राहता आंतरराष्ट्रीय व्हायला हवे. काँग्रेसजवळ मजबूत नेतृत्व करणारे नेते आहेत, वरचेवर माध्यमांसमोर जाऊन जबरदस्त विधान करणारे आक्रमक नेते आहेत शिवाय राहुलबाबासारखे उच्चशिक्षित व सर्व कामात तरबेज म्हणजे गाडी रिपेअरिंग, फळे विकणे, ट्रक चालविणे वगैरे असा नेता आहे. शिवाय राहुल गांधी यांना आज जग बऱ्यापैकी ओळखू लागले आहे आणि जगाला त्यांच्यासारख्या नेत्यांची गरजपण आहे. आता उदाहरण द्यायचे झाल्यास तिकडे पाकिस्तानात बलुचिस्तान, खैबर पख्तुनवा येथे आजादीची लढाई सुरू आहे. काँग्रेस पक्षाला आजादी कशी मिळवायची याचा चांगलाच अनुभव आहे त्यामुळे त्यांनी पाकिस्तानात निवडणूक लढवली तर त्यांना हमखास यश मिळणार यात शंका नाही. शिवाय मणिशंकर अयर, दिग्विजयसिहग, कपिल सिब्बलसारखे हिंदुस्थानातील हालचावींवर गरळ ओकणारे प्रखर नेते प्रचारासाठी आहेच. भारतात कोणीही केव्हाही यावे अशी भावना ठेवणारे चन्नी साहेब आहेतच. त्यामुळे पाकिस्तानात विजय तर पक्का आहे. तसेच तिकडे कॅनडा, इंग्लड येथे खलिस्तान चळवळ चालविणारे नेते आहेत. त्यांनाही आजादी हवी आहे. तेव्हा त्यांना तेथेच आजादी मिळवून देण्याचे महान कार्य काँग्रेसच्या नशिबी असेल तर काय सांगता येते. अशा राष्ट्रीय पक्षाने आता आंतरराष्ट्रीय झेप घेण्याची वेळ आली आहे.

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

### लढाऊवृत्ती कायम ठेवणे आवश्यक

पहलगाममध्ये पाकिस्तानी अतिरेक्यांनी २६ हिंदूंची धार्मिक क्रूरतेतून हत्या केली. या घटनेचे विश्लेषण अनेक अंगांनी केले जाते. हिंदू समाज क्षात्रतेज विसरत चालला असल्याचे अनेकदा जाणवते. क्षात्रतेजाची प्रेरणा प्राप्त व्हावी अशी अनेक उदाहरणे आपल्याला माहीत असूनही प्रत्यक्ष जीवनात त्याचा अंगीकार अभावानेच होताना दिसतो. लवकुश या दोन बालकांनी लक्ष्मणासारख्या योद्ध्याला मूर्च्छित केले. अभिमन्यूसारखा बालक त्याचे काका युधिष्ठिर यांना चक्रव्यूह भेदण्यासाठी रणांगणात जाण्याची परवानगी मागतो. आदिलशाही, मोगल यांची जुलमी राजवट असतानाही छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्याची शपथ घेतात. अहल्यादेवी होळकर यांचे यजमान युद्धात कामी आले असतानाही शोक करीत न बसता शत्रूला परास्त करण्यासाठी कंबर कसतात. झाशीची राणी लक्ष्मीबाई कोवळ्या वयाच्या पुत्राला पाठीशी बांधून झाशी किल्याच्या तटावरून घोड्यासह उडी घेते. हुतात्मा भगतसिंह, राजगुरू, चंद्रशेखर आझाद, चाफेकर बंधू या सशस्त्र क्रांतिकारकांना त्याच्या कृतीचे परिणाम माहीत असतात. राष्ट्र सर्वोपरी मानणे आणि स्वतःचा जीव दुय्यम मानणे ही भूमिका क्षात्रतेज निर्माण करणारी ठरते.

अतिशय प्रेरणादायी इतिहास, देशाप्रति तन, मन, धन आणि प्राण अर्पण करणारे महात्मे माहीत असूनही अनेक भारतीयांना रणांगण तर सोडाच खेळाच्या मैदानाचाही परिचय नाही अशी स्थिती आहे. भारतीय लष्करातील जवान, अधिकारी स्वतःच्या मरणाला भीत नाहीत म्हणून त्यांचे क्षात्रतेज टिकून आहे. परमवीरचक्र, महावीरचक्र सन्मानित योद्ध्यांचे चरित्र अभ्यासले तर त्यांनी जीवाची पर्वा केली नाही हे समानसूत्र सापडते. अनेक भारतीयांना परीक्षेतील गुणांची टक्केवारी महत्त्वाची वाटते, अनेकांना खूप पैसे संग्रही असावे असे वाटते तर अनेकांना आरोग्यविमा सारख्या बाबी महत्त्वाच्या वाटतात.

काळ बदलत आहे. अतिरेक्यांची विध्वसंकवृत्ती नवे स्वरूप धारण करीत आहे. एकेकाळी अफगाणिस्तान, पाकिस्तान, बांगलादेश हे अखंड हिंदुस्थानचा भाग होते आणि भविष्यात तिथे हिंदू नामशेष होतील असे सध्याचे चित्र आहे. आपण या सर्व घटनांचा अभ्यास करून मैदानी खेळ खेळणे, शरीर बलदंड करणे, चपळता वाढविणे यावर भर दिला तरच आपले भविष्य उज्ज्वल राहू शकेल. क्षात्रतेजाचा विसर हा आपल्या अस्तित्वाशी निगडित आहे.

**हेमंत पुरुषोत्तम कद्रे**/९४२२२१५३४३

## वाचक पत्रे

### सुखी राहण्याचे काही उपाय

आपल्या उत्पन्नावर पहिला आपला हक्क. मस्त मजा करावी, आरोग्याकडे लक्ष असावे, नियमित व्यायाम करावा. मनातील सुख-दुःख हितचिंतकांनाच सांगावे. अन्यथा चांगल्या दुधात मिठाचा खडा पडल्यासारखे होईल. जवळील पैसे कुणालाही कधीही देऊ नये. जोवर जवळ पैसे आहेत, तोवरच सर्व विचारतील. उंच इमारती पाहून विनाकारण दुःखी होऊ नका. सुख आणि दुःख हे सोबतच येते आणि जातेदेखील. नेहमी मनमोकळ्या गप्पा मारा, झोपेतून उठल्यावर आणि झोपताना ईश्वराचे स्मरण करा. विचारल्याशिवाय कुणालाच सल्ला देऊ नका. कारण कुणालाच त्याची गरज नसते. शेवटी सांगायचे म्हणजे मनातील काही गुपिते कुणालाच सांगू नका.

**लक्ष्मण कुऱ्हेकर**/९५४५११२६४६

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१**
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

h nì ‘ÐH$ d àH$meH$ H$b^fUam‘ am‘H$îU Vma ¶mZr gmbmna VéU ^maV ‘r{S>¶m {b{‘Q>oS> H$[aVm, gmbmna VéU ^maV H$m¶m©b¶ ßbmQ> Z E -32,N>ìnVr g^mOrZJa BSpñQ>¶b H$m A¥’$ gmgm¶Qr aëd ñQ>eZ amS> N>ìnVr g^mOr ZJa 431005 (‘hmamï>) ¶oW NmnZ X{ZH$ gmbmna VéU ^maV H$m¶m©b¶,N>ìnVr g^mOrZJa ¶oW àH$m{eV H$êZ N>ìnVr g^mOrZJa, OmbZm,na^Ur,ZmXoS>, qhJmbr ,~rS> ¶Wrb gmbmna VéU ^maVÀ¶m {d^mJr¶ H$m¶m©b¶mVZ {dVarV H$b.
à~Y gnmXH$ :{ddH$ Kigmgr. ‘»¶ g‘h gnmXH$ : {Xbrn ¶edV nR>. ‘»¶ gnmXH$: àemV dgVamd ‘mZ, XaÜdZr -8888847268
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com ¶m AH$mV à{gÕ Pmbë¶m ~mVå¶m d b I ¶m‘YZ ì¶º$ Pmbë¶m ‘Vmer gnmXH$/gMmbH$ gh‘V AgVrbM Ag Zmhr. (nr. Ama. ~r. H$m¶ÚmZgma O~m~Xmar)

Made with Xodo PDF Reader and Editor





# सेवानिवृत्तीनंतरची नोकरी..

साठवणीतील आठवणी
● अनिल पाटील, पुणे
८००७७१६३२१



भारतीय रेल्वेच्या नोकरीतून मी २०११ साली सेवानिवृत्त झालो. चाळीस वर्षे रेल्वेची सेवा केली. बदल्यात मला रेल्वेने खूप भरपूर दिलं. तारुण्याच्या उंबरठ्यावर अंधारात चाचपडत असताना मला दिशा दिली. आर्थिक स्थैर्य दिलं. मानसिक समाधान आणि भरपूर मान मरातब आणि रुबाबात परदेशात दीड वर्ष नोकरी करण्याची अनोखी संधी दिली. म्हणूनच निवृत्ती नंतर सुमारे सहा महिन्याच्या आतच पुन्हा मला रेल विकास निगम लिमिटेडया भारतीय रेल्वेच्या एका शाखेने आपल्या सोलापूर डिव्हिजन मधील सोलापूर होटगी अक्कलकोट सेक्शन मध्ये डबल लाईनच्या चालू असलेल्या कामावर 'असिस्टंट एक्सपर्ट-रेल्वे सेफ्टी' या पदावर नियुक्त केले.. एक टाटा सुमो व्हिकल मला होटगी रोड वरील माझ्या घरापासून पिक-अप करून जिथं जिथं सेक्शन मध्ये काम चालू आहे तेथे पूर्णपणे सेफ्टी अँगलने दिवसभर सुपरव्हिजनचे काम करून झाल्यावर मला संध्याकाळी परत घरी ड्रॉप करायची. सुपरविजन म्हणजे रनिंग लाईनच्या शेजारी चालू असलेल्या दुसऱ्या लाईनच्या कामावरती नियुक्त केलेला स्टाफ नियत सेफ्टी नियमांचे पालन करतो की नाही, पूर्ण वर्क साईट शेजारी फेन्सिंगचे बॅरिकेटिंग केलेले आहे की नाही, वगैरे पाहून त्यांची नोंद करणे. आणि जर काही सुरक्षा नियमांना डावलून काम चालू असेल तर ताबडतोब ते काम थांबवणे. आणि संबंधित अधिकाऱ्यांना त्याचा रिपोर्ट करणे वगैरे.. हे काम मला फार आवडले. कारण याच डिविजन मध्ये पूर्ण सेवाकाळ गेलेला असल्यामुळे रेल्वेचा सर्व ऑन ड्युटी स्टाफ मला ओळखत होता. सेक्शन चे बॅरिकेटिंग काम चालू असताना मी त्या पूर्ण झालेल्या किलोमीटरेजची नोंद माझ्या डायरीत करायचो. कंत्राटदारातर्फे कधीकधी कळत नकळत गैरप्रकार व्हायचे. ते माझ्या ध्यानात यायचे. कारण झालेल्या फेंसिंग कामाच्या स्टेटमेंट वरती माझी काउंटर सिग्नेचर लागायची. आणि ती सही करताना मी माझे जवळचे रेकॉर्ड तपासायचो. त्यावेळी एक दोन ठिकाणी सेम किलोमीटरचे फेन्सिंग काम दाखवून बील दुसऱ्यांदा सबमिट करण्याचा प्रयत्न झाला होता.. तो मी हरकत घेऊन हाणून पाडला. त्यामुळे आर. व्ही. एन. एल (रेल विकास निगम लिमिटेड) यांच्या अधिकाऱ्यांचा माझ्यावरती पूर्ण विश्वास बसला. सुरुवातीला ही टाटा सुमो गाडी इंजिनिअरिंग अँड सिग्नलिंग विभाग एक्सपर्ट यांच्यामध्ये संयुक्तपणे दिलेली होती. मग पुढे ती फक्त मला एकट्यालाच देऊ केली. मला पूर्ण सेक्शनमध्ये म्हणजे नागणसूर दुधनी वगैरे स्टेशन पर्यंत कामाची देखरेख करायला जावे लागायचे. दिवस मजेत चालले होते. मला दिलेली टाटा सुमो तिलाटी जवळील तिल्लेहाळ गावचा एक २५ -२६ वर्षाचा उमदा तरुण प्रभाकर धायगुडे यांच्या मालकीची होती आणि तो स्वतः ड्रायव्हिंग करीत गाडी घेऊन यायचा. हा प्रभाकर अतिशय प्रामाणिक, नीटनेटक्या राहणीमानाचा, निर्व्यसनी आणि प्रेमळ स्वभावाचा होता.. पेपर वाचनाची भयंकर आवड. सेक्शन मध्ये जिथे काम चालू आहे तिथे भरावाखाली गाडी लावून मी वरती भरावावर लाईन आणि स्टाफ देखरेखी करता आलो म्हणजे हा प्रामाणिकपणे गाडीमध्येच पुस्तके पेपर वगैरे वाचन करीत बसायचा. लोकल वर्तमानपत्रांमध्ये त्या काळात प्रसिद्ध झालेले माझे एक दोन लेख मी त्याला दाखवले. त्यानंतर त्याची माझ्याकडे पाहण्याची दृष्टीच बदलली. आमच्या दोघांमध्ये भावनिक संबंध आणि मैत्रीचे बंध रुजले. तिल्लेहाळ या गावामध्ये थोडीफार शेती होती व तिथेच त्याचे छोटेसे घर होते. त्यांनी मला आग्रहाने एकदा त्याच्या घरी/ शेतावरती नेले होते. कारण आमच्या सोलापूरच्या परतीच्या वाटेवरच रोड पासून दूर आत एक दोन किलोमीटर आड मार्गावर त्याचे घर/ शेत होते. त्याच्या आईची. पत्नीची ओळख करून दिली. बाहेर शेणाने सारवलेल्या जमिनीवर वाकळ घालून भिंतीला टक्क्या लावून मला बसण्यास सांगितले. चुलीवरचा गरम चहा करून दिला.. हुरड्याला पण यायचे आमंत्रण दिले. निरोप घेताना समोरच्याच लिंबाच्या झाडावरील दहा-बारा पिवळी धमक लिंबे एका कॅरी बागेमध्ये घालून घरी नेण्यास दिली.. नको नको म्हणत असताना आग्रह करून त्या वृद्ध माऊलीने नेण्यास भाग पाडले. पैशाने थोडीफार कमी असली तरी दानतीने फार मोठ्या मनाची माणसे होती ही. कंत्राट दारातर्फे अक्कलकोट स्टेशनच्या अलीकडे सात आठ किलोमीटर अंतरावर एका मोकळ्या जागेत कॉन्ट्रॅक्टर एक लेबर कॅम्प, मेससह स्टाफ करता चालवत होता. कधी कधी कॉन्ट्रॅक्टर आम्हाला जेवायला तिकडेच दुपारी घेऊन जायचा वा बोलवायचा.. या प्रभाकरचे जेवण पण बऱ्याच वेळा आमच्याबरोबरच व्हायचं. त्यामुळे या प्रभाकरला माझा फार लळा लागला. वाटेत टपरी वरती चहा पिणे, एखाद्या वेळेस गरम गरम भजी खाणे, त्याला बील न देऊ देणे.. त्यामुळे तो भारावून जायचा. मी त्या कामावर असताना त्याला पुत्ररत्न प्राप्त झाले. आनंदी आनंद होऊन ती बातमी सांगताना मला तर अक्कलकोटच्या आमच्या ऑफिसमध्ये पेढे भरवलेच. परंतु सोलापूरला घरी येऊन माझ्या पत्नीच्या पाया पडून तिथे पुन्हा पेढ्याचा पुडा दिला. तो मुलाबाबत फारच भावना विवश व्हायचा.. मला कधी कधी म्हणायचा, ' पाटील साहेब मला माझ्या मुलाने पुढे मोठे झाल्यानंतर खोटे बोललेले चालणार नाही. त्याच्यावर मी खूप चांगले संस्कार करणार आहे, त्याला मी रेल्वेत नोकरी लावायचा प्रयत्न करणार आहे तुमच्यासारखे त्याने मोठा साहेब झालेलं मला बघायचंय ' वगैरे वगैरे.. यावर मी त्याला म्हणायचो, अरे मी फार मोठा नाही. मी एक रेल्वेतील सुपरवायझर लेव्हलचा साधा माणूस आहे. . तुझी आवड तू पोरावर लादू नकोस. . यावर तो मला म्हणाला, नाही साहेब, मोठा म्हणजे त्या अर्थाने नाही. तुम्ही मनाने जसे मोठ्या मनाचे, दिलदार आहात, तसे माझ्या मुलाने व्हावे असे मला वाटते. माझ्याबद्दल त्याच्या मनात असलेली ही भावना पाहून मी पण खूपच भारावून गेलो. यावर काय बोलावे तेच मला सूचेना. दिवस भुर्रकन चालले होते. आर. व्ही. एन. एल जॉईन करून वर्ष होऊन गेले होते. दुर्दैवाने बहुतेक ऑक्टोबर की नोव्हेंबर २०१३ मध्ये ही नोकरी मला सोडावी लागली. त्याला कारण जानेवारी २०१३ मध्ये आमच्या कुटुंबावर कोसळलेला एक दुःखद आघात.. माझ्या नोकरीचा तो शेवटचा दिवस. प्रभाकरच्या डोळ्यातूनसारखे अश्रू येत होते. आर. वी. एन. एल. प्रशासन पण माझा राजीनामा स्वीकारण्यास तयार होईना. तुम्ही दोन-तीन महिन्याची लॉन्ग लिव्ह घ्या. पेमेंटमध्ये दहा हजार रुपयाची वाढ करतो, वगैरे.. पण घरातील बदलत्या परिस्थितीमुळे मला माझ्या निर्णयावर ठाम राहावे लागले. पुढे मी पुण्यातच स्थायिक झालो मुलाकडे. पण हा प्रभाकर महिन्यातून एखादा फोन मला करायचा. सोलापुरात आल्यावर मला फोन करा म्हणायचा.. तुम्हाला घरी शेतावर न्यायचेय असे सांगायचा.. म्हणून कधी कधी असे वाटते की या प्रभाकरच्या अस्तित्वामुळेच माझी ही रेल विकास निगम लिमिटेडची वर्ष दीड वर्षाची नोकरी अतिशय आनंदात आणि सुखेनैव पार पडली.. म्हणतात ना.. अशी पाखरे येती आणि स्मृती ठेवुनी जाती..

# नरक चतुर्दशी व लक्ष्मीपूजन

प्रासंगिक
● विलास पंढरी
९८६०६१३८७२

**आज पाहुयात नरक चतुर्दशी व लक्ष्मीपूजनाची अख्याईका आणि महत्व. यंदा नरक चतुर्दशी व लक्ष्मीपूजन हे दोन्ही सण एकाच दिवशी आले आहेत. वास्तविक, चतुर्दशी तिथी ११ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजून ५८ मिनिटांनी सुरू होत आहे.नरक चतुर्दशीच्या दिवशी सूर्योदयापूर्वी अभ्यंगस्नान करण्याचे विशेष महत्त्व असते.पण चतुर्दशी दुपारी सुरू होत असल्याने नरक चतुर्दशी दुसऱ्या दिवशी म्हणजेच रविवार १२ नोव्हेंबरला साजरी करणे शास्त्राला धरून होणार आहे.**

## नरक चतुर्दशी

नरक चतुर्दशीला काली चतुर्दशी,रूप चतुर्दशी, छोटी दिवाळी आणि नरक निवारण चतुर्दशी या नांवाने देखील संबोधले जाते.नरक चतुर्दशीच्या संदर्भात दोन अख्याईका आढळतात. नरकासुर राक्षसाच्या वधाप्रीत्यर्थ आश्विन कृष्ण पक्ष चतुर्दशीला नरक चतुर्थी साजरी केली जाते. यामागील कहाणी अशी आहे. नरकासुर नावाचा राक्षस



लोकांना त्रास देत होता.लोकांच्या विनंतीवरून तेव्हा श्रीकृष्णाने त्याचा वध केला.मरताना नरकासुराने वर मागितला की,आजच्या तिथीला जी व्यक्ती मंगल स्नान करेल त्याला नरकाची पीडा होणार नाही . श्रीकृष्णाने त्याला तसा वर दिला. त्यामुळे नरक चतुर्दशीच्या दिवशी सूर्योदयापूर्वी अभ्यंगस्नान करण्याची रीत पडली. या दिवशी सूर्योदयापूर्वी उठून जे लोक स्नान करत नाहीत, अशांची वर्षभर दारिद्र्य आणि संकटे पाठ सोडत नाहीत,तसेच असे लोक नरकात जातात असे मानले जाते. म्हणून या चतुर्दशीला सकाळीच लवकर उठून शरीरावर तेल आणि उटणे लावून अभ्यंग स्नान करावे.

**दुसरी अख्यायिका अशी आहे.**

एक देश, ज्याला आता ईराक म्हणून संबोधले जाते, या दिवशी श्री कृष्णाने मुक्त केला होता. त्याकाळी ईराकवर नरकासुर नामक राक्षस राज्य करत होता. त्याने १६,१०० स्त्रियांना बंदिवासात टाकले होते. सर्व देशवासीय त्याच्या दुष्कृत्यांनी त्रस्त होते. त्याच्या मुलाचे नांव भगदत्त होते. त्याच्या नावावरून सध्या असलेल्याला शहराला बगदाद हे नांव पडले आहे. ईराक आज जे सहन करतोय तशीच ५,००० वर्षापूर्वी देखील ईराकमध्ये शासन व्यवस्था होती असे या माहितीवरून लक्षात येते. तेथील लोकांनी श्रीकृष्णाकडे मदत मागितली.म्हणून जेंव्हा तो राक्षस श्रीकृष्णाच्या हाताने मारला गेला तेंव्हा त्या स्त्रियांचा उध्दार झाला. श्रीकृष्णाने त्यांना मुक्त केले. त्या १६,१०० स्त्रियांनी सांगितले कि त्या आत्ता आत्महत्या करतील. त्या सर्वजणी सामुदायिक आत्महत्या करणार होत्या, कारण त्या स्त्रियांनी पती शिवाय जगणे वर्जित होते. त्यांना समाजात असुराच्या पत्नी म्हणून अवहेलना सहन करावी लागणार होती. म्हणून त्या सर्वजणींनी श्री कृष्णाला सांगितले कि असुरासोबत राहिल्यामुळे त्यांचे कुटुंबीय देखील त्यांना स्वीकारणार नाहीत आणि समाज देखील स्वीकारणार नाही. म्हणून आत्महत्या करण्याशिवाय दुसरा मार्ग नाही.यावर भगवान श्रीकृष्ण म्हणाले कि, 'मी तुम्हा सर्वांना माझे नाव देईन. तुम्हाला नरकासुराची पत्नी म्हणवून घेण्याची गरज नाही. श्रीकृष्ण त्याकाळातील खूप प्रसिध्द आणि लोकप्रिय व्यक्ती होते. असे केल्यास त्या सर्व महिला सन्मानपूर्वक जगू शकत होत्या. म्हणून श्रीकृष्णांनी त्यांचे स्वामी बनून, आपले नांव देऊन नरकासुराच्या बंदिवासातील स्त्रियांना सन्मान दिला. अशी ही कथा आहे. श्रीकृष्णांनी त्यांना नवीन जीवन दिले. पण वास्तविक भगवान श्रीकृष्णाच्या तीनच पत्नी होत्या, रुक्मिणी, सत्यभामा आणि जांबवती. श्रीकृष्णाच्या नरकासुर या असुरापासून मुक्त केल्याच्या अनंदाप्रित्यर्थ नरक चतुर्दशी साजरी केली जाते.

## दिवाळी आणि लक्ष्मीपूजन

दिवाळी हा हिंदूंचा सगळ्यात मोठा सण आहे. हा दीपोत्सव भारतात सर्वत्र साजरा होतो. या सणाला घरात व घराबाहेर तेलाचे लहान दिवे लावले जातात.हल्ली मेणपणत्या व लाईटच्या माळाही लावल्या जातात. उंच जागी आकाशकंदिल लावला जातो. घराबाहेर रांगोळ्या काढल्या जातात.पावसाळा संपून नवीन पिके हाती



आल्यानंतर शरद ऋतूच्या ऐन मध्यभागी आश्विन व कार्तिक या महिन्यांच्या संधिकालात हा सण येतो. दिवाळीचा सण साधारणपणे ऑक्टोबर - नोव्हेंबर दरम्यान येत असतो. या सणाला भारतात दीर्घ सुटी असते.यंदा १२ नोव्हेंबर रोजी दुपारी २वाजून ४५ मिनिटांनी अमावस्या तिथी सुरू होत आहे. दिवाळीच्या दिवशी रात्री लक्ष्मीपूजन केले जात असल्याने दिवाळी १२ नोव्हेंबरच्या रात्रीच साजरी करणे शास्त्रसंमत आहे . दीपावलीचे मूळचे नाव यक्षरात्री असे होते असे हेमचंद्राने नोंदवले आहे. तसेच वात्स्यायनाच्या कामसूत्रातही हेच नाव लिहीलेले आहे. नीलमत पुराणात या सणास दीपमाला असे म्हटले आहे. कनोजचा राजा हर्षवर्धन याने नागानंद नाटकात या सणाला दीपप्रतिपदुत्सव असे म्हटले आहे. ज्योतिषरत्नमाला या ग्रंथातही दिवाळी हा शब्द वापरला आहे. भविष्योत्तर पुराणात दिवाळीला दिपालीका म्हटले आहे, तसेच काल्विवेक या ग्रंथात तिचा उल्लेख सुखरात्रि असा करण्यात आला आहे, तर व्रतप्रकाश नावाच्या ग्रंथात सुख सुप्तिका म्हणून दिवाळी ओळखली जाते. अमावस्या अशुभ मानली जात असली तरी आश्विन महिन्यातील अमावस्या मात्र शुभ असून हा दिवस दिवाळीच्या उत्सवातील मुख्य दिवस असून या दिवशी संध्याकाळी लक्ष्मीचे पूजन केले जाते. लक्ष्मी ही फार चंचल असते असा समज आहे. त्यामुळे, शक्यतोवर हिंदू शास्त्राप्रमाणे लक्ष्मीपूजन हे,लक्ष्मी स्थिर रहावी म्हणून, स्थिर लग्नावर करतात. त्याने लक्ष्मी स्थिर राहते असा समज आहे. अनेक घरांत श्रीसूक्तपठणही केले जाते. व्यापारी लोकांचे हिशोबाचे नवीन वर्ष- विक्रमसंवत्- लक्ष्मीपूजनानंतर सुरू होते. या दिवशी अभ्यंग स्नान करतात. पाटावर रांगोळी **(पान ७ वर)**

# आभाळातनं पडला न् धरतरीनं वाढवला

बोलीचं बोलणं
● संध्या धर्माधिकारी, सोलापूर
९९२२१५६३३५






पुनरुत्पादन किंवा प्रजनन हे मानव जातीसह सर्व सजीवांचे मूलभूत वैशिष्ट्य आहे. जेव्हा ही जैविक प्रक्रिया पार पडते तेव्हा जन्माला येणाऱ्या त्या सजिवाचे संगोपन हे बहूतेक वेळा नैसर्गिकरीत्या मातेकडून केले जाते. याप्रमाणेच मानवाच्या अपत्याचे संगोपन मातेकडूनच केले जाते. काही अपवादात्मक परिस्थितीत पिता, आजी, वगैरे कुटुंबातील इतर सदस्याकडून केले जाते. इतर सजीवांच्या तुलनेत मानवी संततीला जास्त काळ संगोपनाची गरज असते. इतरांच्या आधाराशिवाय माणसांची बाळे वाढू शकत नाहीत हे त्रिकाल अबाधित सत्य आहे. पण काही व्यक्ती स्वतःच्या पायावर उभे राहिल्यावर हे सत्य नाकारतात. 'तुम्ही माझ्यासाठी काय केले ? काहीच नाही. ' असे आपल्या पालकांना ऐकवतात. अशा वेळी पालकाच्या मनाची अगतिकता दर्शविणारी ही उपरोधिक म्हण..

**म्हण - आभाळातनं पडला न् धरतरीनं वाढवला**

वरवर पाहता 'तुला कोणी जन्माला घातले नाही आणि कोणी तुझे पालनपोषणही केले नाही. तुझा तूच आपोआप जन्मालास व स्वतःच स्वतःचे पालनपोषण केलेस' असा या म्हणीचा अर्थ निघतो.

मात्र एखाद्या व्यक्तीची वाढ, प्रगती किंवा विकासही इतरांच्या सहकार्याशिवाय केवळ अशक्य आहे. आणि हे संगोपनाचे किंवा सहकार्यचे काम मुख्यतः त्या व्यक्तीचे कुटुंबीय, समाजातील घटक करत असतात पण ती व्यक्ती हे साफ नाकारते.

**उपयोगाचे उदाहरण -** चार घरची कामं करून तुला वाढवलं, तुझं शिक्षण केलं. आता स्वतःच्या पायावर उभे राहिल्यावर तू म्हणतोस 'माझ्यासाठी काय केलंस ?' खरं आहे बाबा ! तू ' आभाळातनं पडला न् धरतरीनं वाढवलं ' तुला !!

**रुपक कथा -** सुहासच्या फर्मच्या चौथ्या ऑफीसचे आज उद्घाटन होते. त्याने उद्घाटनाची जय्यत तयारी केली होती. प्रमुख पाहुणे म्हणून मुख्य वित्तीय अधिकारी तर उद्घाटक म्हणून एका मोठ्या उद्योगपतीला निमंत्रित केले होते. उद्घाटनाच्या तयारीत काही उणीव राहू नये म्हणून सुहास जातीने लक्ष घालून ती करून घेत होता. उत्कृष्ट नियोजनामुळे कार्यक्रम वेळेत सुरू झाला. कार्यक्रमाला खुप लोक उपस्थित होते. सुहासचा बालमित्र जयंतही आवर्जून आला होता. त्याने हळूच सुहासला विचारले...

अरे तुझे आईबाबा दिसत नाहीत कुठे? एव्हाना यायला पाहिजे होते ना ? नाही, ते येणार नाहीत.

का रे ? तब्येत वगैरे ठीक आहे ना ? तब्येतीला काय होतंय त्यांच्या ? मीच येऊ नका म्हणून सांगितले आहे. सुहास अगदी सहज म्हणाला. काय ? पण का नको म्हणालास ? जयंत ज्यांचा मला माझ्या व्यवसायात फायदा होणार आहे त्यांनाच मी आमंत्रित केले आहे. आईआप्पांनी मला जन्म देण्याशिवाय दुसरं काय केलं माझ्यासाठी ? त्यांना यातलं काय समजणार आहे ?


अरेरे ! किती कृतघ्न निपजलास रे ? तुझ्या उज्वल भविष्यासाठी काय काय दिव्य केलं ते त्यांचं त्यांनाच माहित ! जसं काही 'आभाळातनं पडलास न् धरतरीनं वाढवलं ' तुला. धिक्कार आहे तुझा. म्हणून जयंत कार्यक्रमातून निघून गेला.

# सिंहस्थला मार्गस्थ

## तैल रंग आणि कॅनव्हास

एका कुंचल्याचे भावविश्व
डॉ. सुहास सरवदे, सोलापूर
९४२२०६६८६६





मला लहानपणापासून फिरायची आवड होती. लहानपणी गावाला जायची संधी तशी कमीच मिळायची. तरीपण बहुतेक प्रवास हा एस टी तुनच होत असे. क्वचितच रेल्वेतून प्रवास करणे आमच्या नशिबात असे. कोणताही प्रवास असो मला मात्र खिडकी जवळची जागा पाहिजे असे. खिडकी जवळची जागा म्हणजे माझ्यासाठी स्वर्ग होता. खिडकीतून बाहेर पाहताना दिसणारी पळती झाडे, डोंगर आणि इतर गोष्टी पाहताना मला परमानंद होत असे. झुक झुक झुक झुक आगीनगाडी, धुरांच्या रेषा हवेत काढी, पळती झाडे पाहू या या प्रसिद्ध गाण्याच्या ओळीप्रमाणे आगगाडीचा प्रवास तर मला खुपच आवडत असे.

लहानपणापासून चित्रकलेची आवड असल्यामुळे मी झाडांचे, ढगांचे बारकाईने निरीक्षण करण्याचा प्रयत्न करत असे. विशेषतः इगतपुरीला शाळेला जाताना रस्त्याने दिसणारे डोंगर, हिरवीगार झाडे मला अक्षरशः वेड लावत असत. मला वाटे माझ्याकडे कॅमेरा असेल तर या सर्व दृश्याचे मी फोटो काढेन. पण तेव्हा माझ्याकडे कॅमेरा नसल्यामुळे ही इच्छा पूर्ण होऊ शकली नाही. पुढे अर्थातच चांगले कॅमेरे घेऊन मी त्याची भरपाई केली. शिकत असताना सहलीच्या प्रसिद्ध आणि निसर्गरम्य ठिकाणी जाऊन तो भाग प्रत्यक्ष पाहण्याची इच्छा क्वचितच पूर्ण व्हायची. पुढे नोकरीला लागल्यानंतर मात्र भारताच्या कानाकोपऱ्यात जाण्याची माझी इच्छा पूर्ण झाली. थेट काश्मीर पासून ते खाली कन्याकुमारीपर्यंत मी प्रवास केला आहे. आणि अशा प्रवासात निसर्गरम्य ठिकाणांबरोबरच तिथल्या व्यक्तिरेखा टिपण्याचीही संधी मला मिळाली.

एकदा अशाच एका हिमाचल प्रदेशातल्या धर्मशाला येथील एका प्रसिद्ध मंदिरासमोर मला हा साधू दिसला. त्याची लांबलचक दाढी, नारंगी उपरणे, डोक्याच्या झालेल्या जटा, हातातील पितळी भांडे याने माझे लक्ष वेधून घेतले. मी पुढे होऊन त्यांची विचारपूस केली. मग हळूच आपकी तस्वीर खिचू क्या ? अशी विचारणा केली. त्यांनी तात्काळ होकार दिला. मी पटकन माझा एसएलआर कॅमेरा काढला आणि त्यांना व्यवस्थित उभे राहणाच्या सूचना देत पटापट फोटो काढले. जाताना मला मेरे फोटो इस पत्तेपर जरूर भेजीयेगा असे सांगायला ते विसरले नाहीत. मी पण होकार देत त्यांची रजा घेतली.

सदर चित्र मी तैल रंगात कॅनव्हास वर काढले आहे. मला वैयक्तिकरित्या तैल रंगात चित्रे काढायला आवडतात. तैल रंगात कॅनव्हासवर काम करण्यातली मजा काही औरच आहे. या चित्रात साधूचा रापलेला चेहरा, त्याची थोडीशी कुरळी दाढी, जटांचा तांबूस झालेला रंग आणि त्याच्या चेहऱ्यावरचे माफक हास्य या गोष्टींकडे मी चित्र काढताना विशेष लक्ष दिले. त्याच्या कपाळावर असलेला मळवट रंगवताना तो नैसर्गिक वाटावा यासाठी प्रयत्न केले. साधूच्या गळयातील रुद्राक्षाची माळ, हातातील अंगठ्या आणि पितळी भांडे रंगवताना मला खूपच छान वाटले. विशेषतः पितळी भांड्याची चमक तंतोतंत वठली पाहिजे यासाठी मी रंगांच्या योग्य मिश्रणाचे भान ठेवले. तैल रंगात रंग मळकट आणि निस्तेज होण्याचा धोका असतो. त्यासाठी रंगांचा संयमित वापर आणि मिश्रण करणे अत्यंत महत्वाचे आहे. प्रस्तुत चित्र जिवंत वाटते का नाही हे रसिकांनी ठरवायचे आहे.

व्यक्तिचित्राच्या परंपरेमध्ये तैल रंगाचे विशेष स्थान आहे. जगप्रसिद्ध असे ' मोनालिसा ' हे चित्र लिओनार्डो दा विंची याने तैल रंगात साकारलेले आहे. असे म्हणतात की त्या चित्रातील युवतीचे हास्य आणि तिच्या चेहऱ्यावरील भाव हे अत्यंत गूढ आणि अनाकलनीय आहेत. कलेची एवढी उंची गाठलेल्या त्या कलाकृतीसाठी लिओनार्डोने अफाट मेहनत घेतली. अशी आख्यायिका आहे की सदर व्यक्तिचित्र रंगवत असताना तिची मनस्थिती आनंदी रहावी यासाठी वादकांचा एक ताफा सतत तिथे उत्तम रचनांचे वादन करीत असे. सतत तीन वर्षे हे चित्र रेखाटूनही त्याला हे चित्र पूर्ण झाले असे वाटत नव्हते. त्याच्या मुत्यूपर्यंत हे चित्र त्याच्याजवळच होते. त्याने या चित्राचा सौदा करणे शेवटपर्यंत टाळले. सध्या हे चित्र पॅरिसमधील प्रसिद्ध **(पान ७ वर)**

Made with Xodo PDF Reader and Editor


# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

बुधवार दि.७ मे २०२५

https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत


## भादा परिसराच्या विकासासाठी कटिबद्ध : कराड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ एप्रिल -** गेल्या पंधरा वर्षात काँग्रेसच्या काळात कुठलीही योजना मंजूर केली नाही. गेल्या चार वर्षात रस्त्याच्या विविध कामाबरोबरच आमदार निधी काय असतो याची जाणीव आपण या भागाला करून दिली.

शासनाच्या विविध विकास योजना मंजूर केल्याने या भागातील मतदारांनी मला मोठे समर्थन दिले. येणाऱ्या काळात भादा सर्कलमधील सर्वच गावात, वाडी-वस्तीत सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध आहोत, असे प्रतिपादन लातूर ग्रामीणचे आ. रमेशआप्पा कराड यांनी रविवारी सायंकाळी भादा येथील जाहीर आभार सभेत मतदारांशी संवाद साधताना केले.

याप्रसंगी शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख ॲड. बळवंत जाधव, युवा नेते ऋषिकेश कराड, विक्रम शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर यांच्यासह पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना आ. कराड म्हणाले की, या मतदारसंघात दोन वेळा पराभूत झालो म्हणून कधीच खचलो नाही, थकलो नाही, उलट दुसऱ्या दिवशीपासून जनतेच्या न्याय हक्कासाठी संघर्ष सुरू ठेवला. मागील साडेतीन चार वर्षात मतदार संघात तेराशे कोटी रुपयांची कामे केली. निवडणुकीनंतर विधिमंडळाचे अधिवेशन आणि माझ्या डोळ्याची शस्त्रक्रिया यामुळे गावोगाव जाता आले नाही, यापुढे कायम संपर्कात राहून या भागाचा विकास करण्यासाठी मी कटिबद्ध आहे. प्रारंभी नूतन मंडल अध्यक्ष उद्धव काळे यांनी प्रास्ताविक, बालाजी साळुंके यांनी आभार प्रदर्शन तर सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले.

### संक्षिप्त वृत्त...

## नागरिकांच्या समस्या सोडविण्यास कटिबध्दः आ. देशमुख

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ६ एप्रिल -** निवडणुकीनंतर माझी पहिली भेट हरंगूळ (बु.) गावाला आहे. निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी मी येथे आलो आहे. गावच्या विकासासाठी निधी उपलब्धतेबरोबर नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी आपण कटिबध्द आहोत, असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी केले.

तालुक्यातील हरंगुळ (बु, वरवंटी येथे विविध विकासकामांच्या भूमिपूजन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी विलास साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन वैजनाथ शिंदे, गटविकास अधिकारी तुकाराम भालके, बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, काँग्रेसचे शहराध्यक्ष ॲड. किरण जाधव, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, विलास बँकेचे व्हाईस चेअरमन ॲड. समद पटेल, ट्वेन्टी-वन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, संचालक श्याम बरुरे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सुभाष घोडके, शाखा अभियंता दत्तात्रय पाचगे, उपअभियंता उषा मोतीपवळे, शाखा अभियंता प्रिया पाटील, सरपंच शीतल झुंजारे उपस्थित होते.

सदरील कामे जलद गतीने आणि दर्जेदार व्हावीत. गावच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून दिला आहे, पुढेही निधी उपलब्ध करून देऊ, असे यावेळी आमदार देशमुख म्हणाले. यावेळी वरवंटी, हरंगुळ शिवरस्ता, परशुराम पार्कसमोरील रस्ता ते हरंगुळ रोडपर्यंतचा रस्ता, वरवंटीतील जिजाऊनगरात सिमेंट काँक्रिट रस्ता, नाली बांधकाम, अशा विकासकामांचे भूमिपूजन झाले.

## बारावी परिक्षेत त्रिपुरा महाविद्यालयाची उत्तुंग भरारी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ६ एप्रिल -** श्री संगमेश्वर चॅरिटेबल ट्रस्ट संचलित श्री त्रिपुरा महाविद्यालय रिलायन्स पॅटर्नचा विज्ञान व लातूर बारावी शाखेचा निकाल ९८.४७ टक्के प्रतीक्षा पायंचे लागला.

प्रतीक्षा पायंचे ९०.५ टक्के गुण घेऊन प्रथम आली. श्रेया इंगळे ८८.८३ टक्के, श्रेया लक्कू हिने ८६ टक्के गुण घेऊन अनुक्रमे द्वितीय व तृतीय आल्या आहेत. तसेच मानस कब्बूर (८६ टक्के), सृष्टी डेरे (८५.३३ टक्के), शरयू केंद्रे (८५.३३ टक्के), अपेक्षा सावंत (८५.१६ टक्के), सोम्या महाजन याने ८५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवून यश संपादन केले आहे.

भौतिकशास्त्र विषयात शंभरपैकी ९० पेक्षा अधिक गुण मिळवणारे ५, रसायनशास्त्र विषयात ९, गणितात ८ व जीवशास्त्र विषयात ५ विद्यार्थी आहेत. गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक संस्थाध्यक्ष प्रा. उमाकांत होनराव, संस्थेच्या सचिव तथा प्राचार्या सुलक्षणा केवळराम, कार्यकारी संचालक ओंकार होनराव, कोषाध्यक्षा प्रेरणा होनराव, प्रा. संगम खराबे, प्रा. सतीष पाटील, प्रा. मिरा मुंढे, प्रा. प्रसाद कुलकर्णी, प्रा. शेख मेहराज, प्रा. दीपमाला तेलंग, प्रा. अश्विनी मोरे, प्रा. शुभांगी गंगथडे, प्रा. मेघा दिवे, प्रा. रोहित भिंगोले, प्रा. स्नेहा पाटील, प्रा. आरती घोडके, प्रा. नेमीचंद बनसोडे आदींनी केले आहे.

## 'दयानंद' फार्मसीच्या ४७ विद्यार्थ्यांना देण्यात आले थेट नियुक्ती पत्र

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ६ एप्रिल -** फार्मसी क्षेत्रात करियर घडवण्याची संधी मिळावी म्हणून दयानंद शिक्षण संस्था,लातूर द्वारा संचालित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी,लातूर येथे हैद्राबाद येथील मेडप्लस फार्मसी कंपनी मार्फत कॅम्पस इंटरव्ह्यू आयोजित केले होते.

या कॅम्पस इंटरव्ह्यू करिता तज्ञ् म्हणून निलेश संभरकर (टेरिटरी एच.आर.),नितीन फूलझेले (मॅनेजमेण्ट ट्रेनी) आणि अंकोश राठोड (सुपरवायझर ऑपरेशन्स) यांची प्रमुख उपस्थिती होती.कंपनी बद्दल माहिती देताना निलेश संभरकर यांनी मेडप्लस फार्मसी कंपनी व त्या मधील विविध कामे आणि त्या त्या पदाची जबाबदारी याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले.या प्रसंगी उपस्थित तज्ञांचे यथोचित स्वागत महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते यांनी केले. मेडप्लस ही एक भारतीय फार्मसी रिटेल चेन आहे. ज्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले त्या सर्वांचे अनेकांनी अभिनंदन केले.

# बारावी परिक्षेत लातूर मंडळात यंदाही मुलीच अव्वल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ६ एप्रिल - बारावीच्या परीक्षेत लातूर परीक्षा मंडळात मुलींनीच आघाडी घेतली आहे. लातूर मंडळातील ९१ हजार ६९९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ९० हजार २७७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यातील ८० हजार ७७० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. हे प्रमाण ८९.४६ टक्के इतके आहे.**

या परीक्षा मंडळात ४२ हजार ३३८ मुले व ३८ हजार ४३२ मुलींनी परीक्षा दिली. मुलांच्या उत्तीर्णतेचे प्रमाण ८५.९९ टक्के इतके आहे तर मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण ९३.६३ टक्के आहे. सुमारे आठ टक्क्याने मुलांपेक्षा मुली गुणवत्तेत पुढे आहेत.

विज्ञान शाखेत ४९ हजार ७६७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यापैकी ४८ हजार २३१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून उत्तीर्णतेचे प्रमाण ९६.९१ टक्के इतके आहे. वाणिज्य शाखेत ७ हजार ९०० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. ७ हजार १३४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्णतेचे प्रमाण ९०.३० टक्के आहे. कला शाखेत २९ हजार ३६० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. २२ हजार ८९६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. हे प्रमाण ७७.९८ टक्के इतके आहे. व्यवसाय अभ्यासक्रमात हजार १३४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

उत्तीर्णतेचे प्रमाण ९०.३० टक्के आहे. कला शाखेत २९ हजार ३६० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. २२ हजार ८९६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. हे प्रमाण ७७.९८ टक्के इतके आहे. व्यवसाय अभ्यासक्रमात २७५८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, उत्तीर्ण २०८६ झाले. हे प्रमाण ७१.६३ टक्के इतके आहे.

बारावीच्या निकालात ७५ टक्केपेक्षा अधिक गुण घेतलेले ६२९२, ६० टक्के पेक्षा अधिक गुण घेतलेले २३ हजार ५४५, ४५ टक्के पेक्षा अधिक गुण घेतलेले ४० हजार ४०८ तर उत्तीर्ण श्रेणीत १० हजार ५२५ विद्यार्थी आहेत असे सांगण्यात आले.

### गुणवत्ता, टक्केवारी वाढीसाठी प्रयत्न करणार

यंदा लातूर विभागाची टक्केवारी काही प्रमाणात कमी झाली आहे. हा चिंतेचा नव्हे तर चिंतनाचा विषय आहे. शैक्षणिक क्षेत्रातील 'लातूर पॅटर्न'ला पूर्वीप्रमाणे झळाळी आणण्यासाठी मुख्याध्यापक, शिक्षक आणि संबंधितांची वेळोवेळी बैठक घेऊन गुणवत्ता, टक्केवारी वाढीसाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. यासाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता आहे.

**- सुधाकर तेलंग**
विभागीय अध्यक्ष, लातूर शिक्षण मंडळ

### लातूर विभागाचा टक्का घसरला

**गतवर्षी लातूर विभागाचा ९२.३६ टक्के निकाल लागला होता. त्यात लातूर जिल्ह्याचा ९३.३९ टक्के, धाराशिव ८९.७८ तर नांदेड जिल्ह्याचा ८९.७४ टक्के निकाल लागला होता. यंदा लातूर जिल्ह्याचा ८६.६८ टक्के, धाराशिव ९२.३२ तर नांदेड जिल्ह्याचा ९०.८२ टक्के निकाल लागला आहे. गेल्या पंधरा वर्षांपासून लातूर विभागात लातूर विभाग निकालात अव्वल स्थानी असायचा. मात्र, यंदा लातूर जिल्ह्याचा टक्का घसरला आहे. राज्यातील नऊ मंडळात गतवर्षी लातूर विभाग नवव्या स्थानी होता. परंतु, यंदा तो सातव्या स्थानावर आला आहे. लातूरचा टक्का वाढविण्यासाठी शिक्षण विभाग आणि पालकांनी प्रयत्न करण्याची गरज आहे.**

## दोन दिवस वीज बंद राहणार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ६ एप्रिल -** उच्चदाब वीज वाहिन्या बदलणे, उपकेंद्रातील पॉवर ट्रान्सफर बदलणे व दुरुस्ती करण्याकरिता ७ आणि ८ मे रोजी शहरातील वेगवेगळ्या भागातील वीजपुरवठा बंद राहणार आहे. सायंकाळी ५ ते ६.३० पहिला टप्पा, दुसऱ्या ६.३० ते ८ आणि तिसऱ्या टप्प्यात ९ ते ११ वाजेपर्यंत वीजपुरवठा बंद करण्यात येणार आहे. वीज ग्राहकांनी वेळेची दक्षता घ्यावी व महावितरणला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात सोनानगर, कोंबडे डीपी, कुलस्वामिनी नगर, शिवशंकर कॉलनी, विठ्ठल-रुक्मिणी नगर, आवंती नगर, सय्यद नगर, साई शाळेजवळील परिसर आदी ठिकांचा विज पुरवठा खंडीत राहणार आहे.

## औसा रोडवरील झाड कोसळल्याने चार मोटरसायकलींचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ६ एप्रिल -** शहरासह परिसरात सोमवारी (दि. ५) सायंकाळच्या सुमारास अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे औसा रस्त्यावरील गोदावरी बेकरी समोरील मोठे झाड अर्ध्यातून मोडून पडले. यामुळे या झाडाखाली अडकून ४ मोटारसायकलींचे नुकसान झाले आहे. झाड कोसळल्याने अर्ध्या तासापेक्षा जास्त वेळ वाहतूक बंद होती.

महापालिकेच्या पथकाने रस्त्यावरील झाड हटवून वाहतूक सुरळीत केली. अग्निशामक व स्वच्छता विभागाच्या कर्मचाऱ्यांनी फांद्या तोडून परिसर रिकामा केला.

सोमवारी (दि. ५) सायंकाळच्या सुमारास अचानकपणे सोसाट्याचा वारा सुटला. यामुळे नागरिकांची पळता भुई थोडी झाली. रस्त्यावरील प्रत्येक जण आश्रय शोधण्याचा प्रयत्न करीत होते. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे धुळीने वातावरण माखले होते. अशातच गोदावरील बेकरीसमोरील झाड कोसळले. त्यामुळे झाडाखाली लावलेल्या ४ दुचाकी अडकल्याने त्यांचे नुकसान झाले आहे. महापालिकेच्या पथकाने झाडाचे तुकडे करून परिसर मोकळा केला, अशी माहिती देण्यात आली.

## कामगार दिनी महावितरणच्या ३८ गुणवंत कामगारांचा गौरव

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ६ एप्रिल -** महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्या निमित्ताने महावितरणच्या लातूर परिमंडलातील ४६ वीज कर्मचाऱ्यांचा मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांच्या हस्ते गुणवंत कर्मचारी पुरस्कार देवून गौरव करण्यात आला.

यामध्ये ७ यंत्रचालक तर ३९ तंत्रज्ञ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. याप्रसंगी पुरस्कार प्राप्त कर्मचाऱ्यांचा गौरव करत वीजसेवेच्या क्षेत्रातील बदलत्या आव्हानास सामोरे जात ग्राहकाभिमुख सेवा देण्याबरोबरच अपघात विरहीत व सुरक्षीत सेवा देण्यासाठी आपण सतर्क असायला हवं असे विचार मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांनी व्यक्त केले.



परिमंडळकार्यालयातपारपडलेल्या गौरव सोहळयात ग्राहकाभिमुख सेवा देत वीजग्राहकांच्या मनामध्ये महावितरणबाबत सकारात्मक प्रतिमा निर्माण करण्यात योगदान देणाऱ्या ४६ तांत्रिक कामगारांचा सन्मान चिन्ह आणि प्रमाणपत्र देवून गुणवंत कामगार म्हणून गौरव करण्यात आला. यामध्ये लातूर जिल्हयातील २० कामगारांचा, बीड जिल्हयातील १४ कामगारांचा तर धाराशीव जिल्हयातील १२ कामगारांचा समावेश आहे.

या गौरव सोहळया प्रसंगी मुख्य अभियंता अरविंद बुलबुले पुरस्कारप्राप्त कर्मचाऱ्यांना शुभेच्छा देत म्हणाले की, आज विजेच्या क्षेत्रात काम करत असतांना ग्राहक सेवेला प्राधान्य देत महावितरणच्या यशामध्ये भर टाकण्याचं महत्वपुर्ण काम तांत्रिक कामगारांकडून होत आहे. महावितरण प्रशासनाने नव्याने सुरू केलेल्या अत्याधूनिक सेवा आत्मसात करत कंपनीचा हिताच्या दृष्टिनेच सर्व कामगारांनी कार्यरत राहीले पाहिजे.

सोबतच होणारे संभाव्य अपघात टाळण्यासाठी वीजयंत्रणेची देखभाल दुरूस्ती करत असताना कंपनीने दिलेल्या सुरक्षा साधनाचा वापर करत काम करावे. उपकेंद्रातील आर्थिंग वारंवार तपासणे, डिस्चार्ज रॉड वापरणे तसेच रीतसर परमीट घेवूनच काम करणे याबाबीकडे गांभिर्याने लक्ष द्यावे असे विचारही श्री. बुलबुले यांनी व्यक्त केले.

## राजर्षी शाहू महाविद्यालयाचा दबदबा कायम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ६ एप्रिल -** बारावी बोर्ड परीक्षेत राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. विज्ञान शाखेतील एकूण १०८९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याने शाखेचा शंभर टक्के निकाल लागला आहे.

द्रोणा वीरकपाळे याने ९४.८३ टक्के गुणांसह महाविद्यालयात सर्वप्रथम आला. शिवानंद तिडके द्वितीय, शिवोहम शिंदे याने ९३.५० टक्के गुणांसह तृतीय आला. एकूण १५ विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळाले. ७६ विद्यार्थ्यांना ८५ टक्क्यांपेक्षा जास्त गुण आहेत. ४३१ विद्यार्थी विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण झाले आहेत.







वाणिज्य शाखेतील एकूण ४५१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यापैकी ४४१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. वाणिज्य शाखेचा निकाल ९७.७८ टक्के आहे. तसेच कला शाखेतील २२९ पैकी २११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. कला शाखेचा निकाल ९२.१३ टक्के आहे. एचएससी व्होकेशनल शाखेचा निकाल ८९.६५ टक्के आहे. वाणिज्य शाखेत अनुष्का कलंत्री व सरस्वती सारडा यांनी प्रत्येकी ९६.१७ टक्के गुणांसह महाविद्यालयात प्रथम आल्या. विद्या सूर्यवंशी व जान्हवी हिरवे द्वितीय तर समृध्दी मुंदडा व निकिता कासट तृतीय आल्या. ३२ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण घेतले आहेत. १४६ विद्यार्थी विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. कला शाखेतील तन्वी भोसले हिने ९३ टक्के गुण घेऊन महाविद्यालयात प्रथम आली. श्रुती अष्टेकर ही द्वितीय तर आर्य पवीर्वी ही तृतीय आली. तीन विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण घेतले आहेत. ४८ विद्यार्थी विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. एचएससी व्होकेशनल शाखेतील पठाण मदिहा हिने ७३.३३ टक्के गुण घेऊन महाविद्यालयात प्रथम आली. महाविद्यालयात शंभरपैकी शंभर गुण मिळविणारे संस्कृत- ३६, पाली १७, एएसटी- ५, पुस्तपालन व लेखाकर्म- ६, रशियन १ तसेच मत्स्यशास्त्र विषयात २०० पैकी २०० गुण मिळविणारे ५ विद्यार्थी आहेत.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील, उपाध्यक्ष डॉ. पी. आर. देशमुख, सचिव प्राचार्य अनिरूद्ध जाधव, गोपाळ शिंदे, ॲड. सुनील सोनवणे, डॉ. आर.एल. कावळे, सर्व संचालक, शालेय समिती अध्यक्ष डॉ. सुहास गोरे, डॉ. महादेव गव्हाणे, प्रा. एस.एन. शिंदे, प्रा. दिलीप देशमुख, प्रा. जयराज गंगणे आदिंनी कौतुक केले.

## दयानंद महाविद्यालयाची यशाची परंपरा कायम

### विज्ञान ९८, कला ८२, वाणिज्यचा ९५ टक्के निकाल



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ६ एप्रिल -** बारावी बोर्ड परीक्षेत दयानंद कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने नेत्रदीपक यश संपादन केले. यात दयानंद कला महाविद्यालयाचा निकाल ८२.२१ टक्के लागला आहे.

एकूण ३४३ पैकी २८२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. कामिनी कांबळे व गायत्री राजूरकर यांनी प्रत्येकी २२.१७ टक्के गुण घेतले. त्या दोघीही महाविद्यालयात प्रथम आल्या. अपेक्षा दलाल द्वितीय आली. अपेक्षा धावारे हिने ९०.१७ टक्के घेतले. प्रथम श्रेणीत ११०, द्वितीय श्रेणीत ८१, तृतीय श्रेणीत ४५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील श्रेया कुंभकरण हिने ९७.५० टक्के गुण घेऊन प्रथम आली. वेदांत कलंत्री द्वितीय, कृष्णकांत कुलकर्णी तृतीय आला. महाविद्यालयातील ४५ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त केले आहेत. ८५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण ७७आणि ७५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण १७१ विद्यार्थ्यांनी घेतले. महाविद्यालयाचा निकाल ९५.४५ टक्के लागला.

दयानंद विज्ञान महाविद्यालयाचा निकाल ९८.२४ टक्के लागला. वैष्णवी पाटोळे व प्रांजल वर्मा यांनी प्रत्येकी ९२ टक्के गुण घेऊन प्रथम आल्या. ओमप्रसाद रणखांब द्वितीय, तर प्रथमेश लंगोटे तृतीय आला. ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण ८ विद्यार्थ्यांनी घेतले. ८५ टक्क्यांपेक्षा जास्त गुण २८, तर ८० टक्क्यांपेक्षा अधिक गुण ५९ विद्यार्थ्यांनी घेतले. विशेष प्राविण्यासह ११०, प्रथम श्रेणीत ४७६ विद्यार्थी आले आहेत.

दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंद सोनवणे, ललितभाई शाह, रमेशकुमार राठी, सचिव रमेश बियाणी, संयुक्त सचिव विशाल लाहोटी, सहायक सचिव ॲड. श्रीकांत उटगे, अजिंक्य सोनवणे, कोषाध्यक्ष संजय बोरा यांच्यासह प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, शिक्षकांनी कौतुक केले आहे.

पालीमध्ये ३० विद्यार्थ्यांना शंभरपैकी शंभर गुण पाली विषयात १०० पैकी १०० गुण ३० विद्यार्थ्यांनी घेतले आहेत. तसेच अकौंटन्सीमध्ये १७ विद्यार्थ्यांना पैकीच्य पैकी गुण मिळाले. बँकिंग विषयात १३ विद्यार्थ्यांनी दोनशेपैकी दोनशे गुण घेतले आहेत. एसआयएसई विषयात दहा विद्यार्थ्यांनी पैकीच्या पैकी गुण घेतले. संस्कृतमध्ये दोन, अर्थशास्त्रात एक, सचिवाची कार्यपद्धती विषयात दोन विद्यार्थ्यांनी पैकीच्या पैकी गुण घेतले आहेत.

गणित विषयात एकाने शंभरपैकी शंभर गुण घेतले आहेत. वाणिज्य संघटन विषयात शंभरपैकी २९ गुण घेणारे नऊ विद्यार्थी आहेत. तसेच आयटी विषयात शंभरपैकी ९९ गुण घेणारा एक तर इंग्रजीत शंभरपैकी ९५ गुण घेणारा एक विद्यार्थी आहे. हिंदीमध्ये एकाने २५ तर मराठीत एका विद्यार्थ्याने २२ गुण घेतले आहेत. या गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले.

# मोजणी नकाशा शिवाय जमिनीची खरेदी विक्री बंद

**तभा वृत्तसेवा / सुधीर गंगणे**

**औसा, दि.६ मे -** शासनाला सर्वाधिक महसुल मिळवून देणाऱ्या जमिन खरेदी-विक्री व्यवहारात विक्री करण्यात येत असलेल्या जमिनीची मोजणी करुन चर्तुसिमा कायम केल्याचा मोजणीनकाशा व्यवहाराच्या दस्ताऐवजात जोडण्यात यावा. अशी दुरुस्ती शासनाकडून दि.२८ एप्रिल रोजी करण्यात आली असल्याने जमिन खरेदी विक्रीचे व्यवहार सोमवार दि.५ पासून बंद झाले आहेत. व्यवहार काळात जमिनीची मोजणी करुन नकाशा जोडणे अशक्य असल्यामुळे शासनाचा कोट्यावधी रुपयांचा महसुल बुडणार आहे.या दुरुस्ती कायद्यामुळे खाजगी देवाण घेवाण अचानकपणे बंद झाली असून दिवसभरात व्यवहार ठप्प झाले आहेत. तर निबंधक कार्यालयातील गर्दी ओसरली आहे.

लग्नसराईचा या वर्षातील शेवटचा महिना आणि आगामी खरिप हंगामातील लागवडीसाठी आर्थिक जुळवाजुळव करण्याचे अखेरचे दिवस असल्यामुळे या मे महिन्यात वर्षातील सर्वात मोठी आर्थिक उलाढाल होते. तसेच मुला-मुलींच्या पुढील शिक्षणासाठी लागणाऱ्या पैशाची जुळवाजुळवही याच महिन्यात होते. यामुळे वर्षातील ११ महिन्यात होणाऱ्या उलाढाली एवढी उलाढाल या महिन्यात होते. आणि याच महिन्यात राज्य सरकारने जमिन खरेदी-विक्री कायद्यात व्यवहार झालेल्या जमिनीची मोजणी करुन या जमिनीच्या चर्तुसिमा कायम केलेला जमिनीचा नकाशा खरेदी विक्रीच्या दस्तात जोडण्याची दुरुस्ती केल्याचा आदेश दि.२८ एप्रिल रोजी दिला आहे.

संबंधित निबंधक कार्यालयांनी दि.५ मे पासून शासनाने दिलेल्या आदेशाची अमंलबजावणी सुरु केली आहे. याचा विपरीत परिणाम खाजगी व्यवहारावर झाला असून दिवसभरात जमिनीची एकही खरेदी विक्री झाली नाही. अचानकपणे जमिनीची खरेदी-विक्री बंद झाल्यामुळे खाजगी व्यहारातील उलाढाली ठप्प झाल्या आहेत.

जमिनीच्या खरेदी विक्री व्यवहारात जमिनीच्या चर्तुसिमा कायम करण्यासाठी जमिनीची मोजणी बंधनकारक असून मोजणी नकाशाशिवाय जमिनीची खरेदी-विक्री आता करता येत नाही. मोजणी कार्यालयाकडून नव्याने सटेलाईटशी निगडीत असलेली रोअर मोजणी व कमी कालावधीत करता येते. परंतू मोजणी कार्यालयात पुरेसे संख्याबळ नसल्याने वेळेत जमिनीची मोजणी करुन व्यवहार करणे गुंतागुंतीचे होत आहे. तसेच नियमित आणि जलद या दोन पध्दतीनेच मोजणी होत असून नियमित मोजणीसाठी ९० दिवस व जलद मोजणीसाठी ३० दिवसाचा वेळ कमीतकमी नोंदणी केल्यानंतर लागतो. अपुऱ्या मनुष्यबळामुळे निर्धारित वेळेत मोजणी आज तरी अशक्य नसून किमान सहा महिन्याचा कालावधी लागतो. अशी चर्चा दिवसभरात सुरु आहे. यामुळे मुला मुलींच्या विवाहासाठी लागणाऱ्या पैशाची जुळवणी कशी करावी. १२ वी नंतरच्या इजिनिअरिंग, मेडिकल व इतर शिक्षणासाठी लागणाऱ्या पैशाची व्यवस्था कशी करावी. याची पालकातून चिंता दिसून येत होती.

### दस्तलेखकावर उपासमारीची वेळ : अपसिंगेकर

मोजणी नकाशाशिवाय जमिनीच्या खरेदी विक्री करण्याच्या शासनाच्या अटीमुळे गेल्या दोन दिवसापासून जमिनीच्या रजिस्टीचे व्यवहार बंद झाले आहेत. यामुळे रोजीरोटीचा मेळ बसत नाही. तर दस्तलेखन करणाऱ्यावर उपासमारीची वेळ आली असून यासाठी शासनाचा नवा आदेश कारणीभुत ठरणार आहे, अशी प्रतिक्रिया दस्तलेखक नितीन अपसिंगेकर औसा यांनी दिली आहे.

### इतर व्यवहार सुरळीत : विशाल जगदाळे

जमिनीची खरेदी-विक्री बंद झाली असली तरी कार्यालयातील गहाणखात, हक्कसोड, रद्दपत्र, साधेखत अशी इतर कामे सुरळीत सुरु आहेत, अशी माहिती औशाचे दुय्यम निबंधक अधिकारी विशाल जगदाळे यांनी दिली.

### गरजू शेतकऱ्यांचे मरण : इनामदार

शासनाने अचानकपणे कायदा लागू केल्यामुळे अनेक गरजवंत मध्यमवर्गीय कुटुंबाचे व्यवहार जाग्यावर थांबले आहेत. उत्पन्नात घट झाल्याने नुकसानीत आलेल्या शेतकऱ्यांना बाजाबुज करुन पुढील हंगामासाठी, मुलांच्या लग्नकार्यासाठी, शिक्षणासाठी, दवाखान्यासाठी खाजगी खरेदी-विक्रीच्या माध्यमातून देवाणघेवाण करीत ताळमेळ घालावा लागतो. यासाठी महिनोमहिनो सावकार शोधून मनधरणी करावी लागते आणि सावकार शोधल्यानंतर शासनाकडून दुरुस्तीच्या नावाखाली नव्या कायद्याची अमंलबजावणी सुरु होते. यामुळे सर्व केलेले प्रयत्न व वेळ वाया जातो. शासनाच्या अशा धोरणामुळे गरजू शेतकऱ्यांचे मरण होत असून पुर्वरत आमंलबजावणी सुरु करावी, अशी मागणी एमआयएमचे जेष्ठ नेते मुझ्झफरअली इनामदार यांनी केली आहे.

Made with Xodo PDF Reader and Editor



# आ. आनंद बोंढारकरांनी घेतला मनपातील कामांचा आढावा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ०६ मे-**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका येथील सर्व विभागातील अधिकारी यांची आज आमदार आनंद बोंढारकर यांनी बैठक घेतली व शहरातील विविध सोयी सुविधांचा आढावा घेतला..

तसेच यावेळी शहरातील पाणीपुरवठा,लाईट,ड्रेनेज लाईन,पथदिवे,रोड नाल्या,घरकुल व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि येणाऱ्या पावसाळ्याच्या सासणाऱ्या पाण्याची व्यवस्था योग्य ती करावी यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. आणि या सर्व विभागाचा विभागप्रमुख यांच्याकडून आढावा घेतला.




त्यावेळी महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम,उपायुक्त स.अजितपालसिंघ संधू, उपायुक्त टवलारे ,शिवसेना जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे, शहरप्रमुख तुलजेश यादव,शहरप्रमुख सुहास खराणे पाटील, कार्यकारी अभियंता सुमित पाटील,सहाय्यक आयुक्त गुलाम सादिक, कार्यकारी अभियंता स्वामी,उपअभियंता सूर्यवंशी,सहाय्यक नगररचना पवार,पाणी पुरवठा उपअभियंता जकि खान, मारोती धुमाळ यांच्यासह सर्व विभागांचे विभागप्रमुख उपस्थित होते.

# गोदावरी अर्बनने बेरोजगारांना निर्माण करून दिली नोकरीची संधी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ०६ मे-**

नांदेड जिल्हा पोलीस दला तर्फे सामाजिक बांधिलकी जपत बेरोजगारांसाठी आयोजित मिशन उडान मेळाव्यात गोदावरी अर्बनने बेरोजगारांना रोजगाराची संधी देण्यासाठी पुढाकार घेतला.

नांदेड जिल्हा पोलीस दलाच्या वतीने जिल्ह्यातील बेरोजगार युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी या उद्देशाने मिशन उडान अंतर्गत भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये देशातील अनेक राज्यातील विविध भागातील कंपन्यांनी सहभाग घेतला होता.या मेळाव्यात नांदेडची गोदावरी अर्बन ही एकमेव संस्था होती.याप्रसंगी नांदेड खासदार रवींद्र चव्हाण,पोलीस अधीक्षक अविनाशकुमार,मा.आ.अमरनाथ राजूरकर,प्रवीण साले,मा.महापौर अजय बिसेन,आतिरिक्त पोलीस अधीक्षक सूरज गुरव या मान्यवरांनी स्टॉलला भेट दिली. गोदावरी अर्बन कायमच आपल्या कार्यक्षेत्रातील स्थानिक भूमिपुत्रांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत असते.नांदेड जिल्ह्यातील प्रत्यक्ष दोनशे पेक्षा अधिक बेरोजगारांना रोजगाराची संधी तर अप्रत्यक्ष हजारो लोकांच्या हाताला काम देण्याचे काम गोदावरी अर्बनने मागील एका दशकापासून केले आहे.




या रोजगार मेळाव्यात जिल्ह्यातील सात हजाराच्यावर बेरोजगारांनी सहभाग घेतला होता.तर गोदावरी अर्बनच्या स्टॉलला अनेक युवकांनी भेट दिली पैकी एकशे सत्तावीस बेरोजगारांनी आपले अर्ज सादर केले आहेत.आलेले सर्व अर्ज पुढील कार्यवाही साठी संस्थेच्या मनुष्य व्यवस्थापन विभागाकडे सादर केले आहेत.नोकरी इच्छुक बेरोजगारांपर्यंत पोहचण्याची ही संधी विविध संस्थाना तसेच बेरोजगारांना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय कंपनीत मुलाखत देण्याची संधी दिल्याबद्दल पोलीस विभागाचे गोदावरी अर्बनचे संस्थापक ना. हेमंत पाटील यांनी कौतुक करून आभार मानले, तसेच अनेक बेरोजगारांना गोदावरी अर्बन सोबत जोडून घेतल्याबद्दल अध्यक्ष राजश्री पाटील तसेच सर्व संचालक मंडळ,कार्यकारी संचालक धनंजय तांबेकर,सिनियर मॅनेजर महेश केंद्रे तसेच सिडको शाखाव्यवस्थापक गजानन पाटील यांचे अभिनंदन केले.

# पुरग्रस्तांच्या अनुदानसाठी मोर्चा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ०६ मे-**

दि.१ सप्टेंबर व ३ सप्टेंबर २०२४ रोजी अतिवृष्टी होवून पुर आल्याने नांदेड शहरातील हजारो घरामध्ये पाऊसाचे, पुराचे पाणी शिरुन कपडे, धान्य विद्यार्थ्याचे वहया- पुस्तके, गृहउपयोगी साधन सामुग्री यांचे मोठे नुकसान झाले. ८ महिने होऊन गेले तरी अद्याप शासनाची मदत अनुदान मिळाले नसल्याने दिपक सातोरे यांच्या नेतृत्वात पुरग्रस्तांचा भव्य मोर्चा दि.१४ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात येणार आहे.

शहरात १ सप्टेंबर व ३ सप्टेंबर २०२४ रोजी झालेली अतिवृष्टी व पुरामुळे हजारो घरांमध्ये खास करुन एन.टी.सी. मील भागातील हजारो घरांमध्ये पुराचे पाणी शिरुन कपडे, धान्य, विद्यार्थ्यांचे वहया-पुस्तके, गृहउपयोगी साधन सामुग्रीचे नुकसान झाले. पंचनामे होऊन ८ महीने झाले तरी अद्याप शासनाची मदत अनुदान मिळाले नाही. पुरग्रस्तांना शासनाची मदत अनुदान त्यांच्या खात्यात तात्काळ जमा करण्यात यावे या मागणीसाठी दिपक सातोरे यांच्या नेतृत्वात मोर्चा खडकपुरा पाणी टाकी पासुन निघुन जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे.

## संक्षिप्त वृत्त

### श्री.भास्करराव पब्लिक स्कूल व ज्यु. कॉलेजच्या निकालाची परंपरा कायम

**नायगाव** -शंकरनगर येथील इंग्रजी माध्यम असलेल्या श्री.भास्करराव बापूराव पाटील खतगावकर ज्यु.कॉलेजचा विज्ञान शाखेचा निकाल



सलग दहाव्या वर्षी शंभर टक्के लागला असून निकालाची परंपरा कायम ठेवले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इंग्रजी शिक्षण मिळावे हा हेतू समोर ठेऊन शंकरनगर ता.बिलोली जि. नांदेड येथे इंग्रजी माध्यमाची श्री.भास्करराव बापूराव पाटील खतगावकर पब्लिक स्कूल व ज्यु.कॉलेजची सुरवात मा.खा.श्री.भास्करराव पाटील खतगावकर यांनी केले आहे. तसेच सुमारे बावीस वर्षांपासून दहावीचा शंभर टक्के निकालाची परंपरा कायम ठेवत याही वर्षी बारावी विज्ञान शाखेचा निकाल सभर टक्के जोपासत नांदेड जिल्ह्यात नावारूपास आल्याने सर्वत्र निकालाचे कौतुक होत आहे. इयत्ता बारावीच्या परीक्षेत एकूण ९५ विद्यार्थी परीक्षार्थी होते सर्वच्या सर्व उत्तीर्ण झाले आहेत तसेच विविध प्रकल्प कार्यलय अंतर्गत असलेले ७६ विद्यार्थी परीक्षा दिले सर्वच्या सर्व उत्तीर्ण झाले यामध्ये सर्वप्रथमआत्राम स्नेहा बंडू (८६.५७) द्वितीय वाडेकर संध्यारानी यादवराव(८५.८३) तृतीय कनाके साक्षी दत्ता (८३.६७) या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा.खा.श्री.भास्करराव पाटील खतगावकर ,सचिव डॉक्टर मीनलताई निरंजन पाटील खतगावकर, बाळासाहेब पा. खतगावकर, प्राचार्य डी. पी.पांडेय शिक्षक व शिक्षेकेत्तर कर्मचारी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### महात्मा फुले महाविद्यालयाचा ९२ टक्के निकाल,गुणवत्तेत मुलींची बाजी!

**किनवट** -१२ वी परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून या परीक्षेत गोकुंदा येथील महात्मा ज्योतिबा फुले कनिष्ठ महाविद्यालयाने यावर्षीदेखील उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे.कला व



विज्ञान शाखेचा मिळून ९२.१६ टक्के निकाल लागला असून यावर्षी गुणवत्तेत मुलींनी बाजी मारली आहे. विज्ञान शाखेतील ३९६ पैकी ३९३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ९९.२४ टक्के निकाल लागला.यामध्ये प्रथम श्रेणीत ११८ विद्यार्थि उत्तीर्ण झाले आहेत.श्रद्धा व्यंकन्ना मादसवार ही ८४.६७ टक्के गुण घेऊन प्रथम आली आहे. कला शाखेतुन एकुण २०४ विद्यार्थ्यांपैकी १६० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ज्याची टक्केवारी ७८.४३ इतकी आहे. कला शाखेतुन सर्वाधिक ८२.८३ टक्के गुण घेऊन कु. पायल विनायक कवटे हिने प्रथम येण्याचा बहुमान पटकावीला आहे.तर विज्ञान शाखेतुन उद्यानविद्याशास्त्र विषयात ओमकार रामचंद्र ढोले या विद्यार्थ्याने २०० पैकी २०० गुण प्राप्त केले.कनिष्ठ महाविद्यालयाचा एकुण निकाल ९२.१६ टक्के एवढा लागला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव अभि.प्रशांत ठमके, कोषाध्यक्षा शुभांगीताई ठमके,प्राचार्य प्रमोद मुनेश्वर ,उपप्राचार्य राधेश्याम जाधव, उपमुख्याध्यापक किशोर डांगे, पर्यवेक्षक प्रा.संतोष बैसठाकुर,विज्ञान विभाग प्रमुख रघुनाथ इंगळे, पर्यवेक्षक सुभाष सुर्यवंशी, मनोज भोयर, महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, आदींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

**नांदेड** -नांदेड जिल्ह्यात १६ मे २०२५ च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात १६ मे २०२५ रोजी मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहिल. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा व इतर सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकांना लागू होणार नाही. अशा मिरवणुकांना परवानगी देण्याचे अधिकार तसेच पाच व पाचपेक्षा जास्त इसम जमण्यासाठी, सभा, मिरवणुका, मोर्चा काढणे, ध्वनीक्षेपक वाजविण्यास परवानगी देण्याचे अधिकार जिल्ह्यातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना तसेच पोलीस अधीक्षक नांदेड यांनी प्राधिकृत केलेल्या इतर पोलीस अधिकारी यांना राहतील.

### महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त आज प्रा.राम माळगी यांचे व्याख्यान

**नांदेड** -महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त महात्मा बसवेश्वर विचार मंच, अनुभव मंटप समिती आणि बसव प्रतिष्ठाण व क्रांतीज्योती महिला बचत गट यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, दि. ७ मे रोजी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांची वर्तमानकालीन प्रस्तुतता या विषयावर व्याख्यान देण्यासाठी सुप्रसिद्ध व्याख्याते प्रा.राजा माळगी (वाळवा जि. सांगली) येणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार गंगाधरराव पटणे यांची उपस्थिती लाभणार आहे. याप्रसंगी केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेमध्ये ज्या विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे त्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. शहरातील पीपल्स महाविद्यालयामधील नरहर कुरुंदकर सभागृहात बुधवार, दि. ७ मे रोजी संध्याकाळी ५ :३० वाजता कार्यक्रमाला सुरुवात होईल. या कार्यक्रमाला शहरातील सर्व श्रोत्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन महात्मा बसवेश्वर जयंती आयोजन समितीने केले आहे.

# राष्ट्रवादीच्यावतीने स्व. प्रदीप नाईकांच्या स्मृतीत माहूरात विविध ठिकाणी पाणपोईचा शुभारंभ

**तभा वृतसेवा**
**माहुर, दि. ०५ मे-**

माहूर सारख्या तिर्थक्षेत्राच्या व तालुकास्थळाच्या शहरात दररोज हजारोंच्या संख्येने देवदर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसह ग्रामीण भागातून कार्यालयीन कामानिमित्ताने येणाऱ्या नागरिकांची तहान भागवण्यासाठी विविध ठिकाणी धर्मार्थ निःशुल्क सेवा असलेल्या थंड पिण्याचे पाणी असलेल्या पाणपोईची मागणी नागरिकांच्यावतीने जोर धरू लागली होती. ही गरज लक्षात घेऊन सध्या उन्हाची तीव्रता पाहता स्व.आमदार प्रदीप नाईक यांच्या स्मृतीत माहूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने ग्रामीण रुग्णालय, टी- पॉईंट व बस स्थानक परिसरात



नागरिकांची तृष्णातृप्ती करण्यासाठी आज ०४ एप्रिल रोजी थंड पाण्याच्या पाणपोईची व्यवस्था करण्यात आली.

जेष्ठ नागरिक मोहन पवार यांच्या हस्ते फीत कापून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष मेघराज जाधव यांच्याहस्ते नारळ फोडून तृष्णातृप्ती पाणपोईचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष फिरोज दोसानी,सभापती विजय कामटकर,सभापती प्रतिनिधी माजी नगरसेवक रफीक सौदागर, नगरसेविका प्रतिनिधी इरफान सय्यद,सभापती प्रतिनिधी रणधीर पाटील, नगरसेविका प्रतिनिधी निसार कुरेशी,नगरसेवक प्रतिनिधी सुमित खडसे,राजू सौंदलकर,विक्रम राठोड, अफसर आली,शेख आरिफ, देवीसिंग पेंटर, जावेद दोसानी,आकाश राठोड,विकास राठोड, यासह अनेकांची उपस्थिती होती.

# मजुरी दरात वाढ करण्याची खाजगी कामगारांची मागणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ०६ मे-**

येथील काँक्रीट लिफ्ट मशीन खाजगी लेबर युनियनच्या वतीने त्यांच्या कामाच्या दरांमध्ये वाढ करुन सहकार्य करण्याच्या विविध मागण्यांसाठी मुकादम, गुत्तेदार तसेच स्लॅब मिशन मालक युनियनकडे साकडे घालण्यात आले. अत्यंत कमी दरात कामांची हजेरी देऊन या क्षेत्रातील कामगारांचे एकप्रकारे शोषण होत असल्याची कैफियत लेबर युनियनने मांडली आहे. यासाठी शहरातील गणेश नगर वाय पॉइंट परिसरात कामबंद ठेवून एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. यात लेबर युनियनचे अध्यक्ष राहुल कीर्तने, उपाध्यक्ष अनिल जोंधळे, कोषाध्यक्ष सतिश गवारे, सचिव अनिल थोरात, सदस्य नारायण कल्हाळे, जगदीश सोनसळे, संभाजी कुंठे, नागसेन वाघमारे यांच्यासह अनेकांनी सहभाग नोंदविला होता.

काँक्रीट लिफ्ट मशीनचे कामगार असंघटित असून खाजगी पद्धतीने काम करतात. यात विविध प्रकारची कष्टाची कामे असून योग्य तो मोबदला मिळत नसल्याचे या कामगारांचे म्हणणे आहे. आजच्या भडकत्या महागाईच्या जमान्यात मुकादम, गुत्तेदार तसेच स्लॅब मिशन मालकांनी आमच्या कामांचे दर वाढवावेत अशा मागण्या करण्यात आल्या. क्राँकेट लिफ्ट मशीन खाजगी युनियन नांदेडच्या मागण्या पुढीलप्रमाणे - १) १०० सिमेंट बॅग पर्यंत एकेरी हजेरी २५० रु. तर वरील प्रत्येक बॅगेसाठी २.५० रु अधिक राहतील, २) दोन ड्रायव्हर असल्यास १००० रु, तीन ते चार फुटांपर्यंत ६०० रु. आणि त्यावरील सज्जाचे काम गुत्तेदार करतील, ३) फिटींगकरिता पहिला मजला ८००, दुसरा ९००, तिसरा १०००, चौथा १५००, पाचवा १८००, सहावा २१००, सातवा २७००, आठवा मजला ३२०० तर नववा मजला ७००० रुपये असा दर मान्य करण्यात यावा ४) दुसऱ्या दिवशीची फीटींग १०० रु. कमीप्रमाणे असावी ५) कॅम्, बीम फुटींग १०० बॅगपर्यंत ५०० रु हजेरी देण्यात यावी तसेच रंदेवाल्याची हजेरी आणि अवघड बीम असल्यास गुत्तेदाराचा लेबर भरुन देईल, ६) रेती गिट्टी १०० बॅगपर्यंत २.५० रु., ७) कॅम् बीम फुटींग कॉलम ५०० रु तर सिंगल हजेरी २५० असावी, ८) डिंबरह्मावरील फिटींग ८०० आणि हप्पर खोल फिटींग ६०० रु, ९) मटेरियल वाले ४० फुटांपर्यंत टाकण्यात येतील आणि त्यावरील वेगळे पैसे लागतील, १०) गाडेवाले ७० फुटाच्यावर असतील तर एक हजेरी आगाऊ असेल, ११) दुपारी ३.०० वाजेनंतर काम सुरू केले जाणार नाही तसेच काम रद्द झाल्यास १५० रु खोती द्यावी लागेल. अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.

# महा'जनशक्ती'परिषदेच्या निवडी जाहीर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ०६ मे-**

महाराष्ट्र राज्यात कृषी,रोजगार,कामगार,सहकार,उद्यम,आरोग्य, शिक्षण या विविध विषयांत काम करण्यास इच्छुकांची एक टीम तयार करत महा'जनशक्ती' परिषद ही संघटना कार्य करण्यास सज्ज झालेली आहे.

राज्यभरात विविध जिल्ह्यातून राज्यस्तरीय समिती गठीत करण्यात येत आहे. यात मराठवाडा,कोकण,पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ,उत्तर महाराष्ट्र अश्या सर्व विभागातून कार्यकर्ते बहुसंख्येने जोडले जात आहेत. ही सामाजिक संघटना १००% जनसेवेसाठीच कार्य करणार आहे. संघटनेतून सामान्य कार्यकर्त्याचे नेतृत्व निर्माण होणे अशी संघटनेची महत्वपूर्ण असणार आहे.

ग्रामपंचायत ते संसद भवन विविध प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी संघटनात्मक कार्य नियुक्त होणारी सर्वमंडळी करणार आहे. केंद्र-राज्य यांच्या सर्व विविध योजनांचा लाभ शेतकरी-कष्टकरी या बांधवांना/ नागरिकांना मिळावा यासाठी आम्ही लढा देणार आहोत . संघटनात्मक कार्याच्या माध्यमातून विविध जिल्ह्यात 'जनसेवा हीच ईश्वरसेवा' या हेतूने कार्य करणार असल्याची माहिती संस्थापक गजानन जोशी यांनी दिली आहे.




**नांदेड- सकल मातंग समाजाच्या वतीने मुबई येथे १० मे रोजी अनुसूचित जाती आरक्षण वर्गीकरण जन आक्रोश महाआंदोलन आयोजित केले आहे. या पार्श्वभूमीवर नांदेड येथील कुसुम सभागृह येथे राज्यस्तरीय जनजागरण परिषद ४ मे रोजी माजी आ. अविनाश घाटे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी सचिन साठे, आमदार अमित गोरखे, आमदार सुनील कांबळे, सचिन साठे, रमेश बागवे, लक्ष्मण ढोबळे, आमदार जितेश अंतापूरकर, गणपत भिसे, सुरेंद्र घोडजकर, विष्णूभाऊ कसबे, मारुती वाडेकर, उमेश पवळे, आनंद गुंडले, माजी आमदार नामदेराव ससाणे सतिश कावडे, गणेश तादलापूरकर, पंडित वाघमारे, नारायण गायकवाड, लालबा घाटे आदी उपस्थित होते.**

# शिवा संघटनेच्या वतीने महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त मिरवणुकीचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. ०६ मे-**

शिवा संघटनेच्या वतीने जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंतीचे भव्य मिरवणूकीचे आयोजन करण्यात आले आहे.

शिवा संघटनेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका शाखेच्या वतीने क्रांतिसूर्य जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या ८९४ व्या जयंतीच्या भव्य मिरवणूकीचे आयोजन आज ७ में रोजी करण्यात आले आहे. महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंतीची भव्य मिरवणूक दुपारी ३ वाजता शिवमंदिर जुना रोहा येथून ,छ. शिवाजी महाराज पुतळा -जुना लोहा- विठ्ठलवाडी मुख्य रस्ता भाजी मंडई -बस स्टॅण्ड मार्ग व्यंकटेश गॉर्डन येथे समारोप संभारंभ होणार आह भव्य मिरवणूकीत छत्रपती संभाजीनगर येथील



२१ जणांचे ढोल पथक , करमाळा येथील हालगी पथक व भव्य साउंड सिस्टीम ,भजनी मंडळे आणि घोडेस्वार, राष्ट्रसंत डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपुरकर यांचे उत्तराधिकारी गुरुवर्य राजशेखर शिवाचार्य महाराज अहमदपुरकर व दिगांबर शिवाचार्य महाराज वसमतकर हे भव्य रथयात्रेमध्ये विराजमान होणार आहेत . महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंतीच्या भव्य मिरवणूकीत समाजबांधवांनी सहभागी व्हावे असे आवाहन शिवा संघटनेचे लोहा तालुकाध्यक्ष हनुमंत लांडगे, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक बसवेश्वर धोंडे,शिवा संघटना प्रणित महात्मा बसवेश्वर महाराज जयंती मंडळाचे अध्यक्ष प्रा. सुर्यकांत आणेराव , स्वागताध्यक्ष माजी नगरसेवक युवराज वाघमारे, कार्याध्यक्ष पिंटू वड्डे, लक्ष्मण कांजले, बालाजी एकलारे, अंकुश सोनवळे, राजु पिल्लोळे, यांच्यासहित संयोजन समितीने केले आहे.

# मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणार वार्षिक ३८ हजार रुपये अनुदान

## आ. भीमराव केराम यांची माहिती

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ०६ मे-**

ईतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना वस्तीगृहात राहून उच्च शिक्षण घेता यावे यासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी शासकीय वस्तीगृह कार्यान्वित करण्यात आली असून किनवट व माहूर या ठिकाणी शासकीय वस्तीगृह मंजूर करावे यासाठी माझा पाठपुरावा सुरू आहे. तथापि वसतिगृहासाठी पात्र असणाऱ्या पण प्रवेश न मिळालेल्या भटक्या विमुक्त जाती व मागासवर्गीय विध्यार्थ्यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्वाधार योजनेअंतर्गत शासनाकडून वार्षिक ३८ हजार रु अनुदान देण्यात येणार असल्याची माहिती आमदार भीमराव केराम यांनी दिली आहे.



किनवट तालुका मागास दुर्गम म्हणून ओळखला जातो. येथे उच्च शिक्षणाची कोणतीही सोय नसल्यामुळे ईतर मागासवर्ग, विमुक्त जाती,भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना दीडशे किलोमीटर अंतरावरील नांदेड येथे किरायाच्या खोलीत राहून शिक्षण घ्यावे लागते. हि बाब लक्षात घेऊन किनवट व माहूर या ठिकाणी शासकीय वसतिगृह मंजूर करावे यासाठी आमदार भीमराव केराम सातत्याने पाठपुरावा करत आहेत.

तथापी राज्यातील इतर मागासवर्ग,विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी १०० विद्यार्थी क्षमतेचे मुलासाठी १ व मुलीसाठी १ याप्रमाणे ३६ जिल्ह्याच्या ठिकाणी ७२ शासकीय वस्तीग्रह शासनाने स्वतः ईमारत भाड्याने घेऊन वस्तीगृहे कार्यान्वित करण्याचा निर्णय घेतला असून त्यानुसार नांदेड जिल्ह्यातील मुख्यालयाच्या ठिकाणी २ वसतिगृहे कार्यान्वित केली आहेत. या वस्तीगृहासाठी पात्र असणाऱ्या पण वस्तीगृहात प्रवेश न मिळालेल्या इतर मागासवर्ग विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता शासनाने ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना लागू केली असून सदर योजनेअंतर्गत तालुक्याच्या ठिकाणी पात्र विद्यार्थ्यांना वार्षिक ३८ हजार रु.चे अनुदान थेट लाभ हस्तांतरणाद्वारे त्यांच्या आधार संलग्न बँक खात्याद्वारे देण्यात येणार आहे.याबाबत राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण दुग्धविकास अपारंपारिक ऊर्जामंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांचे पत्र प्राप्त झाल्याचे आ. भीमराव केराम यांनी सांगितले आहे.

# शत पुरस्कारी सेवाव्रती ठाकुर यांना मराठवाडा रत्न'चा मुकुट

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ०६ मे-**

आजच्या प्रचंड स्पर्धेच्या आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाच्या युगात एखादा पुरस्कार मिळणेही अवघड असताना सामाजिक कार्यकर्ते धर्मभूषण ड. दिलीप ठाकूर यांनी पुरस्कारांची शंभरी पूर्ण करत सेवाभावी क्षेत्रात एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. त्यांच्या या दुर्लभ यशाच्या गौरवार्थ 'लोकशाही मराठवाडा रत्न' या मानाच्या पुरस्काराने नुकतेच त्यांना सन्मानित करण्यात आले.

छत्रपती संभाजीनगर येथील पंचतारांकित हॉटेल हयात पॅलेस येथे आयोजित भव्य 'मराठवाडा संवाद २०२५' या समारंभात ओबीसी कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते आणि माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला असल्याची माहिती दिलीप ठाकुर यांनी दिली आहे.या गौरवाने ठाकूर यांची सामाजिक कार्यातील शंभराव्या पुरस्काराची शृंखला पूर्ण झाली आहे.या अतुलनीय उपलब्धीबद्दल माहूर येथील राजपूत समाजातील नागरिकांसह सर्वधर्मिय जनतेकडून शतपुरस्कारी ठाकुर यांच्यावर कौतुकासह अभिनंदनाचा वर्षाव



केला जात आहे. या रंगतदार सोहळ्यात केंद्रीय माजी अर्थमंत्री खा. डॉ. भागवत कऱ्हाड, मराठा आरक्षणाचे जननायक मनोज जरांगे पाटील, माजी मंत्री बबनराव लोणीकर, आमदार प्रशांत बंग, आ. संजय केनेकर, माजी खासदार इम्तियाज जलील आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध वृत्तनिवेदक अजिंक्य भातांब्रेकर व राघवी ओम सावंत यांनी केले. त्यांनी मंचावर आमंत्रित करताना सांगितले की, २२ वर्षांत १३ लाखांहून अधिक रुग्णांना 'भाऊचा डबा' देणाऱ्या, ५७ महिन्यांत २,५०० पेक्षा अधिक बेघर व्यक्तींना दाढी, स्नान, कपडे देऊन जीवनशैलीत आमूलाग्र बदल घडविणाऱ्या आणि ९० पेक्षा अधिक समाजोपयोगी उपक्रम अविरतपणे राबवणाऱ्या दिलीप ठाकूर यांना 'एक्सलन्स इन सोशल वर्क' या श्रेणीत हा पुरस्कार दिला जात आहे.

Made with Xodo PDF Reader and Editor



# टायरची चोरी करणारी टोळी उघड करुन दोन आरोपी केले जेरबंद

**स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ मे**

दि.१५/३/२०२५ रोजी ०६०० ते दि.१६/३/२०२५ रोजीचे ०९३० वा. पुर्वी बीड बायपास रोड लगत शिदोड शिवार ता.जि.बीड येथे फिर्यादी गणेश महादेव गायकवाड व्यवसाय गुत्तेदारी, रा. सुभाष कॉलनी पेठ बीड यांचे गॅरेज लाईन चे गाळया समोर उभे असलेल्या आमचे टाटा कंपनीचे दहा टायरी वाहनाचे आठ टायर्स ९६,०००/- व आठ डिक्स २४०००/- तसेच अखील खान यांचे त्या परिसरात असलेले दुकानासमोर ठेवलेले वेगवेगळया कंपनीचे ०७ टायर १४०००/- रु असे दोन ठिकाणांवरील एकुण १,३४,०००/- रु चा माल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेला म्हणुन दिनांक १७/०३/२०२५ रोजी पो.स्टे. बीड ग्रामीण गुरनं ७९/२०२५ क.३०३(०२) भादंवि प्रमाणे अज्ञात आरोपी विरुध्द गुन्हयाची नोंद करण्यात आली होती.



सदर गुन्हयाचे अनुषंगाने पोलीस निरीक्षक श्री.उस्मान शेख यांनी अधिपत्याखालील पोउपनि श्री. महेश विघ्ने यांचे पथकास आरोपी शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणण्यासाठी मार्गदर्शन केले होते. पोउपनि महेश विघ्ने यांनी आपल्या पथकातील अंमलदारसह आरोपीची गोपनिय माहिती काढण्यास सुरुवात केली.दिनांक ०४/०५/२०२५ रोजी आरोपी शोध घेत असतांना गोपनिय माहिती द्वारे कळाले की इसम नामे पापा उर्फ रामेश्वर राजेंद्र शिंदे याने व त्याचे इतर साथीदाराने मिळुन सदर गुन्हा केला आहे. त्यानंतर पथकाने सदर इसमास इंद्रापेढी येथुन ताब्यात घेवुन गुन्हया अनुषंगाने विचारपुस केली असता त्याने त्याचे इतर साथीदार रवी सुंदुर काळे रा.जोगेश्वरी पारधी पेढी,पारा, ता.वाशी,जि.बीड व इतर साथीदारांसह केला असल्याचे कबुली दिली असुन गुन्हयातील गेलामाल पैकी ६४,०००/- रु मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

नमुद दोन्ही आरोपीतांना पो.स्टे.बीड ग्रामीण यांचे ताब्यात देण्यात आलेले असुन इतर चार आरोपींचा शोध घेवुन अटक करण्याचे प्रयत्न चालु आहे. पुढील तपास पो.स्टे.बीड ग्रामीण हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री.नवनीत काँवत पोलीस अधीक्षक बीड, मा.श्री. सचिन पांडकर अपोअ बीड, पो.नि. श्री.उस्मान शेख यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि महेश विघ्ने, पोह/ महेश जोगदंड, पोह/राजु पठाण, पोह/तुषार गायकवाड, पोअं/ बप्पासाहेब घोडके, चालक पोह/गणेश मराडे स्था.गु.शा.बीड यांनी मिळुन केली आहे.

# पाण्याअभावी बीडकरांचे हाल निषेधार्थ अजितदादांच्या प्रतिमेला अभ्यंग स्नान लक्ष्यवेधी आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ मे**



बीड शहरातील जनतेला महिनाभरापासून नळाला पाणी आलेले नसल्याने पाणीबाणी सुरू असुन ११४ कोटी रुपयांची अमृत अटल योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिकारी आणि मे.प्रगती कन्स्ट्रक्शन लातुर यांनी २ वर्षं कालमर्यादा असतानाही ७ वर्षे उलटूनही अद्याप रखडलेल्या अवस्थेत असल्याने कारवाई करण्यात यावी तसेच पाणीपुरवठ्यासाठी महावितरणच्या ३३ कोटी रूपये थकबाकी साठी जिल्हा नियोजन समिती अथवा राज्याच्या वित्त विभागातुन तरतूद करण्यात यावी. बीडकरांची तहान आणि घशाची कोरड हे लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि ठेकेदार जलयोजनेचे मारेकरी आहेत. उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांनी बीडकरांना वाऱ्यावर सोडले असुन पाण्याअभावी बीडकरांचे हाल होत असुन केवळ बीडच्या पाणीपुरवठ्यासाठी बैठकांचा फार्स होत असुन यांच्या निषेधार्थ आणि बीड शहराला नियमित व सुरळीत पाणीपुरवठा करण्यात यावा या प्रमुख मागणीकडे लक्ष्य वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.०५ सोमवार रोजी बीड शहरातील राजीव गांधी चौक परीसरातील नारायणी इंग्लिश स्कूल समोरील व्हाल्ववर पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला अभ्यंगस्नान लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस,सुदाम तांदळे, शेख मुबीन,शेख मुस्ताक, रामनाथ खोड आणि आप जिल्हाध्यक्ष अशोक येडे सहभागी होते.

# शोभा यात्रा डोळ्याचे पारणे फेडणारा सोहळा

## ११०० कलशधारी महिला.. बालवारकरी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ मे**



भव्य शोभायात्रा हजारो कलशधारी महिला, शेकडो बाल वारकरी टाळ मृदंगाच्या जयघोषात श्रीक्षेत्र नेकनूर येथे मंगळवारी बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवाची मोठ्या थाटात सुरुवात झाली.संत महंतांच्या हस्ते टाळ,विना,मृदंग,पालखी आणि ग्रंथ पुजन करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री ह भ प प्रकाशानंदगिरीजी महाराज देवगडकर, श्री ह भ प महंत हरिहर भारती महाराज , श्री ह भ प महादेवानंद भारती. श्री ह भ प प्रशांत महाराज क्षीरसागर,श्री ह भ सत्यवान महाराज लाटे, नाना महाराज कदम, सुरेश म जाधव, श्रीकृष्ण महाराज यादव, भास्कर महाराज शिंदे, दिनेशांनद महाराज काळे यांच्या सह हजारो भावीक भक्त मंडळी उपस्थीत होतें..

बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र नेकनुर येथे वै.श्रीगुरू बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवाची सुरुवात मंगळवारी सकाळी मोठ्या थाटात सुरुवात झाली.. भव्य शोभा यात्राव सकाळी ८ वाजता विठ्ठल रुक्मिणी मंदिर शिक्षक कॉलनी ते कीर्तन मंडप या ठिकाणी करण्यात आले यावेळी पिवळ्या रंगाच्या साड्या परिधान करून कलशधारी ११०० सुवासिनी महिला , कुमारीका मुली सहभागी झाल्या होत्या..बंकटस्वामी वारकरी शिक्षण संस्थेतील बालवारकरी याच्या पाऊलीच्या खेळाने लक्ष वेधून घेतले.





बीड सध्या प्रचंड कडक उन्हाळा सुरू असून महिन्याभरावर पावसाळा येऊन ठेपला आहे त्यामुळे शेतकरी सध्या शेतीच्या मशागतीत व्यस्त असून सगळीकडे नांगरणी करण्याचे काम सुरू आहे (छाया कृष्णा शिंदे)

# महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या क्षेत्रीय कार्यालयात स्थापना दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.६ मे**

भारत सरकारच्या एक राज्य एक ग्रामीण बँक या धोरणास अनुसरून महाराष्ट्र ग्रामीण बँक आणि विदर्भ कोकण ग्रामीण बँक यांचे एकत्रीकरण करून नवीन महाराष्ट्र ग्रामीण बँकेची स्थापना दि. ०१ मे २०२५ पासून सुरुवात झाली असून त्यानिमित्ताने महाराष्ट्र ग्रामीण बँक क्षेत्रीय कार्यालय, बीड येथे स्थापना दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून बीडचे पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत उपस्थित होते.त्यांच्या हस्ते स्थापना दिनाच्या फलकाचे अनावरण करण्यात आले आणि दीप प्रज्वलन करुन कार्यारंभ दिवस तथा स्थापना दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.



महाराष्ट्र ग्रामीण बँकेचा स्थापना दिनाचा मुख्य कार्यक्रम छत्रपती संभाजीनगर येथील मुख्य कार्यालयात आयोजित करण्यात आला होता तसेच या कार्यक्रमाचा भाग म्हणून बीड येथील क्षेत्रीय कार्यालयात स्थापना दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीताने करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रस्तावित डीआरएम हर्षल कुऱ्हाडे यांनी केले. तसेच क्षेत्रातील मान्यवर ग्राहकांचा सत्कार या प्रसंगी करण्यात आला. या प्रसंगी सिरसाळा शाखेचे शाखा व्यवस्थापक एस एस जाधव यांनी उपस्थितांना ग्रामीण बँकेच्या सेवा सुविधांमध्ये वाढ होणार असल्याचे नमुद केले. सेवानिवृत्त अधिकारी तांदळे यांनी ग्रामीण बँकेच्या सेवांचा गौरव केला. या वेळी काही ग्राहकांनी आपल्या कर्मचाऱ्यांचे विशेष गुणगौरव करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचा समारोप ग्रामीण बँकेचे क्षेत्रीय व्यवस्थापक शिवशंकर लाईदवार यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलताना सांगितले की, महाराष्ट्र ग्रामीण बँकेत यापुढे अनेक सेवा आणि सुविधा ग्राहकांना मिळणार असून आमचे कर्मचारी देखील ग्राहक सेवा तत्पर आणि चांगली देतील अशी खात्री त्यांनी यावेळी बोलताना दिली. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला. यावेळी ग्रामीण बँकेचे शाखा अधिकारी आणि कर्मचारी तसेच सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचलन उमेश वाघ यांनी तर आभार प्रदर्शन विवेक भोसले यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बीड क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी तसेच शैलेश शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# आर्ट ऑफ फन अकॅडमीच्या वतीने गेवराईत डान्स व क्टिंग शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.६ मे**


शहरात प्रतिवर्षी प्रमाणे याहि वर्षी आर्ट ऑफ फन अकॅडमी च्या वतीने दि.१० मे ते २० मे २०२५ पर्यंत सुप्रसिद्ध कलाकारांच्या उपस्थितीत दहा दिवसीय डान्स एड क्टिंग शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.





सविस्तर असे की गेल्या चार वर्षापासून गेवराई शहरातील लहान मुलांना मूल्य शिक्षणा बरोबरच त्यांच्यातील आत्मविश्वास वाढविण्यासाठी आर्ट ऑफ फन अकॅडमी च्या वतीने उन्हाळ्याच्या सुट्टीत मुलांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी शिबीराचे प्रारंभ दि. १० मे ते २० मे २०२५ या दरम्यान दहा दिवसीय डान्स क्टिंग शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. यामध्ये चित्रपट सृष्टीतील सुप्रसिद्ध अभिनेते दिग्दर्शक श्री.गणेश देशमुख,झी युवा डान्स महाराष्ट्र डान्स फेम विजेती डान्सर वैभवी टाकणखान, घर बंदूक बिर्याणी फेम सिने अभिनेते अशोक कानगुडे या कलाकारांच्या प्रमुख उपस्थितीत शिबीर होणार आहे. शास्त्री चौक,डिवायएसपी ऑफिस शेजारी, पत्रकार भवन मध्ये शिबीराचे आयोजिन करण्यात आलेले आहे. तर सर्व प्रेक्षकांनी तथा आपल्या मुलांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी शिबिराचा लाभ घ्यावा व शिबीरात नाव नोंदणी करण्यासाठी संपर्क दिपक गिरी , ८१७७९२४७५६, रोहित पुराणिक,९३२५२१२१९९, शिवकुमार सोनवणे, ९६८९२६३२२०, विवेक शर्मा,९८३४७६८६२० या क्रमांकावर संपर्क करुन नाव नोंदणी करावी असे आर्ट ऑफ फन अकॅडमीचे संचालक सांगितले आहे.





# गेवराई शहरात महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.६ मे**

गेवराई शहरातील वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराजांची ८९४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. महात्मा बसवेश्वर महाराजांची जयंती निमित्त विविध उपक्रम राबवण्यात आले यामध्ये निबंध स्पर्धा,रक्तदान शिबिर व व्याख्यान तसेच वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. रविवारी दि.०४ रोजी सकाळी आठ वाजता गेवराई शहरातील मेनरोड येथील रेणुका देवी मंदिरातून ही भव्य शोभा यात्रा काढण्यात आली. या शोभयात्रेमध्ये बालगोपालांसह महिलांनी एकाच रंगाच्या साड्या परिधान केल्या तर पुरुषांनी पांढऱ्या रंगाचा वेश परिधान करून या शोभयात्रेत सहभागी झाले होते. या शोभा यात्रेमध्ये पुढे बँड पथक होते त्या मागे अतिशय शिस्ती मध्ये वीरशैव महिला भजन करत होत्या. सजवलेल्या रथामध्ये महात्मा बसवेश्वरांचा आकर्षक असा पूर्णाकृती पुतळा होता तर

या शोभयात्रेचे प्रमुख आकर्षण म्हणजे महात्मा बसवेश्वरांच्या वेशभूषेत आश्वारूढ असलेल्या सर्वेश सचिन राजुरे यांने सर्वांचे लक्ष वेधले. यावेळी महिलांनी बसवनामाचा गजर करत पाऊली खेळत तसेच फुगडी खेळत या शोभा यात्रेची शोभा वाढवली. या शोभा यात्रेत युवकांना देखील फुगडी खेळण्याचा मोह आवरला नाही. मेन रोड तहसील रोड मार्गे शोभा यात्रा शास्त्री चौकात आल्यावर शिवतीर्थ शोरूम च्या वतीने सर्व समाज बांधवाना सरबत देण्यात आले. त्यानंतर लाल बहादूर शास्त्री यांच्या पुतळयाला पुष्पहार अर्पण करून माळी गल्ली, मोमीनपुरा, मार्गे रेणुका देवी च्या मंदिरात महाप्रसादाने समारोप करण्यात आला. या जयंती निमित्त भव्य रक्तदान शिबीर देखील घेण्यात आले या रक्तदान शिबिरामध्ये २५ रक्तदात्यांनी रक्तदान केले यावेळी महिलांनी पण रक्तदान केले.

# वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस

## वीज पडल्याने अंबाजोगाई तालुक्यात एकाच मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.६ मे**



अंबाजोगाई शहर आणि परिसरात सोमवारी वादळी वारा आणि मेघगर्जनेसह गारांच्या अवकाळी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे वारंवार वीजपुरवठा खंडित होत होता. सायंकाळी साडे पाच वाजण्याच्या सुमारास अचानक वातावरणामध्ये बदल होऊन जोरदार वादळी वाऱ्याला सुरुवात झाली त्यातच गारांचाअवकाळी पाऊसही पडू लागला.

हवामान विभागाने बऱ्याच दिवसांपासून अवकाळी पावसाचा अंदाज व्यक्त केला होता. त्यानुसार सोमवारी वातावरणामध्ये दुपारपासून अचानकच बदल झाला आणि उन्हामध्ये देखील फरक पडला . मात्र, धग कायम होती. लगेच आलेल्या वादळी वारा आणि गारांच्या पावसामुळे मात्र चांगलीच त्रेधा तिरपीट निर्माण झाली. यामुळे अंबाजोगाई शहरवासीयांना मोठा दिलासा मिळाला. तालुक्याच्या ग्रामीण भागात अनेक ठिकाणी पावसाने हजेरी लावल्याचे वृत्त आहे. शहराच्या आजुबाजुच्या परिसरामध्येही अचानकच गारांच्या पावसाने हजेरी लावल्याचे वृत्त आहे.याच जोरदार पावसाबरोबर विजपडून अंबाजोगाई ता.मगरवाडी येथील सचिन मधुकर मगर वय ३८ हा शेतकरी आपल्या शेतात असताना ठार झाला वीज पडल्याची बातमी कळताच मगरवाडीकर घटनेच्या ठिकाणी पोहचले व त्या शेतकऱ्याला अंबाजोगाई दवाखान्यात आणत्यावेळी रस्तात त्याचा मृत्यू झाला

# श्री महाबली कॉटन इंडस्ट्रीजला लागली आग तीस लाखांचे नुकसान;उष्णतेमुळे आगीचा भडका

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.६ मे**



गेवराई शहराजवळ असलेल्या महाबली कॉटन इंडस्ट्रीजला आज दि. ३ मे शनिवार रोजी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास प्रेसिंग मध्ये काम चालू असताना अति उष्णतेमुळे आगीची ठिणगी पडून आग लागली असल्याचा अंदाज व्यक्त केला जात असून या आगीमध्ये प्रेसिंग मध्ये चालू असलेला कापूस, रुई जळून तीस लाखांपेक्षा जास्त नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. उशिरा का होईना कृषी उत्पन्न बाजार व नगरपरिषद गेवराई अग्निशमन गाडी पोहोचल्याने आग आटोक्यात आणण्यात अग्निशमन दलाला यश आले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, श्री महाबली कॉटन इंडस्ट्रीज गेल्या तेरा वर्षापासून कार्यरत असून कापूस व्यापारामध्ये श्री महाबली कॉटन इंडस्ट्रीजचे मोठे नाव आहे. गेवराई तालुक्यातील कापूस व्यापारामध्ये महाबली इंडस्ट्रीज चा मोठा हातभार आहे. शेतकऱ्यांना वेळोवेळी इंडस्ट्रीजच्या माध्यमातून मदत करण्यात येते. गेल्या तेरा वर्षांमध्ये एकदाही आग लागण्याचा असा अनुचित प्रकार घडलेला नाही. परंतु दिनांक ३ मे रोजी अति उष्णतेमुळे आगीची ठिणगी पडून आग लागली असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात असून या आगीमध्ये प्रेसिंग मध्ये चालू असलेला कापूस, रुई जळून तीस लाखांपेक्षा जास्त नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. वेळीच कृषी उत्पन्न बाजार समितीची अग्निशमन व नगरपरिषद अग्निशमन दल गाडी पोहोचल्याने आग आटोक्यात आणण्यात अग्निशमन दलाला यश आले आहे. घटनेची माहिती मिळताच अनेक टँकर धारक त्या ठिकाणी आग विझवण्यासाठी मदतीसाठी धावून आले. जिनिंग मध्ये उपस्थित असलेले सर्व कामगार व शेतकरी आग विझवण्यासाठी मदत करू लागले. सर्वांच्या मदतीने आग विझवण्यात यश आले परंतु या घटनेमध्ये तीस लाखांच्यावर नुकसान झाले असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. अद्याप पर्यंत गेवराई पोलीस घटनास्थळी पोहोचले नसून अग्निशमनच्या कार्यतत्परतेमुळे आग विजवण्यात यश आले आहे.